# श्वास प्रवास

रोहिणी तुकदेव

# ध्यास प्रवास

(बाबूराजे तथा चिदंबर गो. येडूरकर यांचे जीवितकार्य)

# ध्यास प्रवास

**Dhyas-Pravas**
**Rohini Tukdeo**

© रोहिणी तुकदेव

**प्रकाशक :**
**डॉ.भाऊसाहेब गुळवणी**
पन्हाळा (नेबापूर)
दूरध्वनी : ८८०५१५०१५०

**अक्षरजुळणी :**
शशीभूषण जाधव, सातारा

**मुद्रक :**
मुरारी मुद्रणालय, वाय.पी.पोवार नगर, कोल्हापूर

**आवृती:**
प्रथम आवृत्ती : सप्टेंबर, २०१७

विनामूल्य : खाजगी वितरणासाठी

---


प्रकाशक, लेखकांच्या लेखी परवानगी शिवाय या पुस्तकातील कोणत्याही भागाचे पुनर्निर्माण अथवा वापर करता येणार नाही. सर्व हक्क राखून ठेवण्यात आले आहेत.

---

# अनुक्रमणिका


| | |
|---|---|
| लेखिकेची भूमिका | ०५ |
| व्रतस्थ गांधीवादी | ०८ |
| तळसंद्याचा प्रयोग | १५ |
| श्री मारुती भोसले गुरुजींची मुलाखत | ३६ |
| व्यक्तित्वाची मूलद्रव्ये | ४० |
| व्यक्तित्वाचा परिघ | ५१ |
| डॉ. भाऊसाहेब गुळवणी यांची मुलाखत | ६२ |
| आठवणींचा सुखद गारवा | ६८ |
| संक्षेप व संदर्भ | ११६ |
| परिशिष्ट - १ | ११९ |


# बोले तैसा चाले



श्री बाबूराजे तथा चि.गो.येडूरकर

१९२३–१९७०

# आत्मबलाचा स्त्रोत




श्री स.आ.तथा बापूसाहेब गुळवणी

एक धागा सुखाचा




पत्नी शकुंतला (सुलभा) समवेत बाबूराजे

शेरी मळ्यातील विरंगुळा




श्री बापूसाहेब गुळवणी, श्री अप्पा पाध्ये यांच्या समवेत बाबूराजे

चि.नलिनीच्या विवाहाचे संस्मरण



डावीकडून चंद्रकांत तुकदेव, नंदिनी, मामा, मकरंद व  नलिनी
व विलासराव मागे उभे किरण, मोहन

असंख्य घडामोडींचा साक्षीदार



नेबापूर (पन्हाळा) येथील गुळवणी मामांचा वाडा

# लेखिकेची भूमिका

प्रथमत: हे नमूद करणे आवश्यक आहे की हे पुस्तक ही सामुहिक निर्मिती आहे. तळसंद्याच्या ग्रामस्थांच्या भावना लक्षात घेऊन डॉ.भाऊसाहेब गुळवणी व मोहन येडूरकर यांनी ही संकल्पना मांडली व त्यांच्यासह दादांवर प्रेम करणाऱ्यां सर्वांनी मिळून या पुस्तकाची निर्मिती केली. लेखन हा त्यातील माझा खारीचा वाटा.

ध्यासप्रवास हा व्यक्तिविमर्श आहे. चरित्राच्या रूढ रूपापेक्षा थोडासा वेगळा प्रकार. श्री. बाबूराजे तथा चिदंबर गोविंद येडूरकर यांचे जीवितकार्य केंद्रस्थानी ठेवून त्यांच्या व्यक्तिमत्वाला लपेटलेल्या वास्तवाचे वर्णन, विवेचन आणि दर्शन घडविण्याचा हा प्रयत्न आहे. हे लेखन करणे आव्हानात्मक होते. एका बाजूला मी बाबूराजांची मुलगी असल्यामुळे त्यांच्याबद्दलचा जिव्हाळा आणि माझ्या अस्मितेतच मुरलेला त्यांच्याबद्दलचा आदर तर, दुसऱ्या बाजूला वस्तुनिष्ठपणे, विवेकाधारित मांडणी करण्याची महत्त्वाकांक्षा; या दोन्होतील ताणामुळे हे आव्हान अधिक पिळदार झाले होते. भावविवशता, गौरवीकरण आणि कृतक चटकदारपणा टाळणे आणि भावनात्मकतेची बूज राखून व्यक्तिमत्त्वाचा वस्तुनिष्ठरीतीने वेध घेणे या दोन्हीतील तोल सांभाळण्यासाठी मी एक वेगळा रूपबंध वापरला. विश्लेषण, विवेचन, मुलाखती आणि आठवणी यांची सरमिसळ असलेला हा रूपबंध यथोचित आहे की नाही हे वाचकांनी ठरवावे.

हे काम करीत असताना नेहमी येणाऱ्या आठवणीं प्रमाणेच, विस्मृतीत गेलेले गतकाळातील अनुभवही पडद्याबाहेर आले. त्यांच्याबद्दल थोडे लिहिणे अस्थानी होणार नाही. ते अनुभव असे-

एकदा नेबापुरातील घरातल्या माडीवरच्या खोलीत मी व दादा

बसलो होतो. खोलीला एक भलीमोठी खिडकी होती. त्या खिडकीतून पन्हाळ्यावरची सज्जा कोठी, नायकिणीचा सज्जा, गडाच्या पायथ्याची वस्ती, लालभडक मातीची घसरगुंडी कम टेकडी, भातशेतीचे वाफे, देवाकडच्या समाधीचे पत्रे, थोरातांच्या कमळेच्या देवळापुढची दीपमाळ असं खूप काही दिसायचं. त्या खिडकीतून आपलं शेत दिसतं म्हणून दादांना ती आवडायची. सूत कातताताही ते त्याच खिडकीशी बसत असत. तर आम्ही तिथं बसलो होतो. दादा माझा अभ्यास घेत होते. बाहेर पावसाने चांगलाच ठेका धरला होता. दादा म्हणाले, 'बाहेर बघ, काय दिसतंय तुला?' पावसाकडे पहात मी उत्साहानं म्हटलं, 'पाऊस! असा पाऊस पडत असताना म्हातारी आईच्या शेगडीजवळ शेकत बसायला मला फार आवडतं.' दादा म्हणाले, 'जरा लांबवर बघ. एवढ्या पावसातही अंगावर इरलं घेऊन माणसं शेतात काम करतायत. सर्दी-पडशाची, ताप-खोकल्याची पर्वा न करता ती काम करतायत म्हणून आपल्याला निवाऱ्याला राहता येतंय.' दादांच्या आवाजात कंप होता. डोळे किंचित पाणावले होते. मी त्यांना घट्ट बिलगले. मला थोपटत ते म्हणाले, 'खाणारे आणि कष्ट करणारे यात भेद असता कामा नये. आपण कष्ट करून खावं हे बरं.' ह्या आठवणीनं माझा अनेकवेळा पाठलाग केला आहे. भरकटलेल्या पांढरपेशा मनाला जमिनीवर आणलं आहे.

आणखी एकदा मोठी गंमत झाली. चौथीत शिकत असतानाची गोष्ट. त्या दिवशी शाळा सुटली आणि आम्ही मुली मुली शाळेपुढच्या पटांगणातील वडाच्या झाडाखाली थांबलो होतो. एरवी माझ्याशी गोडी गुलाबीने वागणाऱ्या मुलींना अचानक मला चिडविण्याची लहर आली. कुणाचे तरी माझ्या हातांकडे लक्ष गेलं. हातांत नेहमीप्रमाणे बांगड्या नव्हत्या. त्यांच्यात डोळ्यांच्या खाणाखुणा झाल्या आणि पमी म्हणाली, 'भुंडा-भुंडा हात-नवरा करतो भात' ....मग सगळ्यांनीच तसं म्हणायला सुरुवात केली. मी रडकुंडीला आले. पळतच घरी गेले. दादा घरात होते. मी रडत रडत त्यांना सगळं सांगितलं. जरासं हसून माझा गालगुच्चा घेऊन ते म्हणाले, 'अगं बरं झालं की मग. नवऱ्यानं भात केला तर तुला दुसरं काहीतरी करता येईल.' माझं रडू कुठल्या कुठं

पळून गेलं. त्या वेळीही ती कल्पना मला आकर्षक वाटली होती. पुढेही ती माझ्या अस्मितेचा भाग बनली.

अशा शेकडो, हजारो अनुभवांनी भरलेलं माझं भावविश्व दादांच्या अकाली मृत्यूनं हादरलं. त्याची मोडतोड झाली. त्या वेळी मी वसतिगृहात रहात होते. मी झोपेतच उठून खोलीची कडी काढून बाहेर जात असे. मला कशाचेही भान रहात नसे. त्या काळात कालिंदी नानिवडेकर आणि धोंडूताई कुलकर्णी या रूममेट्सनी मला फार सांभाळले. पुढे हळूहळू मी पूर्ववत झाले. आता त्यानंतर कित्येक वर्षांनी हे व्यक्तिविमर्शाचे काम करताना दादांच्या सहवासाचा परोक्ष का होईना पण आनंद मिळाला. त्यांच्याबद्दलच्या अनेकांच्या आठवणींतून काही गोष्टी नव्याने कळल्या. काही तप्रशील अधिक अर्थपूर्ण झाले. धूसर झालेली प्रतिमा अधिक ठाशीव, ठळक झाली. हे लेखन पूर्ण झाले ह्याचे समाधान आहे आणि त्याचबरोबर गतकाळाशी, दादांशी सांधा जुळण्याचा अनुभव संपला याचे दुःखही.

'ध्यासप्रवास' लिहिताना माझ्या डोळ्यांसमोर माझी नातवंडं होती. पणजोबाच्या जीवनशैलीचा धागा मी त्या लहानग्यांच्या आयुष्याशी जोडत होते. त्यांच्याशीच नव्हे तर त्यांच्या सारख्या अनेकांशी! आजचेच नव्हे तर उद्याचे, भविष्यकाळातील वाचकही हा ध्यासप्रवास आपलासा करतील असा मला विश्वास वाटतो.

प्रस्तुत संदर्भात ज्यांनी आपले अनुभव सांगितले, आठवणी लिहून दिल्या, माहिती पुरवली त्या सर्वांचे मनःपूर्वक आभार. मृणालने मुद्रिते तपासण्यास मदत केली,त्यामुळे काम वेळेत पूर्ण झाले. मुखपृष्ठ तयार करणारे विशाल कुमठेकर, मुद्रक मुरारी मुद्रणालय आणि त्यांचे सहकारी यांचेही आभार.

श्री. दिलीप पांगे यांनी दैनंदिनी जपून ठेवल्याबद्दल त्यांचे खूप खूप आभार.

**रोहिणी तुकदेव**
सांगली

# व्रतस्थ गांधीवादी

## प्रास्ताविक

खरं सांगायचं तर, एखादे सामाजिक ध्येय निश्चित करून, त्याच्या पूर्तीसाठी निःस्वार्थीवृत्तीने आयुष्यभर कार्य करीत राहाणाऱ्या व्यक्तींच्या जीवितकार्याचे स्मरण करण्याची, त्या पासून प्रेरणा घेऊन छोटेसे का होईना पण एखादे सामाजिक क्षेत्र निवडून आपल्या कुवतीप्रमाणे काम करण्याची, पूर्वी कधीही नव्हती एव्हडी निकड आज निर्माण झाली आहे.

सभोवतालची सामाजिक परिस्थिती गुंतागुंतीची, बिकट आणि अनेक विसंगतींनी भरलेली आहे. हरितक्रांतीमुळे देश अन्नधान्याच्या बाबतीत स्वयंपूर्ण झाला असे २००३-०४ पासूनचे अहवाल सांगत आहेत पण; दुसरीकडे आपल्या महाराष्ट्रात आत्महत्या करणाऱ्या शेतकऱ्यांची संख्या दिवसेदिवस वाढतेच आहे. साक्षरता प्रसार झपाट्याने झाला, खेड्या-पाड्यात, वाड्या-वस्तीत शाळा निघाल्या, तालुक्याच्या ठिकाणी महाविद्यालये उघडली गेली पण; अजूनही लाखो मुले शाळेत प्रवेशच करू शकत नाहीत, करीत नाहीत अशी परिस्थिती आहे. बॉम्बे हाउसवर्कर्स सॉलिडॅरिटी या संस्थेने प्रतिवर्षी ४५ हजार अल्पवयीन मुली घरकामासाठी मुंबईतील हिंदी वस्त्यांमध्ये झारखंड, उत्तर प्रदेश, राजस्थान येथून आणल्या जातात असे नोंदविले आहे. (हेरंब कुलकर्णी, २०१५ पृ. १५९) अर्थात त्यांच्या शिक्षणाचा पाढा नन्नाचा. मन विषण्ण करणाऱ्या अशा अनेक घटना आहेत, त्यात भर म्हणून अस्मितेच्या राजकारणामुळे सर्वांची मने परस्परांबद्दल कलुषित झाली आहेत. परस्परांवरचा विश्वास उडाला आहे. १९९० पासून भारताने जागतिकीकरणाचे, आर्थिक उदारीकरणाचे धोरण स्वीकारले आहे. परिणामी भारतीय उद्योग, कृषी व वित्तीय क्षेत्रात बहुराष्ट्रीय कंपन्यांचा

आणि जागतिक भांडवलशाहीचा वावर वाढला आहे. सामाजिक आणि वैयक्तिक जीवनाच्या प्रत्येक भागावर त्याचा परिणाम झाला आहे, होत आहे. दुसरीकडे जागतिक मंदीच्या लाटेमुळे तरूण नोकरदार वैफल्यग्रस्त झाले आहेत आणि उद्योजक भांभावले आहेत. या विसंगत, विचित्र आणि जिच्या बद्दल आडाखे बांधता येणार नाहीत अशा परिस्थितीत एक प्रकारची बधीरता, कुंठितता, निष्क्रियता येणे स्वाभाविकच आहे. या अवस्थेतून बाहेर पडण्यासाठी, समाजात सळसळते चैतन्य निर्माण होण्यासाठी जीवनाची आशादायक स्वप्ने पहाता येण्यासाठी, बाबूराजे तथा चिदंबर गोविंद येडूरकर यांच्यासारख्या सौम्य प्रकृती, निरभिलाष वृत्तीने समाजाशी समरस होऊन काम करणाऱ्या व्यक्तीच्या जीवितकार्याचा परिचय करून घेणे, त्यांच्या भूमिकेची व विचारांची चिकित्सा करणे आणि त्यांच्या नेहमी हसतमुख असण्याचे, सकारात्मक विचार करण्याचे रहस्य समजून घेणे निश्चितच फलदायी ठरेल.

बाबुराजांना भेटायचे कुठे आणि केव्हा? उत्तर अगदी सोपे आहे. जिथे मुले खेळत, व्यायाम करीत अथवा अभ्यास करीत असतील, जिथे युवक आपल्या भावी आयुष्याची पायाभरणी करण्यासाठी शरीर व बुद्धी कष्टवीत असतील, जिथे ग्रामसफाई, सूतकताई या सारखे उपक्रम चालू असतील, श्रमदानाने आणि सामुहिक पद्धतीने काम चालू असेल किंवा जिथे शेतीविषयक प्रश्नांची चर्चा चालू असेल तिथे बाबूराजांचे अस्तित्व नक्कीच असेल. अशा अनुभवांत त्यांना आपल्या आयुष्याचा अर्थ गवसला होता. त्यामुळे बाबुराजांच्या चरित्राचा शोध घेताना त्याचा प्रारंभ त्यांच्या सामाजिक कार्यापासून करणे अधिक योग्य ठरेल. वैयक्तिक अथवा कौटुंबिक जीवनातील सुख-दुःखापेक्षा त्यांनी सामाजिक कार्याला, ध्येयपथावरील वाटचालीला अधिक महत्त्व दिले आणि म्हणून या चरित्राचा प्रारंभ पारंपरिक पद्धतीने जीवनकथा सांगून करण्याऐवजी बाबुराजांच्या कार्यकर्तृत्वाचा वेध घेण्यापासून करण्याचे योजिले आहे.

एक निश्चित विचारसरणी पत्करून बाबुराजांनी आपल्या कार्याला सुरूवात केली आणि अखेरपर्यंत त्याच मार्गावर ते अविश्रांतपणे चालत राहिले. त्यांची ही वैचारिक भूमिका समजून घेणे अगत्याचे आहे.

# ध्येयधोरणे

महात्मा गांधींच्या आचारविचाराने आणि उपदेशाने ज्या व्यक्ती प्रभावित झाल्या आणि त्यामुळेच ज्यांनी व्रतस्थपणे सामाजिक कार्याला स्वतःला वाहून घेतले त्यांच्यापैकी एक सेवारत व्यक्तिमत्त्व, निरलस कार्यकर्ता ही चिदंबर तथा बाबूराजे गोविंद येडूरकर यांची यथार्थ ओळख म्हणायला हवी.

बाबूराजांच्या जन्मापूर्वी (४ सप्टें. १९२३) सुमारे आठ वर्षे, महात्मा गांधी दक्षिण आफ्रिकेतील सत्याग्रहाची चळवळ आणि जनआंदोलन यशस्वी करून भारतात परत आले (सन १९१५) आणि त्यांनी कोचरब येथे सत्याग्रह आश्रमाची स्थापना करून सुमारे वर्षभर भारतभर भ्रमंती करून येथील परिस्थितीचे निरीक्षण केले. काही स्थानिक प्रश्न हाती घेऊन ते सत्याग्रही पद्धतीने सोडविले. तेव्हापासून ते त्यांच्या मृत्यूपर्यंत (३० जाने. १९४८) महात्मा गांधींनी आपले जीवन सत्य, अहिंसा, अपरिग्रह या मूल्यांसाठी आणि स्वदेश, ग्रामोद्धार, अस्पृश्यता निवारण या सामाजिक कार्यासाठी समर्पित केले. केवळ भारताला – भारतीय जनतेला नव्हे तर, संपूर्ण जगाला सत्याग्रहाचा नवा मंत्र दिला. हिंसा संपवू शकणारे नवे तंत्र दिले. म्हणूनच, त्यांच्या कार्यकाळात आणि त्यानंतरही सर्व जगाला त्यांनी प्रभावित केले. विसाव्या शतकातील अत्यंत बुद्धिमान शास्त्रज्ञ आइनस्टाइनने गांधीजींच्या मृत्यूनंतर त्यांना वाहिलेली आदरांजली बोलकी आहे. ते लिहितात,

"——— It was his unshakable belief that the use of force is an evil in itself, to be shunned by those who strive for absolute justice. To this faith he

devoted his whole life, and with this faith in his heart and mind he led a great nation to its liberation. He demonstrated that the allegiance of men can be won, not merely by cunning game of political fraud and trickery, but through the living example of a morally exalted way of life.

—— Revolution without the use of violence was the method by which Gandhi brought about the liberation of India. It is my belief that the problem of bringing peace to the world on a supra-national basis will be solved only by employing Gandhi's method on a large scale.

— Generations to come will scarce believe that such a one as this ever in flesh and blood walked upon the earth.(गोखले, १९९६, पृ. २)

अनेकांच्या भावना या आदरांजलीत समूर्त झाल्या आहेत. सामान्यातल्या सामान्य माणसापासून ते आइनस्टाइनसारख्या थोर बुद्धिमंतांपर्यंत अनेकविध स्त्री-पुरूष, लहान मोठे, विविध जाती-धर्माचे-वर्णाचे, गरीब-श्रीमंत लोक, साम्राज्यकर्ते तसेच परतंत्र - परस्वाधीन, बलवान आणि दुबळे, सशक्त तसेच लुळे पांगळे - अशा सर्व लोकांना गांधीजींनी आपल्या प्रभावक्षेत्रात खेचून घेतले, त्यांना विरोधही खूप झाला, तीव्र, बोचरी, विखारी टीका त्यांच्यावर झाली पण त्या विरोधाला आणि टीकेला न जुमानता गांधीजींचा प्रभाव वाढतच गेला. बाबूराजे अगदी लहानपणापासून या प्रभावक्षेत्रात होते. त्यांचे वडील काँग्रेसचे पाईक होते. त्यांनी स्वातंत्र्यपूर्वकाळात बेळगावात व बेळगाव जिल्ह्यातील काही गावात काँग्रेसचा प्रचार करण्यासाठी व्याख्याने दिली होती. बाबुराजांवर निरातिशय प्रेम करणारे, त्यांना वाढविणारे, पालन-पोषण करणारे त्यांचे मामा - स.आ. तथा बापू साहेब गुळवणी आचाराने आणि विचाराने गांधीवादी होते. त्यामुळे, अगदी शाळकरी वयात बाबुराजांवर गांधी-विचारांचे, गांधीवादी

जीवनशैलीचे संस्कार झाले. पुढे कॉलेजमध्ये गेल्यावर ते राष्ट्रीय चळवळीकडे ओढले गेले. पुण्यामध्ये शेती कॉलेजात असताना ते राष्ट्रसेवादलाची शाखा चालवीत असत. महात्मा गांधींच्या प्रार्थनेच्या वेळी आवर्जून हजर रहात असत. पुण्यातल्या म.गांधींच्या प्रार्थनेची व्यवस्था ज्या सेवादलाच्या युवकांकडे असे त्यात बाबुराजेही होते. एस्.एम्. जोशी, ना.ग. गोरे, ग.प्र. प्रधान, मायदेव यांना ते भेटत, त्यांचे विचार ऐकत, चर्चा करीत. या सगळ्याचा परिणाम म्हणून ते अंतर्बाहय गांधीवादी होत गेले.

कॉलेजमध्ये असल्यापासूनच ते खादीचे कपडे वापरील असत. स्वतः चरख्यावर सूत काढून त्याचे हातमागावर कापड विणून आणून शिवलेले कपडे ते वापरीत. शर्ट, पायजमा, टोपी, साध्या चपला असा त्यांचा वेष असे. कपड्यांचे दोनच संच असत.

केवळ बाह्य परिवेष नव्हे तर आंतरिकरित्या गांधीजींच्या विचारकल्पातील कार्यकर्ता बनण्याचा त्यांनी कसोशीने प्रयत्न केला. स्वतः शुद्ध होऊन आत्मोन्नती साधण्याचा उपासनामार्ग निवडला. गांधीजी खेड्यात काम करणाऱ्या कार्यकर्त्यांविषयी पुष्कळ अपेक्षा बाळगीत. १९३४ साली त्यांनी लिहिले -

"All his hours minus the eight hours of sleep and rest will be fully occupied with some work. Bodily sustenance should come from bodily labour and intellectual labour is necessary for the culture of the mind."

श्रमविभाग असणारच, पण बौद्धिक श्रम असणारे नि शारीरिक श्रम करणारे असे विभक्त वर्ग नसावेत. कार्यकर्ता हा मूर्तिमंत उद्यम हवा. त्याने खादीनिर्मितीच्या सर्व प्रक्रियांवर प्रभुत्व मिळवावे, त्याने गावात शिकवायला जावे नि शिकायलाही जावे. गावच्या सर्व गोष्टीत त्याने लक्ष घालावे. त्याने आपले घर नि परिसरही कित्ता घेण्यासारखा स्वच्छ ठेवावा. स्वतः झाडू नि टोपली घेऊन गावाच्या स्वच्छतेला हातभार लावावा. त्याने गावासाठी दवाखाना थाटू नये पण, क्विनिन, आयोडीन,

एरंडेल यासारखी नित्योपयोगी औषधे जवळ बाळगावी. गावातल्या हरिजनांत त्याने मिसळावे आणि त्यांच्या सुखसोयींकडे विशेष लक्ष द्यावे. (गोखले, १९९६, पृ. २५०)

म. गांधींच्या या अपेक्षा पूर्ण होतील अशी जीवनशैली बाबुराजांनी स्वीकारली. त्यांच्या दैनंदिन कामकाजाकडे धावती नजर टाकली तरी याची खात्री पटते. बाबूराजे पहाटे ४.३० वाजता उठत. गावातील तळ्यात आंघोळ करून, तिथल्या महादेवाच्या मंदिरात जाऊन ते घरी परत येत आणि मोठ्या प्रेमाने छात्रालयातील मुलांना उठवीत. त्यांच्या बरोबर व्यायाम करीत. त्यानंतर प्रार्थना होई व मुले अभ्यासाला बसत. त्यांच्या अभ्यासविषयातील शंकांचे निरसन करणे, अवघड भाग सोपा करून शिकविणे इ. चालू असतानाच त्यांचे चरख्यावर सूत काढणेही चालू असे. यानंतर गावातील लोकांच्या भेटीगाठी आणि त्यानंतर एका मळ्याकडे चक्कर असे. दुपारी वाचन, सहकाऱ्यांबरोबर चर्चा झाल्यावर सायंकाळी गावातील सर्व शिवारातून फेरफटका मारीत. शेतांचे, पिकांचे निरीक्षण करीत. सायंकाळी प्रार्थना आणि पुन्हा छात्रालयातील मुलांना शिकविणे असा एकूण दिवसाचा कार्यक्रम असे. दर शुक्रवारी छात्रालयातील मुले व अन्य सहकाऱ्यांबरोबर ग्रामसफाई असे. या शिवाय, मुलांना व गावातील लोकांना सूतकताई शिकविणे, शेतीविषयक सल्ला देणे, शेतात प्रयोग करणे, लोकांच्या बैठका घेणे अशा उपक्रमांनी त्यांचा दिवस गजबजून जाई. आपल्या दैनंदिन जीवनात स्वावलंबन आणि गरजा कमीत कमी ठेवणे यावर त्यांचा कटाक्ष होता. एक अत्यंत साधे, शुचिर्भूत आणि साध्य-साधनाचा विवेक सांभाळणारे असे त्यांचे जीवन होते. नम्रता आणि सेवाभाव या साधनांनिशी त्यांनी आयुष्यभर सामाजिक कार्य केले.

गांधीजींच्या मृत्यूनंतर, १५ मार्चच्या सुमारास सर्व गांधीभक्त एकत्र आले. या संमेलनाचे अध्यक्ष डॉ. राजेंद्रप्रसाद होते. पंडित नेहरू, विनोबा असे सर्वजण जमले होते. या संमेलनात सर्वोदय समाजाची कल्पना मांडण्यात आली. जो कोणी खादी, ग्रामोद्योग, अस्पृश्यता

निवारण, जातीय ऐक्य अशी गांधी विचाराशी जुळणारी कामे करेल त्याला सर्वोदय समाजाचा सदस्य होता येईल अशी भूमिका मांडली गेली. अप्पासाहेब पटवर्धनांनी अंत्योदयाची कल्पना मांडली तीही सर्वांनी उचलून धरली. सर्व भारतभर सर्वोदय - अंत्योदय समाजाची स्थापना करण्यासाठी प्रत्येक कार्यकर्त्याने मनःपूर्वक काम करण्याचे आवाहन करण्यात आले. (शेकडे, २०१० पृ. ९९) बाबूराजांनी तळसंदे गावात सर्वोदय समाजाच्या तत्त्वांच्या प्रकाशात काम सुरू केले आणि अगदी थोड्याच काळात तळसंदे ही प्रयोगभूमी झाली. नवे, उत्साही कार्यकर्ते तयार झाले. गावाचे रंग-रूप बदलून गेले एवढेच नव्हे तर, गावातील लोकांच्या जीवनशैलीतही बदल झाले. बाबुराजांच्या सामाजिक कार्याचा इतिहास आणि तळसंदे गावाच्या परिवर्तनाचा इतिहास हे दोन्ही एकमेकात बेमालुम मिसळले आहेत. त्याचा विचार पुढील भागात करू.

बाबुराजांची विचारसरणी आणि जीवनशैली या दोन्हींवर त्यांच्या मामांच्या विचाराचा व जीवनपद्धतीचा मोठा प्रभाव होता. मामा गांधीवादी होते. त्यांच्या बरोबर अनेक विषयांवर चर्चा करून बाबुराजांनी आपल्या जीवनाची दिशा ठरविली होती. तळसंदे गावात राहून सामाजिक कार्य करण्याचा निर्णयही त्यांच्या संमतीनेच घेतला होता. तळसंद्याच्या या प्रयोगाचा इतिहास मोठा वेधक आहे.

---

# तळसंद्याचा प्रयोग

कोल्हापूर जिल्ह्यातील, वारणेच्या परिसरातील तळसंदे हे एक छोटेसे गाव. गावाच्या उशाला स्वच्छ, गोड पाण्याचे तळे आणि त्याला लागून सह्याद्रीच्या रांगांतील एक टेकडी असे नैसर्गिक वैभव लाभल्यामुळे गाव मोठे विलोभनीय वाटते. तळ्याला इथे एकूणच महत्त्व फार आहे. खरं तर गावाचे मूळ नाव तळस्थ. अजूनही काही लोक संभाषणात तळस्थ नावाचा वापर करतात. तळस्थ म्हणजे तळ्याकाठी वसलेले. पुढे या नावाचे संस्कृतिकरण होऊन तळसंदे असे एकप्रकारचा सांगितिक गोडवा असलेले नाव रूढ झाले. तळसंदे हे मामांचे इनाम गाव. गावात त्यांचा वाडा आहे. मामा असताना वाड्यात खूप ये-जा, ऊठ बस असत असे. मामांचे साधुत्व, गावाच्या परिसरातील २५० एकर जमीन भूमीहिनांना देऊन टाकण्याचा उदारपणा, गावातील लोकांना अडी-अडचणीत मदत करणे, त्यांच्यावर मोफत वैद्यकीय उपचार करणे इ. बद्दलची त्यांची तळमळ आणि एकंदरच त्यागी, परोपकारी व्यक्तिमत्व यामुळे गावकऱ्यांच्या मनात मामांबद्दल असलेली आदराची भावना श्रद्धा वाटावी अशा पातळीपर्यंत पोहोचली होती.

मामा गांधीवादी होते. गांधीजींच्या विचारातील आदर्श खेड्याची कल्पना तळसंद्यात राबवून पहावी, गावाला नवा सामाजिक चेहरा-मोहरा द्यावा यासाठी ते प्रयत्न करीत होते. त्यांचे भाचे, बाबूराजे तथा चिदंबर गोविंद येडूरकर त्यांना याकामी सहाय्य करीत होते. पण, स्थितिशील गाव बदलायला तयार नव्हता. लोक आपली जुनी रीत, जगण्या-वागण्याची जुनी पद्धत बदलायला तयार नव्हते. नवीन गोष्टी आदराने ऐकत होते पण, प्रत्यक्षात आणत नव्हते. कोरडवाहू जमीन,

पाणी नाही – त्यामुळे शेतीत उत्पन्न नाही, जगण्याला फारसा आधार नाही, असे असूनही गावाने दैवावर हवाला ठेवून स्वतःला कोशात बंदिस्त करून घेतले होते. नैसर्गिक साधनसंपत्तीचे वैभव लाभलेले गाव आतून असे केविलवाणे, बिचारे झाले होते.

सन १९४८ नंतर हळूहळू या परिस्थितीत बदल होत गेला. बाबुराजे आपले शिक्षण संपवून १९४६ मध्ये घरी परत आले होते आणि नेबापूरच्या परिसरात त्यांनी सामाजिक कार्याला सुरूवातही केली होती. नोकरी करायची नाही, खेड्यात राहून सामाजिक कार्य करावयाचे; हे त्यांनी पुण्यात ॲग्रीकल्चर कॉलेजमध्ये शिकत असतानाच पक्के ठरविले होते. त्यावर ते ठाम होते. सन १९४८ मध्ये झालेल्या गांधीवधानंतर त्यांनी आपले वास्तव्य तळसंद्यात हलविले आणि तेथील मामांनी सुरू केलेले सामाजिक कार्य पुढे चालू ठेवायचे ठरवले. मामांच्या बरोबर चर्चा करून कामाची दिशा ठरविली, आखणी केली आणि जोमाने कामाला सुरूवात केली. त्यातून त्यांची कार्यशैली विकसित होत गेली आणि त्यातून पुढे उभा राहिला, आकाराला आला तळसंद्याचा प्रयोग! मामांची भूमिका केंद्रस्थानी ठेवून सुरू झालेल्या या प्रयोगाला मामांचा भरघोस पाठिंबा होता आणि वाडा हे सर्व उपक्रमांचे मध्यवर्ती ठिकाण!

गावातील कामाची सुरूवात काही लोकांचे आर्थिक दृष्ट्या डबघाईला आलेले संसार सावरण्यापासून झाली. काही थोडी मदत करून अथवा उधार-उसनवार पैसे देऊन हा प्रश्न सुटण्यासारखा नव्हता. कायमस्वरूपी उपायासाठी ठोस पावले उचलण्याची आवश्यकता होती. गावातील मुख्य व्यवसाय शेती पण शेतीला पाणी नाही. जवळ नदी होती पण तिचे पाणी शेतापर्यंत पोहोचणार कसे हा प्रश्न होता. पाणी पुरवठा संस्था काढून, सरकारी योजनेतून अर्थसहाय्य, तंत्रसहाय्य घेऊन आवश्यक तेथे श्रमदान करून नदीतील पाणी पाइपच्या मार्फत शेतीकडे वळविले. पुढे, एकूण तीन पाणी पुरवठा संस्था कार्यरत राहिल्या. त्यातून पाण्याचा प्रश्न काही प्रमाणात तरी सुटला आणि बाबुराजांनाही कामाची एक शृंखलाशैली सापडली. या नंतर मध्ये बराच काळ उलटला आणि बाबुराजांनी पिण्याच्या आणि घरगुती वापरासाठीच्या पाण्याचा प्रश्न

हाती घेतला. लोक दररोज पिण्यासाठी आणि खर्चासाठी लागणारे पाणी कावडीने आणत असत. ते दुरून आणावे लागत असल्यामुळे लोकांचे श्रम आणि वेळ असे दोन्ही खर्ची पडत. बाबुराजांनी गावकऱ्यांसमोर एक योजना मांडली आणि ग्रामपंचायतीच्या माध्यमातून, सायफनने तळ्यातील पाणी गावातल्या हौदात सोडायचे आणि ते नळाने घराघरापर्यंत पोहोचवायचे ही कल्पना प्रत्यक्षात आली. पुढे दहा एक वर्षानंतर ही योजना मोडीत निघाली. आज, त्याचे अवशेष रूप म्हणून बांधीव हौद तेवढा आहे. सध्या, नदीतील पाणी गावाला नळाने पुरविले जाते. पण पाण्याचा प्रश्न काही सुटलेला नाही. चार-चार दिवस पाणी येत नाही, गावाला जलशुद्धीकरणकेंद्र नसल्यामुळे पाणी स्वच्छ, निर्मळ मिळत नाही, अशा प्रश्नांच्या सोडवणुकीसाठी काय करावे, हा लोकांपुढे प्रश्न आहे. पुन्हा एकदा, तळ्यातील पाणी गावात फिरवून पाण्याच्या बाबतीत गाव स्वयंपूर्ण करावे, असा विचार मांडला जातो आहे!

विवेचनाच्या ओघात आपण काळाचे बरेच अंतर ओलांडले. आता पुन्हा, थोडे मागे जाऊ. गावातील लोकांच्या मदतीसाठी मामांनी आधीच धान्याची भिशी सुरू केली होती. तिला बाबुराजांनी सुव्यवस्थित रूप दिले. तिचे एका सामाजिक संस्थेत रूपांतर झाले.

**धान्याची भिशी** – कोरडवाहू जमीन, पावसाचे मान अनिश्चित आणि शेतीशिवाय उद्योगाचे दुसरे साधन नाही, या मुळे गावातील लोकांची परिस्थिती यथातथा होती. सधन लोक फार थोडे. पावसाळ्याच्या सुमारास शेतकऱ्यांकडील धान्य संपे आणि परिस्थिती आणखीनच बिकट होई. मग कोणाकडून तरी उधार-उसनवार धान्य घेऊन किंवा व्याजबट्टयाने पैसे घेऊन नड भागवायची आणि पुढे सुगीच्या वेळी परत करायचे असा लोकांचा शिरस्ता होता. यात त्यांचे आर्थिक नुकसान होई शिवाय, त्यांना अपमानास्पद बोलणी ऐकून घ्यावी लागत. मिंधेपणाची भावना मनात निर्माण होई. या परिस्थितीत बदल घडवून आणण्याच्या दृष्टीनें मुष्टिफंड तथा धान्य भिशी सुरू झाली.

योजना अशी होती – प्रत्येकाने सुगीच्या दिवसात शक्यतो चार पायलीच्या पटीत धान्य आणून भिशीत जमा करायचे. ते कोठारात (ही

जागा वाड्यातच होती) काळजीपूर्वक ठेवले जायचे, व पावसाळ्यात प्रत्येकाने आपापले धान्य परत न्यायचे. अशा प्रकारे पावसाळ्यातील धान्याची चणचण कमी होऊ शकते. गावातील सधन शेतकऱ्यांना बाबुराजांनी सांगितले की ज्यांच्या घरी दोन-तीन वर्षांचा धान्यसाठा असतो, त्यांनी भिशीला दिलेल्या धान्यातील थोडे तरी धान्य एक वर्ष उशीरा न्यावे, ते आपण गरजूंना उसने देऊ व सुगीनंतर ते त्यांच्या कडून परत घेऊ, लोकांनी हे म्हणणे मान्य केले. मामा भिशीत धान्य ठेवीत आणि ते परत घेत नसत.

सन १९६२ मध्ये पुन्हा एकदा धान्यभिशीच्या रचनेत बदल करण्यात आला. याची नोंद बाबुराजांच्या दैनंदिनीत आहे. (१४ जाने. ६२) बदल असा – ठेव पद्धतीने प्रथम धान्य घेऊन त्याला १ पायली व्याज देऊन भांडवल जमविणे. ठेव परत करणे. सभासदांच्या गरजेपेक्षा अधिक होणाऱ्या धान्याची विक्री करून ती रक्कम परिवार खर्चासाठी वापरणे. सुगीत धान्य खरेदी व कापणीच्या वेळी विक्री करणे. रजिस्टरवर सह्या घेऊन सर्व व्यवहार होत असे आणि हिशेब चोख असे.

तळसंद्याप्रमाणे नेबापूर आपटीतही त्यांनी धान्याची भिशी सुरू करून लोकांची अडचण काही प्रमाणात दूर केली. आजही तिथे धान्य भिशी उपक्रम सुरू आहे.

धान्यभिशीप्रमाणे उपयुक्त ठरलेला आणखी एक उपक्रम म्हणजे पैशाची भिशी अर्थात – पैसा फंड योजना.

**पैसा फंड योजना –**

पैसे फंड योजनेसारखे उपक्रम महाराष्ट्रात एकोणिसाव्या शतकातच सुरू झालेले दिसतात. गोविंद बाबाजी जोशी यांच्या वसई असोसिएशनने १८६२ साली सहकारी पतपेढीचा प्रयोग केला होता. अरूण जोशी यांच्या मते ती महाराष्ट्रातील, किंबहुना हिंदुस्थानातील पहिली सहकारी पेढी होती. (अरूण जोशी, प्रस्तावना – गोविंद बाबाजी जोशी – पृ. ५१) गोविंद बाबाजींनी 'सार्वजनिक पैसा फंडाची योजना व त्या वरील पुस्तिका' नावाची एक पुस्तिका सन १८७३ मध्ये प्रकाशित केली. त्यात या योजनेचा उद्देश सांगताना, 'लोकांकडे पाहिले

तर दरिद्राशी लढता लढता अगदी हरून जाऊन त्याचे दास होऊन राहिले आहेत. आज पर्यंत किती एक सभा व मंडळया लयास गेल्या त्यांचे कारण हेच होय. लक्ष्मीशिवाय तर समुदायाची कामे चालणे नाहीत ही परिस्थिती बदलण्यासाठी पैसा फंड योजना उपयोगी ठरेल' असे ते म्हणतात. (गोविंद बाबाजी जोशी रोजनिशी - पृ. ३१६) एकोणिसावे शतक संपून पुढे विसाव्या शतकाचा पूर्वार्ध संपला, राजकीय परिस्थितीत बदल होऊन स्वातंत्र्य मिळाले तरी दारिद्र्याचा प्रश्न काही सुटला नाही. १९६0 साली, या प्रश्नाच्या अंशतः सोडवणुकीसाठी बाबुराजांनी तळसंद्यात पैसा फंड योजना सुरू केली. अर्थात तिचे स्वरूप गोविंद बाबाजींच्या योजनेपेक्षा काहीसे वेगळे होते.

सन १९५९ च्या सुमारास वारणा सहकारी साखर कारखाना सुरू झाला आणि मामांनी शब्द टाकल्यामुळे तळसंद्यातील होतकरू तरूणांना कारखान्यात नोकऱ्या मिळाल्या. पगार मिळू लागला. या पार्श्वभूमीवर, या तरूणांना बचत करावयाची सवय लागावी व गरजू लोकांना अडीअडचणीच्या वेळी अल्प व्याजाने पैसे मिळावे अशा हेतूने १९६0 साली बाबुराजांनी पैसा फंड तथा पैशाची भिशी सुरू केली. प्रत्येक शुक्रवारी भोसले गुरूजींच्या घरी या संबंधीची मीटींग घेतली जाई. बाबुराजांनी दहा गटप्रमुख निवडले होते. प्रत्येक गटात १0 या प्रमाणे एकूण १00 सभासद होते. प्रत्येकाने आठवड्यात १ ₹ ते ५ ₹ पर्यंत बचत करून पैसे ठेवावयाचे अशी रीत होती. सभासदांना पासबुके दिली होती. हिशेबाचे काम भोसले गुरूजी आणि स्वतः बाबुराजे करीत. हे काम व्यवस्थित चालू झाले. गरजू लोकांना अडीअडचणीच्यावेळी कमी व्याजाने पैसे मिळू लागले. वर्ष संपल्यावर वार्षिक सभा बोलावून सभासदांना वर्षभराच्या कामाची माहिती दिली जाई. संस्थात्मक व्यवहारात लोकशाही प्रथा पाळल्या गेल्या पाहिजेत याकडे बाबुराजांचा कटाक्ष असे. त्यानुसार त्यांनी तरूण मुलांना स्वागत, अहवाल वाचन, आभार याचे प्रशिक्षण दिले व वार्षिक सभा सभेच्या मान्य पद्धतीप्रमाणे चालावी यासाठी मार्गदर्शन केले.

या योजनेचे वैशिष्ट्य हे की, कर्जाचा व्याज दर १६% व

लाभांश १२% हे निश्चित असे. त्यात बदल होत नसे. सचिवांना अथवा अन्य कोणाही काम करणाऱ्या व्यक्तीस पगार दिला जात नसे. पैसे न घेता, सेवा म्हणून कार्यकर्त्यांनी काम करावयाचे अशी कल्पना या मागे होती. एका सभेत लोकांनी विचारले, 'भिशी फोडायची कधी?' बाबुराजांनी उत्तर दिले, 'आपले एक लाख रूपये जमतील तेव्हा भिशी फोडू.' झाले, लोकांनी एक लाख रूपयांचे उद्दिष्ट गाठण्यासाठी प्रयत्न सुरू केले. यथावकाश एक लाख रूपये जमले सुद्धा पण; दरम्यान बाबुराजांचे आकस्मिक निधन झाल्यामुळे त्यांना ही चांगली घटना अनुभवता आली नाही.

पैसे फंडाचे एक लाख रूपयांचे उद्दिष्ट पूर्ण झाल्यावर, कार्यकर्त्यांनी रजिस्टर संस्था असावी या हेतूने सर्वोदय नागरी सहकारी पत संस्था स्थापन केली. आज ही संस्था चांगल्या प्रकारे कार्यरत आहे.

तळसंद्यातील उपक्रमासारखाच उपक्रम बाबुराजांनी आपटी-नेबापूर येथे सुरू केला. लोक १ ₹, २ ₹ प्रमाणे आर्थिक बचत करून रक्कम जमा करू लागले. लोकांच्या काही गरजा यामुळे भागू लागल्या. या भिशी मंडळाचा गणेशोत्सव बाबुराजांनी सुरू केला. ६५ वर्षांपूर्वी सुरू केलेला हा उत्सव अजूनही उत्साहात साजरा केला जातो.

ज्यामुळे बाबुराजांचे आणि गावाचे सूर उत्तम जुळून त्यातून मनोवेधक सुरावट जन्माला आली, बाबुराजांच्या भोवती उत्साही कार्यकर्त्यांची फळी जमा झाली आणि सर्वांच्या सहकार्यामुळे सामाजिक कार्याला गती आली असा उपक्रम म्हणजे छात्रालयाची निर्मिती हा होय.

**छात्रालय** – गावात संबंध राखताना मुले हा एक प्रमुख घटक मानूनच कार्य करायचे. त्यांना वाचन, खेळ अभ्यास या गोष्टींमध्ये प्रोत्साहन देऊन, आर्थिक व मानसिक पाठबळ देऊन सूज्ञ बनवावयाचे व मग, सामाजिक प्रश्न, स्वातंत्र्य, समता, बंधुता अशा मूल्यांचे विचार त्यांच्या मनात रूजवावयाचे अशी भूमिका ठेवून बाबुराजांनी तळसंद्यात छात्रालयाची निर्मिती केली. शिक्षणाने सुसंस्कृतता येते, जीवनमान, आर्थिक कुवत उंचावण्याचे ते एक वैध आणि सन्माननीय साधन आहे.

शिक्षणाने विचारसरणीत व जीवनशैलीत चांगला बदल होत असतो असा बाबुराजांचा विश्वास होता आणि म्हणूनच खेड्यातील मुलांना शिक्षणाची संधी आणि योग्य मार्गदर्शन मिळाले पाहिजे असे त्यांना कळकळीने वाटे. आपले कार्यक्षेत्र म्हणून निवडलेल्या तळसंदे गावात त्यासाठी त्यांनी मनापासून प्रयत्न केले. छात्रालय हे त्याचे फळ.

छात्रालयाची कल्पना अशी होती – शाळा आणि जेवण इ. चा वेळ वगळता इतर सर्व वेळ मुलांनी छात्रालयात असावे. तिथे त्यांना वाचन, अभ्यास, खेळ, व्यायाम या संदर्भातील सुविधा उपलब्ध असाव्या. अभ्यासात सहाय्य व मार्गदर्शनही केले जावे आणि अशा प्रकारे त्यांच्या बौद्धिक व शारीरिक क्षमतांची वाढ होऊन त्यातून चांगले व्यक्तिमत्व तयार व्हावे यासाठी छात्रालय तत्पर असले पाहिजे. तळसंद्यातील राष्ट्रसेवक विनयकुमार छात्रालय आणि तेथील दिनचर्या हे दोन्ही अगदी नमुनेदार होते. बाबुराजे पहाटे ४.३० ला उठत आणि तळ्यावर जाऊन आंघोळ करून येत. काही मुलांना पोहणे आवडत असे, तीही त्यांच्याबरोबर जात. परत आल्यावर ते मुलांना उठवीत. बरोबर सहा वाजता प्रार्थना असे. त्यात गीतेचा अध्याय, मनाचे श्लोक, खरा तो एकचि धर्म ही साने गुरूजींची कविता इ. चा समावेश असे. सर्वांशी सुख लाभावे । तशी आरोग्य संपदा। कल्याण व्हावे सर्वांचे। कोणी दुःखी असू नये। या श्लोकाने प्रार्थनेची सांगता होई. त्यानंतर या मुलांचा व्यायाम आणि वर्गवार व गटवार अभ्यास घेतला जाई. बाबुराजे स्वतः शिकवीत, अडचणींचे अथवा शंकांचे निरसन करीत. नऊ ते साडेनऊ या काळात बाबुराजे व भोसले गुरूजी मुलांबरोबर सूतकाताई करीत. त्यानंतर मुले घरी जात. सायंकाळी शाळा सुटल्यानंतर मुले पुन्हा वाड्यावर येत. व्यायाममंडळ, क्रीडामंडळ इ. मध्ये आवडीप्रमाणे सहभागी होत किंवा अवांतर वाचन करीत. रात्री अभ्यासिकेत अभ्यास करीत. या काळातही आवश्यकतेनुसार एक दोन गटांना बाबुराजे शिकवीत असत. रात्री दहा वाजता झोपलेच पाहिजे असा दंडक होता. रोज रात्री दोनच्या सुमारास उठून बाबुराजे मुले नीट झोपली आहेत की नाहीत ते पहात. त्यांच्या अंगावरील पांघरूण नीट करीत. दरवर्षी

सरासरी साठ–सत्तर मुले या योजनेचा फायदा घेत असत.

छात्रालयाच्या मुलांसाठी वेगवेगळे उपक्रम केले जात. त्यात दीर्घकाळ चाललेला आणि परिणामकारक ठरलेला उपक्रम म्हणजे ग्रामसफाई. छात्रालयातील विद्यार्थी बाबुराजे आणि अन्य कार्यकर्त्यांच्या सोबत आणि मार्गदर्शनाखाली दर शुक्रवारी ग्रामसफाई करीत असत. दहा–दहा विद्यार्थ्यांचे गट करून ही सफाई चाले. रस्ते, गटारी, नाले, संडास इ. ची सफाई झाल्यावर सर्वजण तक्क्यावर एकत्र येत. तिथे प्रार्थना होई. परत वाड्यावर आल्यावर मुलांना कांजी दिली जाई. आठवड्यातून एकदा (बहुधा शुक्रवारी) गोपाळकाला असे. सर्व मुले घरून भाजी–भाकरी इ. चा डबा आणत असत. जोडीला वाड्यात केलेली आमटी किंवा खीर असे. सर्वजण जेवायला बसल्यावर एकेक डबा उघडून वाढत जायचे. कोणाच्या डब्यातले अन्नपदार्थ कोणाला येतील त्याला येतील. त्याकडे लक्ष द्यावयाचे नाही. सर्वांनी एकत्र जेवायचे. छात्रालयात सर्व जाती–धर्माची मुले असत. या उपक्रमामुळे सामाजिक समतेचे आणि श्रमप्रतिष्ठेचे मूल्य मुलांच्या मनावर ठसत असे. छात्रालयातील विद्यार्थ्यांची बौध्दिके घेतली जात असत. बाबुराजे त्यांना माहिती सांगत, त्यांच्या बरोबर चर्चा करत किंवा त्यांना गोष्टी सांगत. छात्रालयाच्या वर्धापनदिनाच्या निमित्ताने विचारवंत तसेच सामाजिक कार्य करणाऱ्या व्यक्तींच्या मार्गदर्शनाचा लाभ मुलांना होई. एस्.एम्. जोशी, ना.ग. गोरे, हमीद दलवाई अशा लोकांचे विचार ऐकण्याची संधी मुलांना मिळत असे.

बाबुराजे उपक्रमांमध्ये सातत्याने सुधारणा करीत असत. छात्रालयाचे काम व्यवस्थित चालावे व त्यात ग्रामस्थांचा सहभाग असावा, कार्यकर्त्यांनी त्यात सक्रीय सहभागी व्हावे या हेतूने १९६२ मध्ये बाबुराजांनी छात्रालय परिवाराची कल्पना पुढे आणली. ही कल्पना अशी होती – या समाज विकासाच्या कार्यात सहभागी होऊ इच्छिणाऱ्या तरूणांचा हा परिवार असेल. प्रत्येक छात्रामागे एक–दोन तरूण निवडावे. प्रतिज्ञापत्रकावर सही केल्यावर त्यांना गणवेष दिला जाईल. त्याच्या सामान्य कार्याची रूपरेषा अशी –

१. शुक्रवारी संपूर्ण ग्रामसफाईत सहभागी होणे. रात्री सहभोजन.
२. आठवड्यातील एक तास (१० न.पै.) श्रममूल्य अर्पण करणे.
३. आपल्या नवजीवन युवक मंडळाच्या सहजीवन शेतीगटासाठी आवश्यक असेल तेव्हा शेतीकामास जाणे.
४. राष्ट्रीय दिन साजरे करणे. गावातील सार्वजनिक समारंभात शक्यतो सहभागी होणे.
५. साक्षरता प्रसार करणे.
६. व्यसनांपासून अलिप्त राहाणे.
७. कलापथक, क्रीडामंडळ इ. उपक्रमांत सहभाग घेणे.

छात्रालय परिवाराची कल्पना १००% प्रत्यक्षात आली नाही. तथापि, तिला ५०% प्रतिसाद मिळाला. गावातील तरूण कार्यकर्ते छात्रालयाशी जोडले गेले. छात्रालय आणि छात्रालय परिवार यांच्या मेळातून सूज्ञ, श्रमाची प्रतिष्ठा जपणारे, स्वातंत्र्य-समता-बंधुता ही मूल्ये जोपासणारे कार्यतत्पर तरूण तयार करण्याची बाबुराजांची धडपड होती. २४ एप्रिल १९६२ रोजीच्या दैनंदिनीत ते लिहितात, 'इरिगेशनवर जाऊन आलो. छात्रालयाची १२-१४ मुले कामावर होती. नव राष्ट्र उभारणी करण्याचा हाच मार्ग आहे. शेकडो, हजारो नवयुवक सुशिक्षित, श्रमशील आहेत व कामे पार पडत आहेत असे दृष्य पाहता आले पाहिजे.'

छात्रालयाच्या उपक्रमाला चांगला प्रतिसाद मिळाला. छात्रालयाचा लाभ घेतलेले काही लोक आता निवृत्तीचे आयुष्य सुखकारकरीतीने व्यतीत करीत आहेत. त्यात प्राध्यापक, शिक्षक, सरकारी अधिकारी, अभियंते, बँकिंग इ. क्षेत्रात सेवा करणारे लोक आहेत. काही लोक अजूनही जबाबदारीच्या पदांवर काम करीत आहेत. तळसंद्याप्रमाणे नेबापूरला वाड्यातही छात्रालयाचा उपक्रम १९६२ मध्ये सुरू केला होता तथापि, तीन-चार वर्षानंतर तो खंडित झाला.

सन १९६२ मध्ये बाबुराजांनी मुलींच्या साठी छात्रालय सुरू करण्याचे ठरविले. १९ डिसें. १९६२ रोजी ते सुरू झाल्याची नोंद आहे. एक बैठकही झाली पण, पुढे हे कार्य चालू राहिले नाही.

सध्या छात्रालय पूर्वीच्या स्वरूपात चालू नाही.मात्र सुसज्ज अभ्यासिका विद्यार्थ्यांसाठी २४ तास उघडी असते. तीस-चाळीस विद्यार्थी तिचा रोज लाभ घेत असतात. क्रीडांगण, व्यायामशाळा यांचाही ते लाभ घेऊ शकतात.

**मंगल वाचनालय -**

छात्रालयातील मुलांना वाचनाची गोडी लागावी, मोठ मोठ्या कर्तृत्ववान लोकांच्या चरित्रांपासून त्यांनी प्रेरणा घ्यावी आणि मुख्य म्हणजे बाहेरच्या बौद्धिक विश्वाशी जोडले जाण्यासाठी एक खिडकी तयार व्हावी या हेतूने २६ जाने. १९५८ रोजी मंगल वाचनालयाची स्थापना करण्यात आली. प्रारंभी त्यात, सानेगुरूजींचे साहित्य, म.गांधींची आत्मकथा, सिंदबादच्या सात सफरी, चंपाराणी, बनला बैरागी राजा, नवलनगरची राजकन्या, डेव्हिड कॉपरफील्ड, इसापनीतिकथा, धनंजय अर्जुन, चंद्रपुरी लोककथा अशा पुस्तकांचा समावेश असे. शेतीविषयक पुस्तकांचा अंतर्भावही त्यात असे. शेतीविषयक जर्नल्सही मागविली जात. याचा फायदा शेतकरी बंधू घेत. पुढे हे धोरण बदलून कथा-कादंबरी अशा वाङ्मयप्रकारातील साहित्यकृतींचाही समावेश होऊ लागला. छात्रालयातील विद्यार्थी दरवर्षी एक हस्तलिखित काढत असत. तेही वाचनालयात ठेवले जाई. आजही अशा हस्तलिखितांचा संच वाचनालयात उपलब्ध आहे. सध्या या वाचनालयात १४ हजार पुस्तके आहेत. ११ वृत्तपत्रे रोज, नियमितपणे येत असतात. एक सांस्कृतिक कट्टा म्हणूनही आज या वाचनालयाचा उपयोग तरूण मंडळी करतात.

**साक्षरता प्रसार -**

छात्रालय व वाचनालय यांच्याप्रमाणेच साक्षरता प्रसारालाही बाबुराजांनी महत्त्वाचे मानले. ते स्वतः तळसंदे आणि आपटी - नेबापूर या दोन्ही ठिकाणी प्रौढ साक्षरता वर्ग घेत असत. हे वर्ग आठवड्यातून दोनदा रात्री नऊ नंतर प्रत्येकी दोन तास चालत. सरासरी १५ ते २० लोक या वर्गांना उपस्थित असत.

### शेतीविषयक मार्गदर्शन व प्रयोग :–

बाबुराजे शेतीशास्त्राचे पदवीधर होते. शिक्षण संपल्यावर नोकरीचा विचारही न करता, शेती करायची व सामाजिक कार्य करावयाचे असा त्यांचा निर्धार होता. त्यामुळे शिक्षण संपवून घरी परत आल्यावर त्यांनी मामांच्या शेतीत लक्ष घातले आणि सामाजिक कार्याला सुरूवातही केली. १९४७ साली देशाला स्वातंत्र्य मिळाले आणि बाबुराजांनी शेतीविषयक प्रबोधनाची एक वाट निश्चित केली. स्वातंत्र्य मिळाल्यांनंतर एक नवा, आधुनिक, समृद्ध आणि सुखी समाज निर्माण करण्याचे आव्हान राजकीय नेतृत्वापुढे तसेच सामाजिक कार्यकर्त्यांपुढे होते. अन्नधान्याची समस्या सोडविणे, देश अन्नधान्याच्या बांबतीत स्वयंपूर्ण करणे हा त्या आव्हानाचा एक महत्त्वाचा भाग होता. त्यासाठी देशपातळीवर आणि राज्य पातळीवर अनेक योजना आखल्या गेल्या, योजना कार्यान्वित होण्यासाठी शासकीय निधी आणि तंत्रसहाय्य देण्याच्या तरतुदी करण्यात आल्या. अशा वेळी बाबुराजांनी एक सामाजिक कार्यकर्ता म्हणून शासकीय योजना आणि सर्वसामान्य शेतकरी यांना जोडणारा पूल अथवा दुवा बनण्याची भूमिका घेतली. आपले मित्र, शासकीय अधिकारी यांच्या सोबत ते गावोगाव फिरत. शेतकऱ्यांना भेटत. अधिक उत्पादनासाठी काय करावे यासंबंधी मार्गदर्शन करीत. तळसंद्यात येऊन राहाण्यापूर्वीपासून त्यांचे हे काम चालू होते. तळसंदे गावात आल्यावर त्यांनी आपले क्षेत्र पक्के केले आणि पूर्वीची भूमिका पुढे चालू ठेवली. ते शेतकऱ्यांना भेटत, त्यांच्या शेतावर जाऊन पाहाणी करीत आणि कधी मीटींग घेऊन तर कधी व्यक्तिगत पातळीवर बियाणे कुठले वापरावे, खत कोणते व केव्हा द्यावे, कोणत्या पिकाला कोणते खत द्यावे, पाणी केव्हा, कसे द्यावे या संबंधी मार्गदर्शन करीत. जपानी भातशेती कशी करावी याचे प्रात्यक्षिकासह शिक्षण देत. वारणा परिसरात हायब्रीडचे वाण त्यांनीच प्रथम आणले. ते शेतकऱ्यांच्या अडचणी समजून घेत व त्यांचे निराकरण करण्याच्या युक्त्या सांगत. सरकारी योजनांची माहिती देऊन त्यांचा लाभ शेतकऱ्यांना व्हावा, अर्थसहाय्य व तंत्रसहाय्य

मिळावे यासाठी लागणारी मदत करीत. थोडक्यात, स्वतंत्र भारताच्या अन्नधान्याच्या बाबतीत स्वयंपूर्ण होण्याच्या उपक्रमाशी तळसंद्यातील सर्वसामान्य शेतकऱ्यांना जोडून, स्वातंत्र्याचे लाभ त्यांच्या पदरात पडतील अशी वाट बाबुराजांनी तयार केली.

बाबुराजे प्रयोगशील शेतकरी होते. मामांची शेती ते पहात असत. शेती करताना ते वेगवेगळे प्रयोग करून पाहात. नवे बियाणे, नवी खते इ. वापरून पहात. शेती जर्नल्समध्ये येणाऱ्या माहितीच्या आधारे प्रयोग करून पहात आणि मगच शेतकऱ्यांना तत्संबंधी मार्गदर्शन करीत. पारगावच्या मळ्यात त्यांनी केलेल्या प्रयोगात ३ महिन्यात १२ गुंठ्यांमध्ये ११ पोती ज्वारी त्यांनी घेतली. बी.डी. पाटील या कृषिअधिकाऱ्याच्या आठवणीनुसार बाबुराजांनी शेरी मळ्यात एकरी ४० पोती उत्पन्न काढले होते. हायब्रीड ज्वारीला भर जास्त त्यामुळे शेतकऱ्यांचा हंगाम वाया जातो म्हणून त्यांनी शेती अधिकारी शिंदे यांच्या समवेत वारणा सह. कारखान्याच्या शेतीत भाताप्रमाणे ज्वारीची तरवा लागण किफायतशीर करून दाखविली होती.

बाबुराजे निरीक्षण वही ठेवीत. त्यात शेती संबंधी नोंदी असत. मामांच्या शेतीसंबंधी निरीक्षणे त्यात असतच पण, गावातील अन्य शेतकऱ्यांच्या शेतीबद्दलची निरीक्षणेही असत. उदाहरणार्थ, एक टिपण असे, गुरूमहाराजाच्या मळ्यात गेलो होतो. तेथील खोडवा उत्तम साधला आहे. पद्धत जुनी आहे. हीही विचार करण्याची गोष्ट आहे. निरीक्षणांच्या आधारे ते शेतकऱ्यांना माहिती देत असत. तळसंद्यातील शेतकऱ्यांना आपण कलिंगड, द्राक्षे, पपई यांच्या बागा करू शकतो असा आत्मविश्वास त्यांनी मिळवून दिला. लोकांच्यात शेतीविषयी, धान्योत्पादनाविषयी जाणीवजागृती आणि आवड, प्रयोग करून पाहाण्याची जिज्ञासा त्यांनी निर्माण केली. त्यातूनच पुढे मारूती भोसले गुरूजी, तात्यासो शिंदे, बाळूनाना चौघुले या शेतीतज्ज्ञ आणि प्रयोगशील शेतकऱ्यांचा मार्ग खुला झाला.

बाबुराजांनी सामुदायिक शेतीचेही प्रयोग केले. खोरीतील शेतीत हा प्रयोग कार्यान्वित झाला. शंकर मोहिते, बाळाराम चौगुले,

मधू पांगे, मारूती भोसले, कमळाबाई पाटील, यशवंत चौगुले, भार्गव, त्र्यंबकराव शिंदे आणि अन्य अशा एकूण पंधरा जणांनी मिळून हा सामुदायिक शेतीचा प्रयोग केला. खोरीतील शेती प्रायोगिक बनविण्याचा बाबुराजांचा प्रयत्न होता. खोरी येथे आश्रम व्हावा असे त्यांचे स्वप्न होते. तेथे प्रायोगिक विभाग सुरू करून भात, मिरची, भुइमूग, ऊस, केळी इ. बाबतीत सतत प्रयोग करीत राहाण्याची त्यांची कल्पना होती. गांधीजींची आश्रम कल्पना आणि शेती संशोधनाची आवड या दोन्हींचे मिश्रण असलेली ही कल्पना कधीतरी सत्यसृष्टीत येईल अशी त्यांना आशा होती. (८ जून १९६२ दैनंदिनी) परंतु तसे झाले मात्र नाही.

सामुदायिक शेतीचा हा प्रयोग अत्यंत व्यवस्थित चालू होता. हिशेब चोख ठेवले जात. Labour sheet, cultivation sheet इ. चे रेकॉर्ड अगदी पद्धतशीरपणे ठेवले जाई. सभासदांना पासबुक दिले जाई. त्याची रचना अशी असे –

१. मेंबर हिस्सा
२. चालू महिन्यातील हजर दिवस – सालदार घरचे गडी – बैल
३. चालू वर्षातील हजर दिवस – सालदार घरचे गडी
४. संस्थेचे सुरूवातीपासून हजर दिवस – सालदार घरचे गडी
५. पहिले वर्षाचे व्यक्तिगत देणे – दिलेले धान्य / परिमाण = किंमत
६. दुसरे वर्षातील देणे – दिलेले धान्य / परिमाण = किंमत
७. तिसरे वर्षातील देणे – दिलेले धान्य

### बाबवारचा उतार

सामुदायिक शेतीची ही व्यवस्था अतिशय नमुनेदार झाली होती. ती समजून घेण्यासाठी केरळची एक टीम मुद्दाम आली होती.

या प्रयोगाच्या धर्तीवर पण थोड्या लहान प्रमाणात दुसरा एक सामुदायिक शेतीचा प्रयोग बाबुराजांनी केला. त्याला ओतातली शेती

म्हणत. चंदर चौगुले, बाबुराव जाधव, भाऊ दादा चौगुले यांची शेती एकत्र करून हा प्रयोग केला. चंदर चौगुले यांची विहीर खोदून श्रमदानाने बांधून घेतली. त्यावर २० हॉर्स पॉवरचे इंजिन बसविले. या शेतीत आलेले पीक ज्याच्या त्याच्या जमिनीच्या हिश्याप्रमाणे वाटून दिले जाई. हा प्रयोग ही नावाजण्याजोगा झाला.

दोन्ही प्रयोग सुमारे पाच वर्षे चालले पुढे काही मतभेद सुरू झाल्यामुळे ते हळूहळू बंद पडले.

**सामुदायिक दूध संकलन :-**

मनोहर पेटकर गुरूजींच्या आठवणीनुसार, बाबुराजांनी १९५६-५७ च्या दरम्यान नव्याने नोकरीला लागलेल्या लोकांची एक संघटना बांधली. त्या संघटने मार्फत २५-३० म्हशींचा गोठा सुरू केला. हा गोठा आधुनिक सायलो पद्धतीचा होता. प्रत्येकाला त्याचे नावे जनावर दिले होते व त्या जनावरांचे सकाळ-संध्याकाळ एकाच ठिकाणी दोहन केले जाई. सर्वोदय कार्यकर्ते माधवराव दळवी दूध कसे वाढवावे या बद्दल वेळोवेळी मार्गदर्शन करीत असत. त्यांच्या मार्गदर्शनाखाली हा उपक्रम यशस्वी झाला. संकलित केलेले दूध विक्रीसाठी वारणानगरला पाठविले जाई. या सोसायटीचा विस्तार होऊन ती श्री नवजीवन सहकारी दूध व्यवसायिक संस्था या नावाने ३०/०८/१९७८ रोजी रजिस्टर करण्यात आली. आजही ती उत्तम प्रकारे चालू आहे.

दूध संकलना प्रमाणेच कोंबडी पालनाचा शेतीपूरक व्यवसाय सुरू करण्यासाठी बाबूराजांनी प्रोत्साहन दिले. काही तरूणांना कोंबडी पालनाच्या प्रशिक्षणासाठी पाठवून ते प्रशिक्षित झाल्यावर त्यांना काही आधारभूत भांडवल पुरवून छोटे पोल्ट्री फार्म्स काढण्यासाठी बाबुराजांनी उत्तेजन दिले.

मातंग समाजातील लोकांसाठी दोरकाम-विणकाम सोसायटी भोसले गुरूजींच्या जागेत सुरू करण्यात आली. शासकीय योजनेचे सहाय्य घेऊन, वाखापासून सूत तयार करणे व त्या सुतापासून वस्तू तयार करणे असा उद्योग सुरू केला. तयार झालेला माल खादी-

ग्रामोद्योग विभागाकडे विक्रीसाठी पाठवला जाऊ लागला. सुमारे दहा वर्षे ही योजना यशस्वीपणे चालू होती. बाबुराजांनी गावात घरोघरी चरखे पुरविले होते. गावातील स्त्रियांना सूतकताई शिकविली होती. काढलेले सूत खादी-ग्रामोद्योग विभागाकडे पाठवून मिळणारे पैसे त्या स्त्रियांना दिले जात.

बाबुराजांनी सामुदायिक तत्त्वावर सुरू केलेले अन्य दोन यशस्वी उपक्रम म्हणजे सामुदायिक ऑईल मिल आणि सामुदायिक पिठाची गिरणी हे होत. फुले प्रगती वाण वापरल्यामुळे भुईमुगाचे उत्पादन भरघोस होऊ लागले. या शेंगांचे पक्क्या मालात रूपांतर करून शेतकऱ्यांच्या पदरात अधिक नफा पाडून द्यावा, या हेतूने बाबुराजांनी सामुदायिक तत्त्वावर ऑयल मिल सुरू केली. दि. १ जाने. १९६२ रोजी ऑयल मिलचे उद्‌घाटन झाले. भोसले गुरूजींच्या जागेत शेड टाकून या मिलचे काम चालू करण्यात आले. गावातील पंधरा उत्साही कार्यकर्ते यात प्रथम पासूनच सहभागी झाले. पुढे भागधारक वाढविण्यातही यश आले. नोव्हें. ६२ मध्ये प्रत्यक्ष काम सुरू झाले. श्री.प्रभाकर मुनीश्वर यांना व्यवस्थापक म्हणून नेमले गेले.

व्यावहारिक पातळीवर काटेकोरपणे तपासून घेऊन या उपक्रमाची सुरूवात केली होती. जाने. ६२ मधील दैनंदिनीत बाबुराजांनी एक दिवसाला लागणारी शेंग व त्या पासून निघणारे तेल व पेंड व त्या दिवसाचा एकूण खर्च याचा तक्ता नोंदविला आहे तो असा -

| | | |
|---|---|---|
| १. | शेंग खरेदी १८०० कि. दर ६५ प्रमाणे | ११७०-०० |
| २. | शेंग वाहतुक भाडे | ०००२-७५ |
| ३. | हमाली | ०००१-३५ |
| ४.५ | मजुरांची हजरी २.०० प्रमाणे | ००१०-०० |
| ५. | दाणे निवडीसाठी ५ बायकांची मजुरी (प्रत्येकी १.२५ प्रमाणे) | ०००६-२५ |
| ६. | एका दिवसाचा क्लार्क पगार | ०००३.५० |
| ७. | एका दिवसाची एक्साइज ड्युटी | ००१२.५० |
| ८. | एका दिवसाची रक्कम | ०००१.०० |
| ९. | एका दिवसाची मशिनरी झीज | ००१०.०० |

| | | |
|---|---|---|
| १०. | एका दिवसाचे इमारत भाडे<br>एकूण | ००१०.००<br>१२३७.३५ |
| | शेंगांचे निघणारे तेल व पेंड | ११७०.०० |
| | | ६७.३५ |
| | १६.५० तेल : ५४० कि. दर १.८५ प्रमाणे ९९९ | |
| | ६ पेंड : ८०० कि. दर ३६ न.पै. प्रमाणे २८८ | |
| | १२८७.०० | |
| | तेल व पेंड विक्री जमा १२८७.०० | |
| | शेंग व खरेदी व खर्च मिळून १२३७.३५ | |
| | ००४९.६५ नफा | |

किती काळजीपूर्वक विचार करून हा उपक्रम सुरू केला होता, हे या तक्त्यावरून सहज लक्षात यावे. शेंग खरेदीच्या मुहुर्ताच्या निमित्ताने पारगावच्या सभेत बोलताना बाबुराजांनी ऑइल मिललाच शेंग का द्यावी या बद्दल विचार मांडले. पक्का माल बनविण्यामुळे होणारा फायदा आणि सहकारी तत्त्वावर असल्यामुळे कोणी कोणाची पिळवणूक करणार नाही आणि स्वतःची पिळवणूक होऊ देणार नाही, हे स्पष्ट करून सांगितले. (३ जाने. ६२ ची दैनंदिनी). अशा प्रकारे, आसपासच्या गावात जाऊन शेंग खरेदी करून आणायची व त्याचे तेल करून तेल व पेंड विक्री करावयाची हा उपक्रम १० वर्षे उत्तम प्रकारे चालला. पुढे, गावागावात ऑइल मिल निघाल्या, त्यामुळे पुरेशी शेंग मिळेना झाली आणि मग हा उपक्रम थांबला. या उपक्रमाच्या बरोबरीने सुरू झालेला, अकरा जणांनी एकत्र येऊन आकाराला आणलेला पिठाच्या गिरणीचा उपक्रम मात्र अजूनही चालू आहे.

बाबुराजांनी तळसंदे गावात चालू केलेल्या आणि आपल्या अनेक कार्यकर्त्यांच्या सहाय्याने यशस्वी करून दाखविलेल्या या

उपक्रमांमागे, धडपडीमागे निश्चित अशी विचारसरणी होती. आधुनिक मूल्यांच्या प्रकाशात ते भोवतालचे जीवन पहात होते. एकोणिसाव्या शतकात पाश्चिमात्य संस्कृतीच्या संपर्काने जी आधुनिक मूल्ये भारतीयांना ठावूक झाली आणि जी रूजविण्याचा म.गो. रानडे, जोतिबा फुले, गोपाळराव आगरकर इ. नी कसोशीने प्रयत्न केला ती अजूनही आपल्या आवाक्याच्या बाहेर आहेत, हे लक्षात येताच बाबुराजांनी त्यासाठी प्रयत्न करावयाचे ठरविले. सामाजिक समतेसाठी सुरू केलेले उपक्रम हा असाच एक प्रयत्न म्हणता येईल.

सामाजिक समतेसाठी उपक्रम–

बाबुराजांची विधायक समाजवादावर निष्ठा होती. साहजिकच धार्मिक व आर्थिक समानता निर्माण करणाऱ्या उपक्रमांना त्यांच्या कृतिकार्यक्रमात अग्रक्रम होता. समाजजीवनाला व्यापून राहिलेली, विषमता आणि शोषण यावर आधारलेली जातिव्यवस्था खिळखिळी करणे आणि म.गांधीजी जिला राष्ट्राला लागलेली कीड समजत असत ("Untouchability has supped the very foundations of the whole nation") त्या अस्पृश्यतेचे निवारण करण्यासाठी त्यांनी विशेष प्रयत्न केले. त्यांनी तयार केलेल्या कार्यकर्त्यांच्या आचार संहितेत सामाजिक समतेसाठी करावयाच्या कामाचा निर्देश आहे.

राष्ट्रसेवक विनयकुमार छात्रालयात सर्व जातीधर्मांच्या विद्यार्थ्यांना एकत्रितपणे सर्व उपक्रम करावे लागत. त्यात भेदभाव नसे. प्रत्येक शुक्रवारी छात्रालयातील विद्यार्थी, कार्यकर्ते यांच्या समवेत बाबूराजे स्वतः हातात खराटा घेऊन गावातील सर्व रस्ते साफ करीत. काही वेळा एखाद्याचे अंगणही झाडून स्वच्छ करीत. सर्व झाडलोट झाल्यावर हरिजनवाड्यातील तक्क्याजवळ सर्वजण एकत्र जमत. त्यावेळी वाड्यातून आणलेल्या स्टोव्हवर चहा तयार केला जाई. सामुदायिक प्रार्थना झाल्यावर सर्वजण चहा घेत. यावेळी काही पूर्वास्पृश्य नागरिकांना सक्तीने समाविष्ट केले जाई. चहा नंतर लोक घरी जात.

काही काळपर्यंत हा उपक्रम चालू राहिल्यानंतर एकूण योजनेचा

दुसरा टप्पा कार्यान्वित करण्यात आला. त्यानुसार, शुक्रवारी संध्याकाळी छात्रालयात गोपाळकाल्याचा कार्यक्रम होऊ लागला. छात्रालयातील सर्व विद्यार्थ्यांनी घरून जेवण आणायचे ते सर्व एकत्रित करायचे वाड्यातही आमटी, खीर असे काहीतरी बनवले जाई. मग पंगत बसवून सर्वांना एकत्र वाढले जाई. हा उपक्रम अत्यंत यशस्वी झाला.

पुढचा टप्पा अधिकच आव्हानात्मक होता. त्यानुसार, बाबुराजांनी १५ ऑगस्ट व २६ जानेवारीस सर्वांसाठी स्वखर्चाने भोजन ठेवले. गावातील सर्व लोकांना जेवणाचे आमंत्रण दिले. पंगत बसविली. पत्रावळी दिल्या व नंतर प्रत्येक पंगतीमध्ये चार सवर्ण – व्यक्तींच्या मध्ये दोन पूर्वास्पृश्यांनी बसावयाचे अशी व्यवस्था केली. सगळेच लोक या आकस्मिक व्यवस्थेने गोंधळले. काही नाराजीचा, विरोधाचा सूर उमटू लागला. पूर्वास्पृश्यही संकोचून गेले परंतु बाबुराजांनी अट्टाहासाने, जोर धरून योजना कार्यान्वित केली (ही माहिती मारूती कांबळे यांच्या लिहून ठेवलेल्या आठवणीतील आहे.) आज सवर्ण आणि पूर्वास्पृश्य लोकांनी एकत्र भोजन करणे ही बाब मान्यता पावली आहे. सार्वजनिक जीवनातून अस्पृश्यता नाहीशी करण्यात आपण बऱ्याच प्रमाणात यशस्वी झालो आहोत. बाबुराजांच्या सारख्या सामाजिक समतेसाठी निरंतर आणि निःस्वार्थीपणे काम करणाऱ्या अनेक लोकांच्या तपःपूत कार्यामुळे हे काम सुलभ झाले असे म्हणायला प्रत्यवाय नसावा.

सामाजिक समता स्थापन करण्यासाठी सर्व जातीधर्मांच्या लोकांनी केलेले सहभोजन हा उत्तम उपाय आहे; हे अनेक मोठ्या नेत्यांनी सांगितले होते व करूनही दाखविले होते. बाबुराजांचा प्रयत्न हा त्या तत्वांचा आपल्या छोट्याशा गावात प्रयोग करून पहाण्याचा होता. या कामा प्रमाणेच दुसरेही एक काम होते, ते म्हणजे उपयुक्त आवश्यक पण घृणास्पद मानल्या जाणाऱ्या धंद्याबाबतची घृणा मोडून काढणे हे होय. श्रमाला प्रतिष्ठा असते. कोणतेही काम अप्रतिष्ठेचे नसते आणि म्हणून ते करणारी सर्व माणसे (मग त्यात भंगी, जनावरांचा कातडी सोलणारे व कमावणारेही आले) सारखीच सन्माननीय असतात. अशी म. गांधींची भूमिका होती. त्यासाठी ते स्वेच्छापूर्वक भंगीकाम करीत.

२५ मे ते ३० जुलै १९४७ या काळात महात्मा गांधी नवी दिल्लीतल्या भंगी कॉलनी मध्ये मुक्काम करून होते. (अंबरीश मिश्र – १२३)

बाबुराजांनी या संदर्भातही तळसंद्यात प्रयोग केले. गावातील मोऱ्या, संडास, गटारी यांची सफाई हा त्यांच्या शुक्रवारच्या ग्रामसफाईचा महत्त्वाचा भाग होता. त्याच बरोबर त्यांनी गावात निर्भंगी संडास – गोपुरी, तसेच गोबर गॅस प्लॅन्ट व संडास बांधण्याची योजना सुरू केली. या बाबतीतली, बाळाराम चव्हाण यांनी सांगितलेली आठवण बाबुराजांच्या विचारसरणीवर आणि कार्यपद्धतीवर प्रकाश टाकणारी आहे. त्यानुसार वाड्यातील संडासाच्या ठिकाणी गोबर गॅस व संडास बांधण्याचे ठरले. त्यासाठी, पूर्वीच्या संडासच्या पाठीमागील मैल्याच्या खताचा खड्डा स्वच्छ करणे आवश्यक होते. हे काम गावातील भंगीकाम करणाऱ्या लोकांवर न सोपविता मामांनी व बाबुराजांनी ट्रॅक्टर–ट्रॉली आणून संडास जवळ सोडण्यास सांगितले. रात्रीच्या वेळी दोघांनी मिळून खताचा खड्डा स्वच्छ केला व ट्रॉलीत खत भरले व दुसऱ्या दिवशी कामाला सुरवात करण्यास सांगितले. सामाजिक समतेच्या दिशेने पुढचे पाऊल पडण्यासाठी सर्वांनाच माणूस म्हणून प्रतिष्ठा मिळाली पाहिजे या तत्त्वाचा प्रचार–प्रसार करण्यासाठी, आपला सर्व अहंभाव, प्रतिष्ठेच्या भ्रामक कल्पना विसर्जित करून या मामा–भाच्यांनी तळसंद्यात केलेला हा प्रयोग अनेकांच्या मनांवर संस्कार करणारा, अनौपचारिक रीतीने समतेचे तत्त्व ठसविणारा ठरला. परिणामी, खोरीत विहिरीवर शामा (मांग) ही पाणी भरतो व ते सगळ्यांना चालते याबद्दल बाबूराजे आपल्या दैनंदिनीत समाधानाचा उद्‌गार काढू शकले.

पुढे घरकुल समूहाचा एक महत्त्वाचा उपक्रमही कार्यान्वित झाला. यात विविध जातीच्या लोकांनी, विशेषतः सामाजिक दृष्ट्या प्रतिष्ठित वा अप्रतिष्ठित असा भेद न बाळगता परस्परांच्या जवळ घरे बांधण्याची कल्पना अनुस्यूत होती. जुनी ग्रामरचना पाहिली तर, प्रत्येक जातीच्या लोकांची वेगळी आळी किंवा गल्ली होती असे दिसेल. पूर्वास्पृश्यांची घरे गावकुसाबाहेर असत. हा शिरस्ता मोडून तळसंदे

येथील लोहार आळीच्या मागच्या बाजूला, गणपती मेथे, नानाप्पा गोपाळ कांबळे, गणपती बाबाजी सुवासे, धनाजीराव शिंदे आणि अन्य दोन, अशा सहा लोकांची घरे श्रमदानाने उभारण्यात आली. जागा ग्रामपंचायतीने दिली आणि त्या शिवाय आलेला खर्च मामांनी केला. समताधिष्ठित घरकुल सोसायटीतील कुटुंबे अजूनही तेथे रहात आहेत. परस्पर सामंजस्याने व्यवहार करीत आहेत.

सामाजिक न्याय देण्याच्या हेतूने बाबूराजांनी गोपाल विद्यालय सुरू केले. दि. ५ एप्रिल १९६२ रोजी हे विद्यालय सुरू करण्याच्या निमित्ताने केलेल्या भाषणात ते म्हणाले, 'या विद्यार्थ्यांना शिकवणे म्हणजे सामाजिक न्याय देणे होय. क्रांतीने, निवडणुकीने समाजवाद आणून सर्वांना समान संधी देणे हे एक काम, तर सर्वांना समान संधी देण्याचं विधायक काम करून आदर्श समाजवाद प्रस्थापित करणे हा दुसरा मार्ग. आम्ही दुसऱ्या मार्गाचे पाईक आहोत!' या प्रसंगी मामांचेही भाषण झाले. त्यांनी प्रत्येक गोष्टीत आनंद, समाधान पाहावयास पाहिजे हे तत्त्व सांगितले. बाबुराजे गोपाल विद्यालयात जाऊन शिकवीतही असत. शाळेच्या वेळा व्यतिरिक्त, त्या मुलांना गणित शिकविणे, त्यांचे वाचन, लेखन घेणे इकडेही ते आवर्जून लक्ष देत. सुमारे २०–२५ विद्यार्थी या विद्यालयात येऊ लागले होते. मोठ्या उमेदीने सुरू केलेला हा उपक्रम पुढे फारसा चालला नाही. सामाजिक कार्य करणाऱ्यांना ज्या विषण्णतेला सामोरे जावे लागते, त्याचा अनुभव बाबुराजांना आला. असा अपवाद सोडला तर, अन्य कार्यात त्यांना यश मिळत गेलेले दिसते.

तळसंदे ही प्रयोगभूमी मानून बाबुराजांनी तिथे अनेक उपक्रम सुरू केले व यशस्वीही केले. त्यातील काही अल्पजीवी ठरले तर काहींनी नवे, अधिक चांगले रूप धारण केले. बाबुराजांच्या या कार्यात त्यांना गावातील अनेकांचे सक्रिय सहाय्य मिळाले. बाबुराजांच्या एवढ्याच तळमळीने कार्य करणाऱ्या मा.ता. भोसले गुरूजी, भार्गव आण्णा कापसे, बी.के. चव्हाण, मधुकर पांगे, निवृत्ती भाऊ चव्हाण यांच्या सारख्या सहकाऱ्यांचे सहाय्य आणि पाठिंबा त्यांना होता,

त्यांच्या भोवती अनेक कार्यकर्त्यांचे उत्साही मंडळ होते, त्याला लागूनच छात्रालयातून बाहेर पडलेली तरूण मंडळी होती आणि छात्रालयातील लहान-मोठे बालवीर होतेच ग्रामस्वच्छतेसारखे उपक्रम यशस्वी करायला. गावकऱ्यांचा असा भरघोस पाठिंबा बाबुराजांना मिळाला. पाण्यात खडा टाकल्यावर त्या भोवती अनेक लहानमोठी वर्तुळे तयार व्हावी त्याप्रमाणे बाबुराजांनी कल्पना अथवा विचार मांडताच त्याचे तरंग गावभर उमटत. सारा गाव कामाला लागे. या सगळ्यात थोडा बहुत निघणारा विरोधाचा सूर लोपून जाई.

या प्रयोगाने तळसंदे बदलले. तिथे चैतन्याचे व उत्साहाचे वारे वाहू लागले. या बदलाची वार्ता सगळीकडे पसरली. त्याचा दृष्य परिणाम म्हणून गावाला राज्य पातळीवरील आदर्श गाव पुरस्कार मिळाला. तत्कालीन राज्यपाल श्री प्रकाश यांच्या हस्ते १९६३ मध्ये हा पुरस्कार देण्यात आला.

---

## श्री. मारूती भोसले गुरूजी
### – सामाजिक कार्यकर्ता व शेतीतज्ज्ञ

# मुलाखत

भोसले गुरूजी हे बाबुराजांच्या सामाजिक कार्यातील अगदी सुरूवातीपासून ते अखेरपर्यंत कार्यरत असलेले सहकारी. बाबुराजांच्या निधनानंतरही त्यांनी हे कार्य पुढे चालू ठेवले. बाबुराजांना ते आपले प्रेरणास्थान मानतात. बाबुराजांच्या कार्याचे स्वरूप व महत्त्व तसेच त्यांची कार्यशैली याचा अगदी जवळून परिचय असलेल्या भोसले गुरूजींनी मोठ्या आस्थेने मुलाखत दिली.

**प्रश्न :** आपण बाबुराजांच्या तळसंद्यातील सामाजिक कार्याचे, गावातील परिवर्तनाचे अगदी प्रथमपासूनचे साक्षीदार आहात. तळसंद्यातील या कामाची सुरूवात कशी झाली ?

तसे आधीपासून मामा तळसंद्यात सामाजिक सुधारणा व्हाव्या, यासाठी प्रयत्नशील होते. बाबुराजेही त्यांच्या सोबत असत. पण त्यांचे वास्तव्य नेबापुरात असे. त्यामुळे कामाला म्हणावी तशी गती येत नव्हती. यात बदल व्हायला एक जबरदस्त घटना कारणीभूत झाली. १९४८ साली गांधीवधानंतर जी जाळपोळ झाली, त्यात मामांचा नेबापुरातील वाडा जळाला. तळसंद्यातील वाड्याला मात्र लोकांनी काही होऊ दिले नाही. मग तळसंद्यातील लोकांनी मामांना इथे येऊन वास्तव्य करण्यास सुचविले आणि मामांचे व बाबुराजांचे इथले वास्तव्य वाढले. आणि दोघांनी आपल्या स्वभावानुसार सामाजिक कार्याकडे लक्ष वळविले. मामांनी काही बैलगाड्या पाठवून रंगीत माती आणवली आणि गावातील सगळी घरे त्या मातीने, श्रमदानाने रंगविली. गाव

वेगळा दिसू लागला. मामा म्हणाले, आता जुने सगळे संपले. आपण नवा गाव निर्माण करू. बाबुराजांनी हे शब्द खरे करून दाखवले.

प्रश्न : तळसंद्यातील उपक्रमाबद्दल काय सांगाल?

उपक्रम इथे खूप राबवले. बाबुराजांच्या भोवती नेहमी माणसे, कार्यकर्ते असत. ते सांगतील ती कल्पना उचलून धरीत आणि नेटाने अमलातही आणत असत. मला महत्त्वाचे वाटते ते त्यांनी गावची शेती सुधारण्यासाठी केलेले प्रयत्न. इथल्या जमिनीला पाणी नव्हते. नदीत पाणी होते पण जमिनीत ओल नव्हती. तर, मामांनी आणि बाबुराजांनी आधी तळसंदे पारगाव सह. पाणी पुरवठा संस्था काढून नदीचे पाणी पाईपने गावात आणले. नंतर त्याच्या जोडीला अंबप-तळसंदे पाणी पुरवठा संस्था काढली. त्यांच्यात काही कुरबुर सुरू झाली म्हणून दोन्ही संस्था वेगवेगळ्या केल्या. आणखीही एक लहान पाणी पुरवठा संस्था काढली. या तीन्ही संस्थांच्या पाणी पुरवठ्यामुळे शेतीच्या पाण्याची बरीचशी समस्या कमी झाली.

बाबुराजांचं महत्त्वाचं काम म्हणजे त्यांनी संकरित बियाणे - १, २ ते ५ नंबरपर्यंतचे बियाणे मिळवून ते शेतकऱ्यांना वाटले. अधिक उत्पन्न यावे आणि पिके रोगाला बळी पडू नयेत यासाठी त्यांनी विशेष प्रयत्न केले. ज्वारीसाठी जे.एस्. एच्. १, शेंगासाठी फुले प्रगती वाण, गव्हासाठी तांबडी लोंबी अशी वाणे मिळवून ते शेतकऱ्यांना देत. ऊसही देशी होता. त्याचे उत्पन्न कमी आणि तो रोगाला लवकर वळी पडे. त्यांनी ८६०३२ ही नवी जात आणली. मग ऊसाचे पीक भरघोस येऊ लागले. आजही हीच जात वापरली जाते.

प्रश्न :नवे बियाणे मिळवून वाटत म्हणजे काय? त्यांची पद्धत कशी होती?

ते शेती विषयाचे पदवीधर होते. बाहेरच्या जगात शेतीविषयक जे संशोधन चालू असे, त्याचा ते सतत अभ्यास करीत. सरकारी कोट्यामध्ये मिळणारे बियाणे आणत. इथे आपल्या शेतात ते लावून-पिके वाढवून, त्याला कमी-जास्त प्रमाणात खते व पाणी देऊन ते त्या

बियाणाची उपयुक्तता तपासून पहात आणि मग, सरकारी कोट्यातून बियाणे मिळवून ते शेतकऱ्यांना वाटत असत.

प्रश्न : ते शेतीविषयक प्रयोग करीत असे म्हणता येईल का ?

हो नक्कीच. एक उदाहरण सांगतो, इथे खोरीत सुद्धा एक वाफा भाजीपाल्यासाठी ठेवला होता. त्यात ते खताचे, पाण्याचे प्रमाण बदलून किंवा रीत बदलून पहात. रोज नोंद ठेवीत असत. शेती विषयक मासिके, जर्नल्स वाचून, त्यातील माहितीचाही ते वापर करीत. आमचे ते मार्गदर्शक होते.

प्रश्न : म्हणजे ?

म्हणजे असं की, लागवड असो, खते असोत ती कुठली घालावी, किती प्रमाणात आणि केव्हा घालावी किंवा अगदी, ऊसाला कुठले खत, गव्हाला कुठले खत याची ते माहिती देत. ते सांगतील तसे आम्ही करत असू. दर शुक्रवारी बैठक असे. त्यात लोक आपल्या अडचणी सांगत. बाबुराजे त्यावर उपाय सांगत. प्रसंगी, त्या व्यक्तीच्या शेतावर जाऊन पिकाचे, मशागतीचे निरीक्षण करीत आणि लागेल ती मदतही करीत. तळसंद्याच्या शिवारात पाणी नसल्याने काही पिकतच नव्हतं तिथं आम्ही अधिक धान्य पिकवू लागलो. सगळ्या महाराष्ट्रात आमची वाहवा झाली.

प्रश्न : आणखी काही त्यांच्या बद्दल सांगता येईल ?

कामाशिवाय त्यांना काही सुचत नसे. इथे आले तरी वाड्यात थांबत नसत. लगेच बाहेर पडत. मग शेताकडे जा, कोणाच्या भेटीगाठी घे, हिशेबासंबंधी बोल असे लगेच सुरू. मुलांच्यात फार रमत. मुलांना गोष्टी सांगणं, त्यांचा अभ्यास घेणं त्यांना फार आवडे. आणखी एक म्हणजे मनस्वी स्वभाव होता. मध्येच एकदा त्यांना ज्ञानेश्वरी वाचनाची गोडी लागली होती. मग दर गुरूवारी कृष्णनाथाच्या मंदिरात जाऊन ते ज्ञानेश्वरीचे पारायण करीत असत. बरेच दिवस हे चालू होतं. मग कधीतरी ते थांबलं.

प्रश्नः सगळे उपक्रम यशस्वी झाले का? तुम्ही ते पुढे चालू ठेवलेत ना?

नाही. सगळेच काही यशस्वी झाले नाहीत. काही तर अगदी प्राथमिक अवस्थेत असतानाच बंद पडले. काही पाच-दहा वर्षे चालू राहिले. आणि काही अजूनही चालू आहेत. गावकऱ्यांनी मिळून चालू ठेवलेत.

प्रश्न : या सगळ्या बद्दल आज आत्ता आपल्याला काय वाटते?

सध्या माझ्या मनात शेती विषयक विचारच सतत घोळत असतात आणि त्यामुळे मी कष्टीही होतो. शेतीला फार वाईट दिवस आले आहेत. लोक नव्याने शेतीकडे वळणे तर सोडाच, पण त्यातले लोक सुद्धा शेती सोडून दुसरीकडे वळू लागले आहेत आणि ही चिंतेची बाब आहे. आम्ही कामाला सुरूवात केली तेव्हा पाणी नाही म्हणून उत्पन्न नाही आणि उत्पन्न नाही म्हणून शेतीबद्दल अनास्था असं होतं. बाबुराजांनी प्रयत्न करून पाण्याचा प्रश्न सोपा केला, अधिक उत्पादन कसे होईल याबद्दल योग्य ते मार्गदर्शन केले आणि गावाची शिवारं डोलायला लागली. शेतीकामात उत्साह वाटू लागला. आता पुन्हा चित्र बदलते आहे. खताचे दर वाढले, मजुरीचे दर वाढले यामुळे शेती परवडेनाशी झाली. लोक शेतीसोडून दुसरीकंडे वळू लागले. असं वाटतं की या परिस्थितीत बाबुराजांच्या सारखा तज्ज्ञ, कल्पक मार्गदर्शक मिळाला तर अजूनही हे चित्र पालटू शकेल. मी दैववादी नाही. भोळ्या आशा बाळगणाराही नाही. पण हे चित्र बदलावे आणि शेती उत्तम व्हावी असे मला मनापासून वाटते. मग मी भूतकाळात जातो. जुन्या, बाबुराजांच्या आठवणींत गुंग होतो.

---

# व्यक्तित्वाची मूलद्रव्ये

१९५० ते १९७० या कालखंडात तळसंदे गावाला एक वेगळाच चेहरामोहरा प्राप्त झाला होता. विविध उपक्रम चालू होते. गावातील तरूण कार्यकर्ते अमाप उत्साहाने प्रत्येक उपक्रम यशस्वी करण्यासाठी झटत होते. शेतकरी शेतीबाबत सजग होते. कोणती खते वापरावी, किती वापरावी, बी-बियाणे कोणते वापरावे, पाणी किती व केव्हा द्यावे या बद्दल माहिती घेऊन नव्या ज्ञानाचा, तंत्राचा यथाशक्ती वापर करीत होते, मुले अभ्यास, खेळ, व्यायाम, शिबिरे, प्रभात फेऱ्या यात रमून गेली होती. गावात विचारवंतांची व्याख्याने होत होती. एकंदरीतच सर्व गावात एक प्रकारचे चैतन्य सळसळत होते. या चैतन्याचा स्रोत होता बाबुराजांचे निरहंकारी, विनयशील, मृदू भाषिक, सोज्ज्वळ व्यक्तिमत्व. या व्यक्तित्वाच्या मूलद्रव्यांचा परिचय करून घेणे उद्बोधक ठरेल.

व्यक्तित्वाची मूलद्रव्ये म्हणजे प्रेरणा (सहजप्रेरणा / सहज प्रवृत्ती), मनःशक्ती आणि प्रवणता होत. सहजप्रेरणा निसर्गदत्त असतात. संस्कारांनी किंवा शिक्षणाने त्यात बदल होऊ शकतात. त्यांचे उन्नयन होऊ शकते. त्यांना उदात्त रूप प्राप्त होऊ शकते. सहजप्रेरणा आणि मनःशक्ती यातील मुख्य फरक हा की, सहजप्रेरणा विशिष्ट क्षेत्रात आणि विशिष्ट परिस्थितीत प्रेरक होते तर मनःशक्ती या सर्वकाळ, सर्व परिस्थितीत मनाला सामर्थ्य, बळ प्राप्त करून देत असतात. एखादी व्यक्ती मोठाली कामे घडवून आणते ते या मनःशक्तीच्या बळावरच. प्रवणता म्हणजे व्यक्तित्वाचा एकंदर कल किंवा रोख होय. वस्तुतः सर्व

माणसांमध्ये व्यक्तित्वाची ही मूलद्रव्ये असतात. पण काही व्यक्तींच्या व्यक्तित्वात या मूलद्रव्यांची वैशिष्ट्यपूर्णता असते.वेगळे वैशिष्ट्यपूर्ण मिश्रण असते म्हणूनच त्यांचे व्यक्तित्व चार-चौघांपेक्षा वेगळे झालेले दिसते. त्यांच्याकडून घडणारे अचाट कार्य, त्यांचा पडणारा प्रभाव, भोवतालच्या लोकांच्या मनात त्यांच्याबद्दल असलेले आदराचे स्थान या सगळ्याच्या मागे त्यांच्या व्यक्तित्वाच्या मूलद्रव्यांची वैशिष्ट्यपूर्णता असते. बाबूराजांनी यशस्वी केलेले अनेक उपक्रम, कार्यकर्त्यांच्या मनात निर्माण केलेला उत्साह, घडविलेले विद्यार्थी या मागे त्यांच्या व्यक्तित्वाची वैशिष्ट्यपूर्ण मूलद्रव्ये होती. त्यांचे उन्नयन होते.

प्रमुख प्रेरणा :

१. सार्थकत्वाची ओढः-

सर्व प्राण्यांमध्ये असलेल्या आहार, निद्रा, भय, मैथुन या सहजप्रेरणांपेक्षा काही वेगळ्या प्रेरणा मनुष्यप्राण्यात उत्क्रांत झालेल्या आढळतात, त्या पैकी एक म्हणजे सार्थकत्वाची ओढ. जगणं हे जन्म आणि मृत्यू या दोन बिंदूमधील निरर्थक फरफटणं होता कामा नये. त्याला अर्थपूर्णता आली पाहिजे अशी प्रेरणा स्वाभाविक रीतीनेच माणसात असते. बाबुराजांच्या वृत्तीत या प्रेरणेचे प्रबळ आणि उन्नत रूप दिसते. आपले ध्येय प्राप्त करण्यात जीवनाची सार्थकता आहे या विश्वासातून ध्येय जिकडे नेईल तिकडे त्यांनी आपल्या जीवनाचा प्रवाह वळविला.

गांधीवादी तत्त्वज्ञानाला अनुसरून ग्रामोद्धाराच्या विधायक कार्यक्रमात काया-वाचा-मनेकरून सहभागी होऊन नवराष्ट्रनिर्मितीला हातभार लावणे हे त्यांचे ध्येय होते. या ध्येयाच्या पूर्तीसाठी त्यांनी आयुष्य झिजविले, कारण त्यातच त्यांना जीवनाचे सार्थक वाटत होते. गांधीजी ज्या विधायक कार्यक्रमावर भर देत होते त्यात चरख्याचा प्रचार होता, खादीचा वापर होता, ग्रामसफाई होती, राष्ट्रीय शिक्षण होते, ग्रामोद्धार होता, स्त्रियांची सुधारणा होती, अस्पृश्यता निवारण होते, दारूबंदी होती, परदेशी कापडावर बहिष्कार होता, हिंदू-मुस्लीम ऐक्य

होते आणि अशा अनेक गोष्टी होत्या. कार्यकर्त्यांनी आपापल्या सामर्थ्याप्रमाणे यातील गोष्टी निवडून विधायक कार्यक्रमात सहभागी व्हावे, असे गांधीजी सांगत. बाबुराजांनी यातील अनेक उपक्रम सुरू केले आणि यशस्वी करून दाखविले.

ध्येयनिष्ठेतून सार्थकत्व मिळविण्याच्या प्रेरणेच्या मागे आणखी एका व्यक्तीचाही प्रभाव होता. ती व्यक्ती म्हणजे त्यांचे शिक्षण, पालनपोषण करणारे आणि त्यांच्यावर जिवापाड प्रेम करणारे त्यांचे मामा, स.आ. तथा बापूसाहेब गुळवणी. साधी राहाणी व उच्च विचारसरणी हा मंत्र आपल्या आचरणात प्रत्यक्षपणे उतरविणाऱ्या, गांधीवादी विचारसरणीच्या मामांचा बाबुराजांवर प्रभाव होता. १४ जून १९६२ च्या दैनंदिनीत ते लिहितात, 'गावातल्या कार्याची कोणती दिशा? आपला त्यातला भाग कोणता? मामांनी ज्या मार्गाची आस धरली पण विफलता प्राप्त झाली त्यातच आपण पडून शेवटी यश गाठता येते का ते पहावयाचे कारण ते कार्य व तो मार्ग आपणासही मान्य आहे. आपल्या दृष्टीने या कार्यात विधायक समाजवाद आहे. आपण अनिश्चितपणाने, आजपर्यंत चाचपडत होतो. त्याला दिशा मिळालीसे वाटते.' ध्येयपथावर योग्य दिशेने वाटचाल करताना बाबुराजांनी व्यक्तिगत स्वार्थ, लाभ-हानी, मान-सन्मानाची अभिलाषा हे सर्व दूर ठेवले. ध्येयाचा पाठपुरावा करण्यासाठी त्यांना जणू ऊर्जेचे वरदान लाभले होते. त्यांचा दिवस पहाटे ४.३० ला सुरू होई आणि रात्री १०.०० ला संपे आणि या मधल्या काळात विश्रांती, डुलकी, टंगळ मंगळ, आळस यांच्या फटींना अजिबात थारा नसे. छात्रालय काम ८ तास, स्वाध्याय - १॥ तास, सोसायटी ऑफीस काम - २ तास, सूतकताई .।।।., फार्म रपेट काम ३ तास. या शिवाय, अन्य उपक्रमही असतच! (आधार : दैनंदिनी - ३० जुलै १९६२)

सर्वस्व वेचून ध्येयाप्रत जाण्याच्या सार्थकतेच्या प्रेरणेची मात्रा बाबुराजांकडे इतकी जास्त होती की त्यासाठी त्यांनी भय या सर्व प्राण्यांत असलेल्या सहजप्रेरणेवर मात केली होती. निर्भयपणे ते काम करीत. आबा कापसे यांनी आपल्या आठवणींत सांगितले आहे,

'बाबूराजे रात्री आठ वाजता कंदील घेऊन आपटी गावात यायचे. सर्व शेतकऱ्यांना आमच्या घरी एकत्र जमवून रात्री दोन-तीन तास रात्रीची शाळा घ्यायचे, आणि सुमारे ११ वाजता घरी परत जायचे. पावसाळ्यात पाऊस भरपूर असल्यामुळे वाटेतील ओढ्याला खूप पाणी असे. रस्त्यात चिखलही असे. शिवाय, मंगळवारपेठेच्या तळीजवळ रात्रीच्या वेळी बिबट्याचा वावर असे. आम्ही त्यांना एकटे जाऊ नका, आम्ही सोबत येतो असे म्हणत असू पण ते त्यांना पसंत नसे. कंदील, काठी, छत्री घेऊन रात्री ११ वाजता ते खुशाल एकटे जात!'

२. संघ प्रेरणा :-

बाबुराजांमध्ये संघप्रेरणा प्रबळ होती. कुटुंब करून राहाण्याच्या प्रथेत या प्रवृत्तीचे मानवी रूप दिसते. बाबुराजे कुटुंबप्रेमाच्या पलिकडे गेले होते. सगळे तळसंदे गाव हे त्यांचे विस्तारित कुटुंब झाले होते. कुटुंबातील कर्त्या गृहस्थाप्रमाणे ते गावाची सर्वथैव काळजी घेत होते. भले-बुरे पहात होते. त्याच्या सुखाची अहोरात्र चिंता करीत होते. या शिवाय आपटीतील काही कुटुंबेही विशेषतः किसन पोवार, दत्तू, कवठेकर आबा कापसे, धोंडिबा गोसावी, दत्तू कदम, बळीआण्णा बुचडे यांची कुटुंबेही त्यांच्या विस्तारित कुटुंबकक्षेत येत होती. शेतात कामासाठी येणारी माणसेही त्यांना कुटुंबीयच वाटत. म्हणूनच, कामासाठी येणारी कुणी स्त्री जर बाळंतीण झाली तर ते तिच्या घरी दोन पायली काळी गजली सुवासिक तांदूळ पाठवून देत. समाजाशी समरस होऊन काम करणे ही त्यांची कार्यशैली होती. त्यांचे सामुदायिक शेती, सामुदायिक डेअरी, पैसा फंड व मुष्ठि फंड योजना, सूतकताईचे वर्ग, इत्यादी उपक्रम म्हणजे त्याच्या संघप्रेरणेचे उदात्त - उन्नत रूप होते.

३. वत्सलता :-

बाबूराजांच्या संघप्रेरणेला लगटून असलेली प्रेरणा म्हणजे वात्सल्यप्रेरणा. छात्रालयातील मुलांना, कार्यकर्त्यांना, सामाजिक कामातील सहकाऱ्यांना त्यांनी वात्सल्यभावाने बांधून ठेवले होते.

तळसंदे गावात आणि आपटी-मंगळवारपेठ-नेबापूर येथे त्यांनी जी विधायक कामे केली, मामांच्या शेतीची कामे केली - त्यांच्या वत्सल भावामुळे त्यात सौकर्य, सुलभता आली. छात्रालयातील मुलांवर ते आपल्या मुलांप्रमाणे प्रेम करीत. त्यांची सर्वांगीण प्रगती व्हावी म्हणून झटत. त्यांच्यावर रागावत नसत. एकही कटू शब्द बोलत नसत. छात्रालयातून बाहेर पडलेले त्या वेळचे विद्यार्थी सांगतात की, सकाळी सहा वाजता ते अगदी गोड शब्दात उठवीत असत. त्यांचे ते शब्द, ती हाक अजून कानात गुंजते आहे. छात्रालयातील मुले रात्री दहा वाजता झोपत. पण रोज रात्री दोनच्या सुमारास बाबुराजे तिथे जात. मुलांच्या अंगावरील पांघरूण नीट करीत. त्यांचा वत्सल भाव प्रतीत करणारी एक आठवण बाळाराम चव्हाण यांनी सांगितली आहे. पारगावच्या मळ्यात हापूस आंबे भरपूर लागले होते. आंब्याला पाड आल्यावर त्यातील निम्मे पन्हाळ्याला-नेबापूरला घरी पाठविले आणि निम्मे तिथेच ठेवले. पिकल्यावर ते आंबे तळसंद्यातील वाड्यावर आणले आणि छात्रालयातील मुलांना खायला दिले आणि घरी न्यायलाही थोडे थोडे दिले. मळ्यातील केळी, पेरू, पपई, जांभळे इ. चा आस्वाद छात्रालयातील मुलांना घेता येत असे तो बाबुराजांच्या ठिकाणी असलेल्या वत्सलभावामुळेच. त्यांची वत्सलता केवळ मुलांपुरती मर्यादित नव्हती. तिच्या परिघात प्रौढही येत. एका आठवणीनुसार ते फिरायला जाताना नेहमी शेतांच्या बांधा बांधावरून जात असत. एकदा जयसिंग पाटील यांच्या शेतातील बांधावरून जात असताना शेतात तण फार वाढल्याचे त्यांच्या नजरेस पडले. ते जयसिंग यांना भेटले. त्यांना म्हणाले, 'अरे, तण फार वाढलेय. अशाने पिकाचे नुकसान होते. आधी भांगलून, तण काढून टाक पाहू.' जयसिंग म्हणाले, 'मला ही दिसतंय सगळं, पण माझ्याकडे पैसे नाहीत. बायांची मजुरी कुठून देऊ?' बाबुराजांनी आवश्यक तेवढे पैसे त्यांना दिले आणि त्यांची नड भागली. बाबुराजांच्या या कृतीच्या मागे दया अथवा करूणा नव्हती. त्यांना दया, करूणा करणे पसंत नव्हते. दया किंवा करूणा केली जाते तेव्हा करूणा करणारी व्यक्ती श्रेष्ठ किंवा मोठी आणि जिच्यावर करूणा केली जाते ती

त्या पेक्षा कनिष्ट दर्जाची किंवा गरजू असा संबंध निर्माण होतो. असा विषम संबंध त्यांना कुठेच अभिप्रेत नव्हता. कोणत्याही दोन व्यक्तींनी परस्परांशी व्यवहार करताना माणूसपणाच्या समान पातळीवरून केला पाहिजे, असे ते म्हणत आणि म्हणूनच जयसिंग पाटीलना जे पैसे दिले त्या मागे त्यांची वात्सल्याची प्रेरणा होती. वैयक्तिक जिव्हाळा हे त्यांच्या स्वभावाचे वैशिष्ट्य होते आणि या जिव्हाळ्याचा आवाका, परिसर आणि परिघ विस्तृत होता. त्यांनी जी लोकसेवा केली तिच्यामागे केवळ कर्तव्याची कोरडी भावना नव्हती तर प्रेम आणि जिव्हाळ्याने युक्त असे वात्सल्य होते.

मनःशक्ती

१. बुद्धिमत्ता :-

शिक्षणातील यश ही बुद्धिमत्तेची एक कसोटी मानली जाते (एकमेव नव्हे) बाबुराजे बी.एस्सी. (ॲग्री) होते. शाळा-कॉलेजामध्ये हुशार आणि कष्टाळू विद्यार्थी म्हणून ते ओळखले जात. अनेक अभ्यास विषयात (शिक्षणक्षेत्रातील) चांगली गती असल्यामुळे, छात्रालयातील मुलांना शिकविणे, त्यांच्या अभ्यासातील शंका व अडचणींचा निरास करणे हे त्यांना सहज शक्य झाले. अगदी पहिलीपासून ते ग्रॅज्युएशन पर्यंतच्या मुलांचा ते अभ्यास घेत असत. शेतीं विषयक संशोधनाकडे त्यांचा ओढा होता. भाताच्या निरनिराळ्या बियाणांचा प्रयोग ते स्वतः आपल्या शेतात करीत. कोणतेही नवीन प्रकारचे बियाणे संशोधन होऊन आले तर, ते स्वतः आपल्या शेतात प्रयोग करीत. त्याची इष्टानिष्टता आजमावून पहात आणि मगच इतरांना सांगत असत. संपर्कातील शेतकऱ्यांच्या शेतावर जाऊन त्यांना योग्य तो सल्ला देणे, मार्गदर्शन करणे हे ते आवर्जून करीत. जपानी भातशेतीच्या संदर्भात त्यांनी केलेला प्रयोग त्यांच्या दृष्टीने यशस्वी व उपयुक्त झाला होता. त्या विषयी त्यांनी एक पुस्तकही लिहिले होते. दुर्दैवाने आज ते पुस्तक उपलब्ध नाही.

आणखी एक महत्त्वाचा बुद्धिमत्तेचा पैलू त्यांच्या

कार्यकर्तृत्वात आणि कार्यशैलीत स्पष्टपणे दृग्गोचर होतो. तो म्हणजे भावनात्मक बुद्धिमत्ता (emotional intelligence) स्वतःच्या, इतरांच्या आणि समूहांच्या भावना जाणून घेण्याची त्यांचे मूल्यमापन करण्याची व त्यांना योग्य दिशेने वळविण्याची क्षमता म्हणजे भावनात्मक बुद्धिमत्ता. या बुद्धिमत्तेच्या प्रभावामुळे शोषितांच्यासाठी आयुष्यभर निःस्वार्थी वृत्तीने कार्यरत राहण्याचा त्यांनी निर्णय घेतला. शोषितांच्या, पीडितांच्या भावना त्यांना समजत, त्यांचे दुःख कमी व्हावे म्हणून ते पोटतिडकीने विचार करीत. हे विविध आणि गुंतागुंतीचे वास्तव आणि प्रश्न सर्वांगांनी समजून घेण्यासाठी आणि त्यांची उत्तरे शोधण्यासाठी जी व्यापक आणि विधायक बुद्धी लागते, ती त्यांच्या जवळ होती हे त्यांना व त्यांच्या कार्याला जो अनुकूल प्रतिसाद मिळाला त्यावरून स्पष्ट होते.

चिंतनशीलता –

बुद्धिमत्तेचे प्रगल्भ रूप चिंतनशीलतेत प्रकटते. ज्या कार्याला व्यापक तत्त्वज्ञानाचा, चिंतनाचा भक्कम पाया असतो, ते जोमाने वाढते व टिकून राहाते. बाबुराजांचे व्यक्तित्व चिंतनशील होते. वस्तुस्थितीचा सर्वांगांनी वेध घेतल्यानंतर मनात निर्माण झालेले विचार अमूर्त पातळीवर नेऊन त्यांची तात्त्विक छाननी करण्याची त्यांना सवय होती. त्यांच्या दैनंदिनीतील एक उतारा उदाहरणादाखल पाहता येईल.

‘निर्णय घेता न येणे या सारखा दुसरा घातक दोष नाही. निर्णय न घेण्यापेक्षा चुकीचा निर्णय घेणे हे अधिक बरे. चुकीचे निर्णय घेणाऱ्या अनेक मानवांनी जीवनात यश मिळविले आहे. परंतु जो निर्णय घेऊ शकत नाही, ज्याचे मन नेहमी हे की ते अशा गोंधळात गुरफटलेले असते असा मनुष्य मात्र कधीही यशस्वी झालेले ऐकिवात नाही. ज्याला निर्णय घेता येत नाही त्याला कृती करता येत नाही आणि ज्याला कृती करता येत नाही त्याला कोणत्याही क्षेत्रात यश मिळविता येत नाही.’

एका दिवशीच्या दैनंदिनीत ते लिहितात, ‘इरिगेशनकडे हिंडून आलो. मन विषण्ण झाले. या सर्वांचे भवितव्य काय? विश्व व्यवस्थेत

याचे स्थान अत्यल्प असले तरी काहींचे जीवन या गोष्टींनी भरून गेलेले असते. अर्थात आपण फक्त साधनभूत आहोत. होणारे तो घडवीत असतो या कल्पनेनेच समाधान मिळवावयाचे'.

या चिंतनशीलतेमुळे ते नीतिवादी बनले. जे नैतिक ते स्वीकार्य आणि अनैतिक ते त्याज्य अशी त्यांची भूमिका होती मात्र, नीतीच्या कल्पना पारंपरिक नव्हत्या. एकोणिसाव्या शतकातील प्रबोधन चळवळीने जी चिकित्सक पद्धती स्वीकारली होती आणि जिचा प्रचार केला होता, ती त्यांना माहित होती आणि म्हणूनच नैतिकतेच्या कल्पनाही ते डोळसपणे, चिकित्सकपणे विचार करून स्वीकारीत असत. स्वातंत्र्य, समता, बंधुता ही मूल्ये यामुळेच त्यांच्या नैतिकतेच्या केंद्रस्थानी होती. जातिभेदासारखी माणसामाणसात श्रेष्ठ–कनिष्ठ असा भेद करणारी कृती त्यांच्या दृष्टीने अनैतिक होती. नीतीत एक प्रकारची शक्ती असते. नीतीचे बळ मोठे असते. ते व्यक्तीत आत्मविश्वास निर्माण करते. ज्या आत्मविश्वासाने आणि धडाडीने त्यांनी अनेक लोकोपयोगी कामे केली त्या मागे त्यांचा नीतिवादी दृष्टिकोण आणि नैतिकता होती.

संघटन – संघटनशक्ती ही एक संमिश्र शक्ती आहे. अनेक मनःशक्तींचा मिलाफ त्यात असतो. लोकांबद्दल प्रेम, माणसे हाताळण्याचे कौशल्य, मूल्यनिष्ठा आणि आत्मविश्वास यामुळे त्यांची संघटनशक्ती प्रभावी झाली होती. छात्रालयातील लहान मुले, तरूण कार्यकर्ते, मध्यमवयीन शेतकरी आणि अगदी वृद्ध माणसेही त्यांच्या भोवती असत, त्यांच्या हाकेसरशी येत व कामात सहभागी होत. तळसंदे येथे आणि काही प्रमाणात आपटी नेबापूर येथे त्यांनी जे सामाजिक काम उभे केले, त्याकडे नुस्ती नजर टाकली तरी त्यांची संघटनशक्ती आजमावता येते. छात्रालय, सहजीवन शेती, शेती सोसायटी, नवजीवन युवक मंडळ, डेअरी सोसा., पाणी पुरवठा सोसायटी, ऑइल मिल अशा अनेक संस्थांबरोबरच प्रौढ शिक्षण, सूत कताई, ग्राम स्वच्छता असे उपक्रमही चालू होते. या संस्था आणि हे उपक्रम यशस्वी होण्यासाठी परिवार योजना होती. म्हणजे प्रत्येक कार्यासाठी एक परिवार – एक गृप निश्चित केलेला असे. त्यांनी ते काम पुढे न्यायचे व यशस्वी करावयाचे अशी ती

कल्पना होती. कुमार परिवार, बालिका परिवार, किसान परिवार, मजूर परिवार, सहजीवन परिवार असे परिवार होते. प्रत्येक परिवाराने काय काम करावयाचे ते निश्चित केलेले असे. उदाहरणार्थ, किसान परिवाराचा तपशील असा – १) साप्ताहिक उत्पादक काम २) शेती योजना, शेती ठेव ३) रेकॉर्ड ४) खताचे खड्डे ५) खता बाबत, कीटक निवारणाबाबत व्यवस्था किंवा सहजीवन परिवाराचे अपेक्षित काम पुढील प्रमाणे – १) कर्जमुक्ती २) वार्षिक बजेट ३) बचत ४) मुलांचे शिक्षण ५) ग्रामसफाई, प्रार्थना, ग्रामविकास निधी, श्रमदान ६) श्रमाची प्रतिष्ठा ७) समतेवर निष्ठा (आधार १९६२ ची दैनंदिनी) या विविध परिवारातील लोकांनी, कार्यकर्त्यांनी तळसंद्यामध्ये जे काम उभे केले त्यात त्यांच्या तळमळीचा, आत्मीयतेचा आणि निष्ठेने, उत्साहाने कामात सहभागी होण्याचा वाटा नक्कीच आहे. पण त्याच बरोबर ज्यांनी ही सर्व बांधणी केली, आखणी केली त्या बाबुराजांच्या संघटनशक्तीचाही वाटा आहे. माणसे आणि संस्थांचे संघटन ते कौशल्याने करीत त्यातून नवे काम व कार्यकर्ते उभे रहात.

प्रवणता –

उत्क्रांतिप्रवण – बाबुराजे अत्यंत आशावादी आणि चिकाटीने काम करीत राहाणारे होते. क्वचित प्रसंगी त्यांच्या दैनंदिनीत मन विषण्ण झाल्याचे उल्लेख आढळतात खरे, पण ते तेवढ्या पुरतेच असे. पुन्हा ते आपल्या कामात गढून जात. विधायक काम करण्याचे त्यांचे ध्येय होते. त्यामुळे वैचारिक भूमिकाही उत्क्रांतिप्रवण होती. शोषण, दडपशाही, हिंसक आंदोलने, मालमत्तेची नुकसानी या गोष्टी त्यांच्या विचारसरणीत बसल्या नाहीत. सामंजस्य, सहिष्णुता, बंधुता यांची त्यांनी कास धरली. समतेसाठी आंदोलन करण्याऐवजी सामंजस्यावर आधारित समतेचे प्रयोग करणे त्यांनी पसंत केले. कुठल्या तरी अचाट कृतीने जग एकदम बदलणार नाही. शिक्षणाच्या आधारे समाजाचा कायापालट होऊ शकेल. शिक्षणामुळे गरिबांना जीवनमान उंचावण्याच्या संधी मिळतील, सुबत्तेची दारे खुली करणारी वाट दिसेल आणि शिक्षणामुळे श्रीमंतानाही

आपल्या संपत्तीतील काही वाटा गरिबांसाठी देण्याची प्रेरणा मिळेल यावर त्यांचा विश्वास होता आणि म्हणूनच छात्रालय, मुलींचे छात्रालय प्रौढ साक्षरतेचे वर्ग, गोपाळ विद्यालय असे प्रयोग त्यांनी केले.

त्यागप्रवण - बाबुराजे गांधीवादी होते. गांधीजींच्या विचारसरणीच्या आणि जीवनशैलीच्या प्रभावामुळे अगदी महाविद्यालयीन काळापासून त्यांनी स्वीकृत दारिद्र्याचे व्रत घेतले होते आणि आयुष्याच्या अखेरपर्यंत ते पाळले. ते खादीचे कपडे वापरीत. त्याच्या कापडासाठीचे सूतही स्वतः कातीत असत. बसण्यासाठी (आसन) आणि झोपेसाठी घोंगडी वापरीत आणि पांघरण्यासाठी पुष्कळ वर्षे त्यांनी आपल्या आईच्या नेसूची चौघडी वापरली. कामासाठी किंवा कौटुंबिक कारणासाठी जावे लागे तेव्हा अधिकांश वेळी ते चालत जात. जितके अंतर चालणे शक्य आहे तेवढे चालायचे आणि त्यानंतर एस्.टी. सेवा वापरायची असा प्रवास ते करीत. सायकल व्यतिरिक्त खाजगी वाहनाचा वापर त्यांनी क्वचितच केला. गरजा कमी करण्यावर त्यांचा भर होता. त्यामुळे, स्वतःसाठी किंवा संसारासाठी नोकरी अथवा व्यवसाय करून त्यांनी पैसे मिळविले नाहीत. मामांची शेती करणे आणि उरलेला सर्व वेळ व शक्ती सामाजिक कार्यात व्यतीत करणे अशी त्यांची कार्यपद्धती होती. या त्यांच्या भूमिकेचा वेगळा अर्थही निघू शकतो. त्यांनी संसाराकडे, सांसारिक जबाबदाऱ्यांकडे पुरेसे लक्ष दिले नाही असा अभिप्राय व्यक्त केला जाऊ शकतो परंतु व्यक्तिगत लाभाची अपेक्षा न धरता सामाजिक कार्य करणाऱ्या लोकांना याला सामोरे जावेच लागते.

त्यागप्रवणतेशी सुसंगत अशी स्वावलंबनाची रीत त्यांनी स्वीकारली होती. स्वतःची कामे स्वतः करणे अशा साध्या व्यावहारिक कल्पनेला पोटात घेणारी त्यांची व्यापक स्वावलंबन - प्रेरणा होती. स्वतःचे अन्नधान्य स्वतः पिकविणारा, शक्य तेवढा स्वयंपूर्ण असा, सहकारी तत्त्वावर चालणारा, समताधिष्ठित समाज निर्माण करण्यासाठी आपल्या परीने काम करीत राहण्याचा मार्ग त्यांनी निवडला होता.

स्वावलंबनाचा हा उन्नत आविष्कार म्हणावा लागेल.

शिस्त – बाबुराजांच्या कार्यपद्धतीत शिस्तीला अनन्यसाधारण महत्त्व होते. त्यांचे दिवसाचे वेळापत्रक काटेकोरपणे तयार केलेले असे. त्यात क्वचितच बदल होई. दर शुक्रवारी ते पुढील आठवड्यातील कामाची आखणी करीत, आराखडा तयार करीत. प्रत्येक महिन्याच्या तीस तारखेला पुढील महिन्यातील कामाचा आराखडा आणि डिसेंबर महिन्याच्या अखेरीस पुढील वर्षाच्या कामाचा आराखडा तयार होई आणि तो दैनंदिनीत टिपून ठेवला जाई. छात्रालयातील विद्यार्थ्यांना काय शिकवावयाचे, कोणत्या गोष्टी सांगावयाच्या, कोणती गीते / कविता पाठ करून घ्यायच्या याचे तपशीलवार नियोजन ते करीत. मामांच्या शेतीत कोणत्या खताचा किती डोस केव्हा द्यावयाचा या बद्दलच्या सविस्तर नोंदी त्यांच्या दैनंदिनीत आढळतात.

कार्यपद्धतीतील शिस्तीबरोबरच आर्थिक शिस्त त्यांना प्रिय होती. मामांच्या शेतीचा हिशेब विविध सोसायट्यांचे हिशेब, सामुदायिक अथवा सहकारी तत्त्वावर चाललेल्या उपक्रमांचे हिशेब याकडे ते कटाक्षाने लक्ष ठेवीत.

वेळ पाळणे, दिलेला शब्द पाळणे, आपले नियोजित काम ठरविलेल्या वेळेत पूर्ण करणे या बाबतीतील शिस्त त्यांच्या अंगी बाणली होती.

बाबूराजांकडे सत्ता नव्हती आणि संपत्तीही नव्हती. प्रभाव पडेल अशी शरीरयष्टी नव्हती की देखणेपण नव्हते. पण अंतर्गत वैभव खूप होते. त्यांच्या मृदू बोलण्यात, हलक्या स्मितात, टपोऱ्या डोळ्यात त्या अंतर्गत वैभवाचे तेज प्रगटत असे. त्यांच्या व्यक्तित्वाच्या मूलद्रव्यांची वैशिष्ट्यपूर्णता आणि त्यांचा मिलाफ यामुळे, त्यांच्या हाकेला ओ देऊन अनेक कार्यकर्ते पुढे येत, कामाचा वाटा उचलीत. हा जो प्रेरक गुण त्यांच्याठायी होता, त्याच्या गाभ्याशी निखळ, प्रामाणिकपणा आणि ध्येयपूर्तीसाठी असलेली विलक्षण तळमळ होती. आपले जीवन त्यांनी त्यावर तोलले होते.

---

# व्यक्तित्वाचा परिघ

सुमारे साडे पाच फूट किंवा कदाचित त्याहून थोडी अधिक उंची, गव्हाळ वर्ण, उन्हातान्हात काम केल्यामुळे चेहरा रापलेला, कृश आणि कष्टाची कामे केल्याने काटक पण खरखरीत झालेली शरीरयष्टि, डोक्याला टक्कल, चेहऱ्यावर नेहमी विलसणारे प्रसन्न स्मित, चमकदार डोळे आणि पिकाचे बारीकसे वैशिष्ट्यही, व बदल अचुक टिपणारी तेजस्वी, भेदक दृष्टी, मृदू, सौम्य वाणी आणि निश्चयी वृत्ती या वैशिष्ट्यांनी युक्त अशी बाबुराजांची प्रतिमा त्यांचा परिचय असलेल्या लोकांना आठवते. त्यांचा गोष्टीवेल्हाळपणा, सर्वांशी मिळूनमिसळून वागण्याची रीत, कामाचा सपाटा, साधी राहाणी हेही आठवते. त्यांनी उभे केलेले काम अजून आपल्या खुणा टिकवून आहे. परंतु, त्यांच्या व्यक्तिगत जीवनाची माहिती, व्यक्तित्वाचे अन्य पैलू याबद्दल त्यांनीही मुग्धता ठेवली आणि अन्य कोणी त्यात फारसे डोकावले नाही. या व्यक्तित्वाचा परिघ आपल्या दृष्टीच्या टप्प्यात आणण्याचा प्रयत्न आता आपण करणार आहोत.

बाबुराजांचा जन्म ४ सप्टें १९२३ रोजी नेबापूर येथे झाला. त्यांचे वडील गोविंदपंत तथा रावसाहेब हे चिकोडी तालुक्यातील येडूर गावचे इनामदार मुलालिक देसाई होते. तिथे त्यांची जमीन होती, वाडा होता. येडूरच्या वीरभद्र देवाची व्यवस्था त्यांच्या घराण्याकडे होती. पेशाने ते वकील होते. चिकोडी, बेळगाव येथे ते वकिली करीत. ते काँग्रेसचे पाईक होते. खादीधारी होते. स्वातंत्र्यपूर्व काळातील

काँग्रेसच्या कार्यात त्यांचा सक्रिय सहभाग असे. बेळगाव शहरात आणि जिल्ह्यातील अन्य गावात जाऊन ते व्याख्याने देत असत. काँग्रेसचा प्रचार करीत असत. त्यांची पत्नी म्हणजे बाबुराजांची आई हरिणाबाई ही पन्हाळा तालुक्यातील नेबापूरच्या गुळवणी घराण्याची माहेरवासिनी. तिचे प्राथमिक शिक्षण झाले होते तथापि, रावसाहेबांनी तिलाही आपल्या सामाजिक कार्यात सहभागी करून घेतले होते. हरिणाबाईही खादीधारी होत्या आणि बेळगावमधील सभांमध्ये बोलणे, काँग्रेसच्या पिकेटिंगच्या वगैरे उपक्रमात भाग घेणे इ. मध्ये त्या उत्साहाने सहभागी होत असत. बाबुराजांच्या जन्मापूर्वी हरिणाबाईना एक मुलगी झाली होती पण, ती अगदी लहान असतानाच वारली. बाबुराजांच्या जन्मानंतर सुमारे दोन वर्षांनी हरिणाबाईंचे किरकोळ आजाराचे निमित्त होऊन, सन १९२५ मध्ये निधन झाले. ना कळत्या वयात झालेला हा आघात मोठा होता. या घटनेची झळ रावसाहेबांना जास्त पोहोचली. त्यांना विरक्तीने घेरले. वकिलीतील आणि सामाजिक कार्यातील लक्ष उडाले. जप-जाप्य-अनुष्ठाने यात त्यांनी स्वतःला गुंतवून घेतले. अगदी थोड्याच अवधीत त्यांनी चिकोडी-बेळगाव येथील वास्तव्य हलवले आणि मुलाला घेऊन ते नेबापूर येथे आले आणि शेवटपर्यंत म्हणजे सन१९५२ साली निधन होईपर्यंत ते तिथेच राहिले.

वडिलांबरोबर आजोळी आलेले बाबुराजे तिथेच राहिले. त्यांच्या आजीने व मामांनी त्यांचे संगोपन उत्तम रीतीने केले. कोडकौतुक केले, कशाची उणीव भासू दिली नाही. मामांनी त्यांच्या शिक्षणातही कोणतीच कसूर राहू दिली नाही. ते त्या घरात इतके मिसळून गेले की जणू त्या घरचे सदस्य झाले. बाबुराजांचे प्राथमिक शिक्षण पन्हाळ्यात, तर माध्यमिक शिक्षण कोल्हापूर येथे झाले. त्यानंतर इंटर पर्यंत ते कोल्हापुरातील राजाराम महाविद्यालयात होते व पुढे पुणे येथील ॲग्रीकल्चर कॉलेज मधून त्यांनी पदवी प्राप्त केली. शाळेत आणि महाविद्यालयात एक हुशार आणि अभ्यासू विद्यार्थी म्हणून ते ओळखले जात. कबड्डी, क्रिकेट या खेळांची त्यांना आवड होती आणि त्यात थोडेफार प्राविण्यही त्यांनी मिळविले होते. परंतु, त्यांचा भर

वाचनावर जास्त होता. मामांच्या संस्कारामुळे या वाचनाला शिस्त होती आणि निश्चित दिशाही होती.

बौद्धिक विकास होण्याच्या दृष्टीने आणि जीवनाची दिशा निश्चित होण्याच्या दृष्टीने त्यांचे शेती महाविद्यालयातील जीवन आणि त्या निमित्ताने पुण्यात झालेले वास्तव्य महत्त्वाचे ठरले. ते वसतिगृहात रहात असताना, विद्यार्थ्यांचे अ, ब, क, ड असे गट करून त्या प्रत्येक गटाकडे मेसचे काम सोपविले जाई. चांगले काम करणाऱ्या गटाला सन्मानदर्शक बक्षिस मिळे. बाबुराजांच्या गटाला नेहमीच हा सन्मान मिळे. कारण, आपल्या बरोबर सहाध्यायांना घेऊन ते स्वतः बाजारात व भाजी मंडईत जात. काळजीपूर्वक धान्य व भाजी खरेदी करीत व स्वयंपाक करणाऱ्यांना आणून देत असत. त्यामुळे आहारात विविधता येई व खर्चही मर्यादित येई. ते हिशेब अगदी चोख ठेवीत असत. या सगळ्यामुळे केवळ १५ ते २० ₹ महिना वर्गणी पुरेशी होत असे.

कॉलेजमध्ये असताना ते सेवादलाचे कामही करीत असत. ते आणि त्यांच्या मित्रांचा समूह उपक्रमशील चळवळे म्हणून प्रसिद्ध होता. महात्मा गांधीजींची प्रार्थना त्या काळात जेव्हा जेव्हा पुण्यात झाली, तेव्हा तिथल्या व्यवस्थेचे काम या मंडळींकडे सोपविले गेले. बाबुराजे त्यांच्याकडे सोपविलेले काम निष्ठेने आणि काळजीपूर्वक करीत. ते दिवस गांधीजींच्या प्रभावाने भारलेले, मंतरलेले दिवस होते. मामांच्या सहवासामुळे आणि संस्कारांमुळे बाबुराजांच्या मनावर गांधीविचाराची मोहिनी आधी होतीच ती आता अधिक गडद झाली. एस्.एम्. जोशी, नानासाहेब गोरे, ग.प्र. प्रधान, मधु दंडवते, शिरूभाऊ लिमये अशा लोकांशी संबंध आल्यामुळे,त्यांच्याशी चर्चा केल्यामुळे, त्यांची भाषणे ऐकल्यामुळे विचारांची दिशा निश्चित झाली. गांधीजींची भाषणे, त्यांचे लेखन आणि त्यांचे कार्य या सगळ्याचा परिणाम होऊन त्यांनी आपली जीवनशैली निश्चित केली. सर्व बंधने तोडून, दारिद्र्याची कास धरावयाची, गरजा कमीत कमी करून समाजाच्या सेवेसाठी सदैव तत्पर रहावयाचे हे जीवितध्येय पक्के केले. नोकरी करावयाची नाही, खेड्यात जाऊन तिथले जीवन सुखकर करण्याचा प्रयत्न करावयाचा असे

ठरविले. त्यांचे मामा गांधीवादी होते, त्यांची राहाणी अत्यंक साधी असे आणि आपल्या परिसरात सामाजिक कार्य करीत राहून, बदल घडवून आणण्याचा त्यांचा प्रयत्न चालू होता. मामांच्या या उपक्रमात आपणही सामील व्हायचे असे बाबुराजांनी ठरवून टाकले. महाविद्यालयात असल्यापासूनच ते खादी वापरू लागले. त्या काळात खादीचा शर्ट, खादीची विजार व साधी चप्पल असा त्यांचा पोषाख असे. झोपण्यासाठी व बैठकीसाठी ते घोंगडी वापरील असत. स्वयंशिस्त, स्वावलंबन आणि नियमितपणा यासंबंधीच्या सवयीही त्यांनी याच काळात आत्मसात केल्या.

एक काहीसा हलकाफुलका, गंमतशीर वाटावा असा प्रसंग व संवाद आठवणींमध्ये सतत सांगितला जातो, तो असा – एकदा बाबुराजे वसतिगृहातील आपल्या खोलीच्या बाहेरच्या बाजूला, व्हरांड्यात घोंगडी टाकून काही वाचत बसले होते. तेवढ्यात एक गृहस्थ तिथे आले. त्यांनी बाबुराजांची खोली हीच का? ते कोठे आहेत अशी चौकशी सुरू केली. त्यांच्यात संभाषण सुरू झाले,

'त्यांना ओळखता का तुम्ही?'

'हो काय काम आहे आपलं?'

'अहो, असं समजलं की ते येडूरचे इनामदार आहेत. बक्कळ जमीनजुमला आहे. शिवाय शिकलेलेही आहेत. आपल्या मुलीसाठी हे स्थळ चांगले आहे, या विचाराने, चौकशी करायला आलो आहे.'

'ते ठीक आहे पण, मला विचाराल तर तुम्ही या स्थळाचा विचार करू नये'

'का हो, व्यसनीबिसनी आहेत की काय? छंदी-फंदी?'

'नाही, तसे नव्हे पण थोडे विक्षिप्त आहेत. गांधीविचाराचं वेड त्यांच्या डोक्यात शिरलंय – खादीचे कपडे घालतात, त्याना इस्त्री नसते, चैनीची सवय नाही. तुमच्या मुलीची हौस-मौज कशी होईल? तिला सुख मिळेल असे मला वाटत नाही.'

'तुमचे आणि त्यांचे भांडण-बिंडण नाही ना?'

'नाही, नाही'

'मग जरा उठा आणि माझी त्यांची गाठ घालून द्या.काय करायचं ते मी पाहतो कुठं आहेत ते?'

'इथंच तर आहेत. तुम्ही बाबुराजाशीच बोलताय.'

इतकं बोलणं झाल्यावर,'पुन्हा येतो' असे पुटपुटत त्या गृहस्थानी पुणेरी जोडे पायात सरकवले आणि जे गेले ते पुन्हा आलेच नाहीत.

हा किस्सा बाबुराजांच्या त्या काळच्या मित्रमंडळीत वारंवार सांगितला जाई आणि मग हास्याचे फवारे उडत. रामभाऊ तुपे, दत्ता सावळे, यावलकर हे त्या काळातील त्यांचे मित्र. पुढेही त्यांची मैत्री अखंड राहिली. हे सर्वच जण आपापल्या पद्धतीने सामाजिक कार्य करीत राहिले.

सन १९४६ मध्ये शिक्षण संपवून नोकरी करायची नाही या निश्चयाने बाबुराजे घरी आले. शेती व समाजकार्य यात लक्ष घालू लागले. १९५१ साली त्यांचा शकुंतला(सखुताई) या मामाच्या मुलीबरोबर विवाह झाला. सखुताई शांत व समंजस स्वभावाच्या होत्या. लहानपणापासून बाबुराजांना ओळखत होत्या. त्यामुळे त्यांनी त्यांच्या सामाजिक कार्याबद्दल तक्रार केली नाही की अडवणूक केली नाही. क्वचित प्रसंगी त्या त्यात सहभागी होत असत. त्या धार्मिक प्रवृत्तीच्या होत्या. व्रते-उपवास करणाऱ्या, धार्मिक ग्रंथांचे नित्य वाचन करणाऱ्या अतिशय श्रद्धाळू अशा होत्या. बाबुराजांना या गोष्टी पटत नसल्या तरी त्यांनी विरोध अथवा अडकाठी केली नाही. दोघांच्या समंजसपणामुळे त्यांच्यात फारसे मतभेद झाले नाहीत. त्यांना मोहन (१९५२), नंदिनी (१९५४) नलिनी (१९५७) व किरण (१९५९) अशी चार अपत्ये झाली. मुलांबद्दल त्यांना ममत्व होते. त्यांना उत्तम आयुष्यक्रम लाभावा अशी त्यांची इच्छा होती. दैनंदिनीतील दोन छोट्या नोंदींच्या नमुन्यावरून त्याची कल्पना येऊ शकते. एके ठिकाणी ते लिहितात मला वाटतं, १) आयुष्यभर सातत्यानं करण्यासारखं भरपूर काम मिळावं व त्या योगे स्वाभिमानानं जीवन जगणं शक्य व्हावं २) मुलांचा

शिक्षणक्रम व जीवनदिशा समाधानकारक असावी. (दि. १३ जाने. ६२). दुसऱ्या एके ठिकाणी ते लिहितात, 'मामांनी सांगितलं होतं, मुलं उद्योगी व्हावी असं वाटत असेल तर आपण सतत उद्योगात मग्न असलं पाहिजे. मग तो उद्योग कसलाही असो. त्या प्रमाणे करायचं' (२७ जून ६२) त्यांचा स्वेच्छेने पत्करलेला आयुष्यक्रम आणि मुलांच्या आयुष्यक्रमाबद्दलचे विचार यात काहीसा अंतर्विरोध होता. त्यांनी चालून आलेल्या सरकारी नोकऱ्यांकडे लक्षही न देता समाजसेवेचे व्रत अंगिकारले. इस्राइलला जाण्याची तीन वेळा संधी आली पण त्यांनी ती नम्रपणे नाकारली. तत्कालीन राजकीय नेत्यांनी अनुकूलता दाखवूनही, सत्तेच्या वर्तुळाशी संबंध न ठेवता तळसंदे व नेबापूर-आपटी एवढेच कार्यक्षेत्र मर्यादित करून तेथे ते कार्य करीत राहिले. मुलांना सांगताना मात्र ते, आपल्या कर्तृत्वाला मर्यादा असू नयेत, जगाच्या पटलावर आत्मविश्वासाने वावरता आले पाहिजे असे सांगत असत. ज्ञानमार्गी होऊन मुलांनी आपला ठसा उमटवावा असे त्यांना वाटे. अर्थात, हे त्यांचे वाटणे केवळ आपल्या अपत्यांपुरते मर्यादित नव्हते. संपूर्ण तळसंदे गाव आणि आपटी-नेबापूर मधील कार्यकर्ते, त्यांच्या बरोबर शेतात काम करणारे लोक, छात्रालयातील आजी-माजी मुले हे सर्व त्यांच्या कुटुंबाच्या कक्षेत येत असे. या व्यापक परिवारातील मुलांनी नवराष्ट्र निर्माणाच्या कार्यात सहभागी होऊन आपला ठसा उमटवावा ही त्यांची अपेक्षा होती.

स्वातंत्र्यप्राप्तीनंतर, एक स्वयंपूर्ण, समृद्ध, न्याय व समतेवर आधारित असे शांततापूर्ण समाजजीवन असलेले नवे राष्ट्र निर्माण करण्याच्या कल्पनेने भारून जाऊन ज्यांनी सामाजिक कार्याची वाट स्वीकारली अशा लोकांपैकी बाबुराजे एक होते. शेतकऱ्यांपर्यंत शेतीविषयक अद्ययावत ज्ञान पोहोचविणे, शेतकऱ्यांच्या विकासाच्या शासकीय योजना त्यांच्यापर्यंत पोहोचवून त्यांना त्यात सहभागी करून घेऊन शासनशकटाचा हिस्सा बनविणे, समता, न्याय अशी मूल्ये रूजविणे आणि शिक्षण घेऊ इच्छिणाऱ्यांना सर्वतोपरी सहाय्य करणे असा एकंदर त्यांच्या कामाचा रोख होता. त्यांच्या कार्यपद्धतीची दोन

वर्तुळे होती. एक म्हणजे कामाचे काटेकोर, तपशीलवार नियोजन. अनेक बाजूंनी विचार करून अनेकांशी विचार विनिमय करून ते हे नियोजन करीत असत. नियोजनाच्या बाबतीत, वेळेच्या बाबतीतील नियमितपणा, आर्थिक बाबतीत प्रामाणिकपणा आणि हिशेबातील काटेकोरपणा याद्दल ते दक्ष असत. सोबत काम करणाऱ्या कार्यकर्त्यांनी कसे असले पाहिजे, वागले पाहिजे याची शिस्तही त्यांनी लावून दिली होती. दुसरे वर्तुळ होते ज्यांच्यासाठी हे काम करावयाचे त्या लोकांचे. त्यांच्याबरोबर उठता–बसताना, बोलताना बाबूराजे अतिशय सौम्य व हसरे होत. काटेकोरपणा गळून जाऊन मोकळे होत. वरवर विरोधी वाटणारी ही वर्तुळे आतून संवादी आणि परस्परांना व्यापणारी होती.

बाबुराजे ज्या लोकांत वावरत होते त्यातही अनेक वर्तुळे होती. त्यांच्या भोवती किंवा त्यांच्या समवेत जे लोक, कार्यकर्ते सतत असत त्यात, भोसले गुरूजी, माधवराव दळवी, मधुकर पांगे, बाळाराम चव्हाण, यशवंत चव्हाण, राजाराम जावळेकर, आनंदा अडिसरे, निवृत्ती चौगुले, पी.आर. चौगुले, पी.एम्. चौगुले, मारूती कांबळे, आर.डी. पाटील, शंकर नाना मोहिते, तात्यासाहेब शिंदे, वाय.पी. पाटील, बापू वांगीकर, दादू भागोजी कांबळे, शामू नाना मोहिते ही तळसंद्यातील मंडळी तर, आबा कापसे, दत्तू कदम, किसन पोवार ही आपटीतील मंडळी असत. त्यांच्या भोवतीचे आणखी एक वर्तुळ कार्यकर्त्यांचे असे आणि त्या भोवतीचे वर्तुळ छात्रालयातील मुलांचे! ही सर्व वर्तुळे आत्मीयतेने परस्परांना बांधली गेली होती. त्यामुळेच सामाजिक कामे जोमाने होत गेली. या वर्तुळांच्या पलीकडे आणखी दोन वर्तुळे होती. एक वर्तुळ होते, ज्यांच्याशी बाबुराजे विचारविनिमय करीत, सामाजिक कामासंबंधीत बोलत असत किंवा कोणी एखादे शिबिर आयोजित केले तर तेथे जाऊन एखादी जबाबदारी स्वीकारीत असत किंवा कोणाला आपल्याकडे बोलवीत असत, अशा लोकांचे. एस्.एम्. जोशी, ना.ग. गोरे, ग.प्र. प्रधान, मायदेव अशी मंडळी या वर्तुळात होती. गोपुरी येथील आचार्य आण्णासाहेब सहस्त्रबुद्धे, आचार्य जावडेकर, अप्पासाहेब पटवर्धन यांच्याशी त्यांचे जवळचे संबंध होते. भूदान,

सर्वोदय या विनोबांच्या आंदोलनाशी ते समरस झाले होते. विनोबाजींचा भूदान यज्ञातील कोल्हापूर दौरा होता तेव्हा, बोरापाडळ्यातून पन्हाळ्यापर्यंत विनोबाजी चालत गेले; तेव्हा बाबुराजे त्यांच्या बरोबर होते. पन्हाळ्यासही चांगली व्यवस्था व्हावी, यासाठी सतर्क होते. सर्वोदयामुळे मामा क्षीरसागर, बाबा रेडीकर यांच्याशीही त्यांचा स्नेह जुळला होता. या वर्तुळाहून वेगळे असे आणखी एक वर्तुळ होते ते अनेक योजनांची अंमलबजावणी करणाऱ्या तत्कालीन शासकीय अधिकाऱ्यांचे आणि खादी-ग्रामोद्योग, पशुपालनकेंद्र, आंतरभारती अशा संस्थांचे आणि या सर्व वर्तुळांना पोटात घेणारे मोठे वर्तुळ होते ते, ते ज्यांना बांधील होते, ज्यांच्यासाठी काम करीत होते त्यांचे. अशा अनेक परस्पर व्यावर्तक वर्तुळांनी बनलेल्या आणि भरगच्च झालेल्या त्यांच्या आयुष्यक्रमात व्यक्तिगत लाभ-हानी, लोभ यांना जागा नव्हती.

बाबुराजांची कार्यपद्धती आणि भूमिका यांच्याशी सुसंगत असेच त्यांचे शेतीसंशोधन होते आणि सुसंगत अशी वाङ्मयाभिरूची होती. शेती हा त्यांचा व्यवसाय होता पण त्याहीपेक्षा तो त्यांच्या संशोधनाचा विषय होता. प्रत्येक राज्यातील निवडक शेतकऱ्यांना पंजाब, दिल्ली, हरियाना, मध्यप्रदेश, उत्तरप्रदेश या ठिकाणाची शेती दाखविण्याची केंद्रसरकारची स्कीम होती. त्या अंतर्गत ते एकदा सहल करून आले होते. त्यावेळी प्रत्येक ठिकाणची माहिती, टिपणे घेऊन, त्याचा चिकित्सक विचार करून सरकारला एक प्रबंध पाठविला होता. विशेष म्हणजे, त्यांनी एकट्यानीच असा प्रबंध पाठविला होता. दैनंदिन शेतीची कामे करताना अथवा इतरांच्या शेतांना भेटी देताना ते टिपणे ठेवीत. निरीक्षणवहीत त्यावरचा आपला अभिप्राय नोंदवीत. स्वतःच शोधून काढलेले हिरवळीचे खत (ताग, ढेंचा, ग्लीसीडिआ वगैरे टाकून वर मशागत करणे) ते वापरीत असत. त्या काळी बोलबाला झालेल्या जपानी भातशेतीबद्दल त्यांनी विविध प्रयोग केले होते, या प्रयोगांची व परिणामांची माहिती देणारे एक पुस्तकही लिहिले होते. दुर्देवाने ते उपलब्ध नाही.

त्यांना वाचनाची आवड होती. विविध प्रकारची पुस्तके

त्यांच्या वाचनात असत. गीता वाचन हा त्यांच्या दैनंदिन परिपाठाचा भाग होता. ज्ञानेश्वरी, विनोबांची गीताई, गीता प्रवचने, तुकारामाचा गाथा ही पुस्तके त्यांच्या बैठकीच्या जागी नित्य हाताशी असत. साने गुरूजींचे वाङमय त्यांना आवडे. छात्रालयातील मुलांना गोष्टी सांगण्यासाठी ते त्याचा वापर करीत असत. रवींद्रनाथांची गोरा, बंकिमचंद्रांची आनंदमठ, शरदचंद्र चटर्जींच्या सव्यसाची, शेषप्रश्न इ. कादंबऱ्या, प्रेमचंदांची गोदान या त्यांच्या आवडत्या साहित्यकृती होत्या. मॅक्झिम गॉर्कीची मदर आणि थॉमस हार्डीची टेस यांचा उल्लेख हमखास त्यांच्या बोलण्यात असे. वसंत बापट, मायदेव यांच्या कविता त्यांना आवडत असत. भा.रा. तांब्यांची 'घनतमी शुक्र बघ राज्य करी' ही कविता त्यांना फार प्रिय होती. साहित्याबद्दलची त्यांची भूमिका दर्शविणारी एक आठवण बोलकी आहे. त्यांच्या मुलीने-नंदाने इयत्ता आठवीत असताना एक व्यक्तिचित्र रेखाटले. ते होते त्यांच्या घरी दररोज शिळे-पाके अन्न भिक्षा म्हणून मागणाऱ्या सावणी नावाच्या बाईचे. ही बाई एकटीच मारूतीच्या देवळात रहात असे आणि भिक्षा मागून पोट भरत असे. नंदाचे लेखन तिच्या वयाच्या मानाने चांगले झाले होते त्यामुळे शिक्षकांनी तिचे कौतुक केले, शाळेच्या भित्तिपत्रकात ते लावले आणि दै. पुढारीच्या लहान मुलांच्या पुरवणीत छापून आणण्याचे आश्वासनही दिले. फुशारून गेलेल्या नंदाने घरी आल्या आल्या वडिलांना ही हकीकत सांगितली व लिहिलेले वाचावयास दिले. त्यांनी ते काळजीपूर्वक वाचले आणि म्हणाले, 'तुझी लिहिण्याची पद्धत चांगली आहे पण विषयाची निवड चुकली. भीक मागणाऱ्या आळशी लोकांवर लिहिण्यापेक्षा नेहमी कामात असणाऱ्या आबाबद्दल, शांताबाईबद्दल लिहायला हवे होतेस. घरात काम करणाऱ्या सुंदराबाईवर लिहिले असतेस तरी चालले असते'. नंदाचा विरस झाला हे पाहून त्यांनी विषय बदलला आणि दुसरीच एक गोष्ट सांगायला सुरूवात केली. बाबुराजांचा साहित्याकडे पहाण्याचा दृष्टिकोण या आठवणीत प्रतिबिंबित झाला आहे.

वाङ्‌मयीन अभिरूची प्रमाणे त्यांची नैतिक भूमिकाही त्यांच्या

एकंदर कार्यपद्धतीशी, जीवनशैलीशी सुसंगत होती. सामाजिक आचार-विचारांच्या बाबतीत स्वातंत्र्य, समता, न्याय व अहिंसा या मूल्यांचा ते पुरस्कार करीत. कार्यकर्त्यांच्या मनावर ही मूल्ये ठसविण्याचा प्रयत्न करीत. विधायक कामावर त्यांचा भर होता. नियमितपणा, प्रामाणिकपणा, कर्तव्यतत्परता या बद्दल ते आग्रही होते. स्वतःच्या अंगी हे गुण त्यांनी जोपासले होते. उदाहरण द्यायचे झाले तर, एक अनुभव सांगता येईल. प्रौढ साक्षरता मोहिम जोसात असल्याचा तो काळ होता. पण एकंदरीने काम कमी आणि फुगवटा जास्त अशी स्थिती होती. अशा काळातही बाबूराजे अगदी प्रामाणिकपणे ते काम करीत असत. वर्गामध्ये अक्षर ओळख, अंक ओळख यांच्या बरोबरीने बी-बियाणे, खते, कीटकनाशके, शेणखत, आरोग्य स्वच्छता इ. विषयांचेही शिक्षण देत असत. आपटीतल्या प्रौढ वर्गाला एकदा त्या वेळचे शिक्षणाधिकारी श्री. दाणी यांनी भेट दिली. वर्गातील रामचंद्र गणपती भोसले याची तयारी पाहून त्याला ७ वीच्या परीक्षेला बसण्याची परवानगी दिली. त्यात तो पास झाला आणि पुढे त्याला नोकरीही मिळाली. विद्यार्थ्यांचा कल, कुवत पाहून त्याची तयारी करून घेण्याचे बाबुराजांचे कौशल्य असे उपयोगी पडले. कामाच्या बाबतीत दाखवेगिरीऐवजी प्रत्यक्ष कामाला महत्त्व देण्याची त्यांची नीती नेहमीच प्रभावी ठरत असे. श्री. रंगा कुंभार व श्री. चंदू भोसले यांची उदाहरणे यासंदर्भात बोलकी आहेत. या दोघांनाही शिक्षणात रूची नव्हती. इच्छाशक्ती नव्हती. त्यामुळे ते परीक्षेत यशस्वी होऊ शकत नसत. पण त्यांच्याकडून बाबुराजांनी अभ्यास करून घेतला. चंदू भोसले सातवी पास झाले, त्यांना कारखान्यात मुकादमाची नोकरी मिळाली. रंगा कुंभार मॅट्रिक झाले. त्यामुळे त्यांना ड्रॉइंगच्या परीक्षांना बसता आले. पुढे ते उत्तम ड्रॉइंग शिक्षक म्हणून नावाजले गेले.

धार्मिक आचार-विचाराच्या बाबतीतही त्यांचे विचार स्पष्ट होते. ते ईश्वर मानत असत. मंदिरात जात असत. गीता, गीताई, संत वाङ्मय यांचे पठण करीत असत. धार्मिक अस्मितेचा प्रभाव त्यांच्यावर नव्हता. विनोबांची सर्वधर्मसमभावाची भूमिका त्यांनी अनुसरली होती.

कर्मकांडात त्यांना रस नव्हता. सामाजिक समतेचा पुरस्कार करणाऱ्या, त्या दिशेने पाऊल टाकणाऱ्या बाबुराजांना आपल्या घरातील सोवळे-ओवळे, शुद्ध-अशुद्धतेच्या कल्पना, कर्मठपणा यांच्याशी आपल्या विचारांचा मेळ घालताना कसरत करावी लागली असणार. आयुष्यातील काही जागा संदिग्ध असतात, हेच खरे.

सामाजिक बदल घडवून आणण्यासाठी, खेड्यातील लहान शेतकरी आणि वंचितांना शासकीय योजनांची फळे मिळून त्यांना चार सुखाचे क्षण लाभावे यासाठी, आपली बुद्धी आणि शरीर झिजविणारे बाबुराजे अगदी आकस्मिकपणे दि. १२ मार्च १९७० रोजी हृदयाविकाराच्या धक्क्याने कालवश झाले. त्यांना हृदयविकार का झाला असावा याबद्दल अनेक तर्क केले गेले. कोणाला वाटले, अतिशय शारीरिक कष्टामुळे असे झाले, कोणाला वाटले नवीन गोष्टी, सुधारणा लोकांच्या गळी उतरविण्याच्या प्रयत्नांचा ताण सोसवला नाही म्हणून असे झाले. समाचाराला आलेल्या लोकांना मामा म्हणाले, 'बाबूराजा म्हणजे शिस्तीची बंदूक होती. या बंदुकीच्या नळीत स्वयंशिस्तीची दारू इतकी ठेचून भरली होती की, दारूचा बार उडण्याऐवजी बंदुकीची नळीच फुटली' कार्यशक्ती त्यांनी टोकापर्यंत ताणली. रात्रंदिवस काम केले आणि जे व्हायचे ते झाले. तर्कांचे हे घोडे कितीही धावले तरी वस्तुस्थिती शिल्लक राहाते ती त्यांच्या आकस्मिक निधनाची. या निधनाने एक व्रतस्थ गांधीवादी, प्रामाणिक, कार्यतत्पर कार्यकर्ता समाजाने गमावला. कोणत्याही वळणावर जाऊन वाटचाल पाहिली तरी आदराने मस्तक झुकेल आणि सामाजिक कार्यासाठी प्रेरणा देईल अशा एका ध्यास-प्रवासाची समाप्ती झाली. हा पूर्ण विराम नाही, नसावा. दुसऱ्या एखाद्या खांद्यावर हा विणा जावा आणि प्रवास पुढे जात रहावा असे स्वप्न पहायला काय हरकत आहे?

---

**डॉ. भाऊसाहेब गुळवणी**
व्हा. चेअरमन श्री. वारणा दूध संघ लि.

# मुलाखत

डॉ. भाऊसाहेब गुळवणी यांनी बाबुराजांचे सर्वच जीवन अगदी जवळून पाहिले आहे. अनेक घटना प्रसंगात ते एकत्र राहिले – वावरले आहेत. अनेक घटनांचे ते साक्षीदार आहेत. त्यांचे व बाबुराजांचे नाते अनेकपदरी होते. बाबुराजे हे त्यांचे आतेभाऊ. पुढे त्यांच्या बहिणीचा म्हणजे सखुताईचा (नंतर सुलभा) बाबुराजांशी विवाह झाला आणि या नात्याला एक वेगळाच पदर लाभला. या शिवाय अलजिब्रा शिकविणारा मोठा भाऊ, जिव्हाळ्याच्या गोष्टी सांगण्याचे विश्वासार्ह ठिकाण असेही पदर या नात्याला असल्यामुळे ते गहिरे झाले. बाबुराजांबद्दलचा जिव्हाळा आणि त्यांनी केलेल्या सामाजिक कार्याबद्दलचा आदरभाव आणि अभिमान यांचे मिश्रण डॉ. भाऊसाहेब गुळवणी यांच्या मुलाखतीत असल्यामुळे ती माहितीपूर्ण आणि भावपूर्ण झाली आहे. त्यांनी अतिशय सविस्तर मुलाखत दिली. त्यातील काही भाग आवश्यकतेनुसार अन्यत्र समाविष्ट केला आहे. आणि काही संपादित अंशभाग इथे समाविष्ट केला आहे.

प्रश्न : आपण बाबुराजांच्या बालपणापासून ते मृत्यूपर्यंतचे जीवन अगदी जवळून पाहिले आहे. त्यांच्या आयुष्याचे एकंदर वर्णन कसे करता येईल?

त्यांचे वर्णन कार्यमग्न सामाजिक कार्यकर्ता असे करता येईल. १९६० ते ७० या दशकात तर ते पहाटे पाच वाजल्यापासून रात्री अकरा-साडे अकरापर्यंत अखंड कामात असत. त्यांच्या डोक्यात फक्त शेती,

शेतीतील प्रयोग आणि सामाजिक कार्य एवढेच विचार असत. स्वतःच्या गरजा कमीत कमी करून, आर्थिक आणि सामाजिक दृष्ट्या निम्न किंवा उपेक्षित असलेल्या लोकांसाठी काम करण्याचा त्यांना ध्यास होता. थंडी, ऊन, वारा, पाऊस यासारखे निसर्गातले बदल असोत किंवा कुटुंबातील सण-समारंभ असोत त्यांनी त्यासाठी आपले काम थांबविले नाही. तुकाराम महाराजांच्या अभंगातील उरलो उपकारा पुरता ही जाणीव त्यांनी अंगी बाणविली होती. संतांची वचने आयुष्यात उतरविणाऱ्या अशा व्यक्ती फार कमी प्रमाणात पहायला मिळतात.

प्रश्न : अशा प्रकारे कामात स्वतःला बुडवून टाकणाऱ्या व्यक्तींचे कौटुंबिक संबंध जेवढ्यास तेवढे असतात, त्यात त्यांना फारसा रस नसतो असे म्हणतात. बाबुराजांचे कौटुंबिक संबंध कसे होते ?

अं ऽ, नाही. त्यांना जेवढ्यास तेवढे रहाणे माहितच नव्हते. आमचं एकत्र कुटुंब होतं किंवा असं म्हणता येईल की, अनेक कुटुंबे एकत्र मिळून आमचं एक बृहत् कुटुंब झालं होतं. पण त्या सगळ्यांशी ते जवळिकीने बोलत, वागत असत. फटकून वागणे, तोडून बोलणे हे त्यांच्या स्वभावात नव्हते. उलट प्रेम करणे हा त्यांचा स्वभाव धर्म होता. आम्हा भावंडांवर तर ते जिवापाड प्रेम करीत असत. मी स्वतः कमाताई, सुधाताई, प्रेमा, प्रकाश, आम्हा सगळ्यांवर त्यांनी फार प्रेम केलं. आम्हाला काय हवं नको ते पाहिलं. अडी-अडचणी समजून घेतल्या. आमच्या मनातल्या गोष्टी सांगण्याचं ते एक विश्वासाचं ठिकाण होतं. दिवाळीच्या दिवसात आम्ही, लहान-मोठे सगळे एकत्र बसून पटाने (सोंगटया) खेळत असू. त्यातही ते उत्साहाने सहभागी असत. हं ऽ पण, सामाजिक कार्याला त्यांच्या लेखी अधिक महत्त्व होते, हे ही तितकेच खरे.

प्रश्न - त्यांनी जे सामाजिक कार्य केलं ते, खेड्यातील लोकांमध्ये, अशिक्षितांमध्ये, वंचितांमध्ये राहून आणि त्यांच्यासाठी केलं. असं काम करताना त्यांच्यापुढे कोणती आव्हाने होती? कोणत्या अडचणी होत्या ? त्यातून कसा मार्ग काढला ?

शेती विषयाची पदवी घेऊन ते परत आले आणि त्यांनी शेती

कामाला आणि सामाजिक कार्याला सुरूवात केली. आपण नोकरी करायची नाही आणि मामांनी सुरू केलेल्या सामाजिक कार्यात सहभागी व्हायचे असे त्यांनी आधीच ठरविले होते. स्वातंत्र्य नुकतेच मिळाले होते. सरकारी धोरणे आणि सोयी-सुविधा लोकांपर्यंत पोहोचविणे हे एक आव्हान होते. तिथूनच त्यांनी कामाला सुरूवात केली. बी.डी.ओ.च्या बरोबर ते आसपासच्या गावांमध्ये जात. लोकांना योजना समजावून सांगत. नवी बियाणे, वेगवेगळी खते कशी, किती प्रमाणात आणि केव्हा वापरावी, पाणी किती द्यावे अशी सगळी माहिती देत असत. पण, खेड्यातील अशिक्षित लोक सहसा आपली जुनी पद्धत, प्रथा सोडायला तयार नसत. त्यांना समजावून सांगणे, त्यांचे मन वळविणे हे फार मोठे आव्हान होते. या शिवाय ते प्रौढ साक्षरता वर्ग चालवीत असत, जातीजातींमध्ये सलोखा निर्माण व्हावा यासाठी प्रयत्न करीत. आता, ही सगळी आव्हानेच होती की! होती असं म्हणणंही चुकीचं आहे. आज सुद्धा खेड्यामध्ये सामाजिक कार्य करणाऱ्यांना या आव्हानांना तोंड द्यावं लागतं. मग ४०-५० वर्षांपूर्वी ते किती जिकीरीचं असेल याची कल्पना करा.

हे सगळं करीत असताना अडचणी येणं, विरोध होणं हेही ओघानंच आलं. प्रौढ साक्षरतेचा वर्ग घ्यायला ते जात असत. बरोबर वीस-पंचवीस लोक. वर्ग आबा कापसे यांच्या जुन्या घरात भरे. तिकडे जात असताना एक-दोघे हितशत्रू त्यांच्यातच सामील होत आणि वाटेत कोणाचे लक्ष नाही असे पाहून, कोणाच्या तरी घरावर दगड मारीत. आवाज आला की चलबिचल होई. सगळे लोक त्या घराकडे जात. दगड कोणी मारले याचा व्यर्थ शोध घेतला जाई आणि यातच तासभर तरी निघून जाई. त्यानंतर लोक कंटाळत त्यांना दुसरे दिवशी शेतावर जायचे असे. कसा बसा थोडा वेळ वर्ग चाले.

दुसरा एक प्रकार म्हणजे, दादांच्या म्हणजे बाबुराजांच्या मागे नेहमीच मुलांचा, तरूणांचा आणि प्रौढ माणसांचा घोळका असे. लोक त्यांच्या भोवती असत. लोकांच्या मनात त्यांच्या बद्दल आदरभाव होता हे गावातील तथाकथित पुढाऱ्यांना आवडत नव्हते. आपल्याकडे लोक

येत नाहीत, आपले ऐकत नाहीत याची त्यांना खंत वाटे मग ते जिथे शक्य असेल तिथे प्रत्यक्ष अथवा अप्रत्यक्षपणे विरोध करीत. लोकांच्या मनात किंतू निर्माण करीत. पण हळूहळू हे बदलले. विशेषतः सर्वोदय च्या लोकांनी सायंप्रार्थना सुरू केली त्यापासून हे चित्र बदलले. दादा रोज सायंप्रार्थना घेत. सुमारे शंभर लोक दररोज या प्रार्थनेला हजर असत. शुक्रवारची प्रार्थना वैशिष्ट्यपूर्ण असे. त्या दिवशी, एका व्यक्तीने आपले विचार व्यक्त करायचे अशी रीत होती. प्रार्थनेनंतर सहभोजन असे.

प्रश्न – त्यांच्या आयुष्यातील बहुसंख्य काळ तुम्ही त्यांच्याबरोबर होता, त्यामुळे त्यांच्या संबंधीच्या अनेक आठवणी तुमच्या मनात असतील. त्यापैकी एक दोन सांगाल का? म्हणजे एखादी हृद्य किंवा एखादी मजेशीर, अधिक आठवणारी..

हो. आठवणी तर खूपच आहेत. अलिकडे तर सारख्याच मनात घोळत असतात. तळसंद्यात आता तरूण मुलांनी बाबुराजे येडूरकर ग्रामस्वच्छता व पर्यावरण संवर्धन अभियान सुरू केले आहे. दर शुक्रवारी सायंप्रार्थना असते. यामुळे जुने दिवस पुन्हा आठवताहेत.

एक अगदी मनात रूतून बसलेली आठवण आहे. त्या काळात आम्ही म्हणजे मी, मामा, दादा असे सगळे संध्याकाळी देवाकडे म्हणजे यादवेंद्रस्वामींच्या समाधीकडे जात असू. एके दिवशी, तिथून परत येत असताना दादा म्हणाले, 'अरे, लग्नातले तुझे ते रेशमी शर्ट तू घालत का नाहीस? छान आहेत ते. रूबाबदार दिसतोस तू त्यात, घाल ना' मी त्यांच्याकडे पाहिले आणि म्हटले, 'तुम्ही हे असे कपडे घालता जीर्ण-शीर्ण कधी कधी फाटके सुद्धा, मग मी कसे रेशमी कपडे घालू?' त्यावर ते काहीच बोलले नाहीत. विषय तिथेच थांबला. पण अजूनही माझ्या मनात ते रेंगाळते आहे. वाटतं की, त्यांना असं वाटलंच कसं की, ते असे कपडे घालत असताना मी रेशमी कपडे घालीन म्हणून. दुसराही एक विचार येतो मनात की, हा काय अंतर्विरोध त्यांच्या ठिकाणी होता? एका बाजूला स्वतःच्या कपड्यांबाबत ते अगदी बेफिकिर, निरिच्छ असत तर दुसऱ्या बाजूला इतरांनी व्यवस्थित असावे, नीट नेटके रहावे

असा त्यांचा आग्रह असे, अगदी, शेतावर काम करण्यास येणाऱ्यांनाही ते सांगत, ' तुम्ही शेतातल्या कामाच्या वेळचे कपडे वेगळे घेऊन या. इथे आल्यावर ते घाला. काम संपल्यावर पुन्हा नेहमीचे कपडे घालून जा.' त्यांचे कपडे टांगून ठेवण्यासाठीची सोयही त्यांनी करून ठेवली होती. हे कोडं काही सुटलं नाही.

आणखी एक वरवर विसंगत वाटणारी गोष्ट म्हणजे, इतर सर्व बाबतीत काटेकोर हिशेब ठेवणारे दादा शेतावर कामाला येणाऱ्यांबाबत काहीसे साळढाळ रहात. कामावर येणाऱ्यात काही लोक आळशी, टंगळमंगळ करणारे, नुसतीच बडबड करणारे किंवा आजारी असत. त्यांना ते नको म्हणत नसत. काही ना काही काम देत. चांगले व कसून काम करणारे कामगार अशा लोकांबद्दल तक्रार करीत पण; त्यांना ते समजावत व सांभाळून घ्यायला सांगत. यामुळे खर्च वाढे पण, त्याकडे ते दुर्लक्ष करीत. एकीकडे पै न पैचा हिशेबीपणा आणि दुसरीकडे हे अव्यवहारीपण! सर्वांना सामावून घेण्याची त्यांची वृत्ती यातून दिसते.

प्रश्न : आणखी एंखादी आठवण ?

दुसरी आठवण पानशेत धरण फुटलं त्या वेळची आहे. दिवस पावसाळ्याचे. धो धो पाऊस. अशा पावसात दादा आपटीत प्रौढ साक्षरतावर्ग घ्यायला गेले होते. बरोबर यशवंत गुरूजी होते. वर्ग संपवून साधारणतः रात्री साडे अकराच्या सुमारास ते घरी परत येत होते. पाऊस अखंड चालू होता. त्यातच हातातील कंदील विझला. मंगळवार पेठेतून पुढे वाट काढत असताना अचानक, शंभर-दीडशे फुटांचं अंतर असेल, तट कोसळला आणि सोमवार तळ्यातल्या पाण्याचा भलामोठा लोट-लोंढा खाली कोसळला. पाण्याचा जोर इतका मोठा होता की त्यात आमचे देवाकडचे शेत वाहून गेले. खरोखर, एका मोठ्या अरिष्टात आणि दादांच्यात म्हणा किंवा आमच्या सगळ्यांच्यातच म्हणा, केवळ ५-७ मिनिटांचे आणि १००-१५० फुटांचे अंतर होते. आजही आठवले तरी दचकायला होते. अशा कितीतरी आठवणी. आठवेल तेवढे थोडे.

प्रश्न - तुम्ही अगदी सहज आणि चटकन भूतकाळात जाता. आठवण सांगता, तेव्हा वाटतं, हे अगदी आत्ताच तर घडलंय. आणखी थोडं

भूतकाळात डोकावून सांगा की दादांचा आणि तुमच्या बहिणीचा संसार कसा झाला?

(हसून) मोठा पेचदार प्रश्न आहे पण, सांगतो. परिणामावरून यशापयश मोजायचे ठरवले तर संसार चांगला झाला. त्यांना दोन मुले आणि दोन मुली. चि. मोहन, नंदा, नलिनी आणि किरण. चि. नलिनी हयात नाही. इतर तीन्ही भावंडे चांगल्या प्रकारे शिक्षण घेऊन व्यवस्थित संसार करीत आहेत. नातवंडेही उच्चशिक्षित आहेत आणि उत्तम प्रकारे नोकरी-व्यवसाय करीत आहेत. पणतवंडेही आहेत. या अर्थाने संसार छान झाला. पण भूतकाळात शिरले तर मात्र वाटते, संसार खडतर झाला. त्यांनी स्वतःच्या गरजा अगदी कमी करून स्वतःला कफल्लक बिंदूवर उभे केले होते. सामाजिक कार्याच्या व्यापामुळे पुष्कळ काळ ते बाहेरच असत. घरात कमीच. पहाटे पासून ते रात्री ११.३० - १२.०० पर्यंत फक्त काम. हे खडतर व्रतच होते. पण ही वाट त्यांनी स्वतःच निवडली होती. सुबत्ता आणि ऐषाराम यापासून जाणूनबुजून दूर रहाणाऱ्यांचा संसार जसा व्हायचा, तसा त्यांचा झाला.

प्रश्न - आता शेवटचा प्रश्न. त्यांचे जीवन आठवताना तुम्हाला आत्ता काय वाटते?

मला थोडीशी खंत वाटते. ४७ वर्षांचे असताना त्यांना मृत्यू आला. आणखी आयुष्य मिळाले असते तर कदाचित त्यांनी न मागताही अनेक मान-सन्मान, पुरस्कार मिळाले असते. शेती-संशोधनातही त्यांना काही नवे करता आले असते. मुला-नातवंडांची प्रगती पाहून ते सुखावले असते. हे चांगले दिवस पहायला ते हवे होते. अर्थात, जे घडायचे ते घडून गेले आहे. जर-तर ला काही अर्थ नाही. पण मनात येते एवढेच. एक मात्र खरे, की त्यांच्या आठवणी आम्हा कुटुंबियांप्रमाणेच तळसंद्याच्या ग्रामस्थांच्या मनातही ताज्या आहेत. आजही तळसंद्यात दर शुक्रवारी सायंप्रार्थना होते. आजही तिथले युवक त्यांच्या कार्यापासून प्रेरणा घेऊन त्यांच्या नावाने अभियान चालवतात. भाग्ययोग, भाग्ययोग म्हणतात, तो यापेक्षा काय वेगळा असतो?

---

# आठवणींचा सुखद गारवा

आपल्या ऋजू स्वभावाने, प्रेमळ वागणुकीने, कामामध्ये सर्वांना सामावून घेण्याच्या पद्धतीने आणि यत्किंचितही दुजाभाव न ठेवता मदतीचा हात पुढे करण्याच्या सवयीने बाबूराजांनी आपल्या भोवती वावरणाऱ्या लोकांच्या मनात आपले असे एक खास स्थान निर्माण केले. त्यांनी दिलेलेली शिकवण, केलेले मार्गदर्शन कित्येकांच्या जीवनाला नवे वळण लावणारे ठरले. या सगळ्या लोकांच्या मनात त्यांच्या आठवणी अजून ताज्या आहेत. ते जुने दिवस आठवताना हे लोक रंगून जातात. एका अर्थाने भूतकाळ पुन्हा जगतात आणि काही वेळानंतर वर्तमानात येऊन बाबुराजांच्या निधनामुळे हळवे बनतात. हे नक्की की बाबुराजांच्या सहवासातील आठवणींचा सुखद गारवा त्यांना स्मरणरंजनाचा अनुभव देतो आणि कृतज्ञतेची भावना जागी करतो.

अशा अनेक आठवणींपैकी काही निवडक आठवणी आपण इथे समाविष्ट करीत आहोत. आठवणींचे संपादन करीत असताना, पुनरावृत्ती टाळण्याच्या किंवा कमी करण्याच्या हेतूने मूळ मजकुरातील काही भागाचा संक्षेप केला आहे. विवेचनाच्या सोयीसाठी अन्यत्र त्याचा वापर केला आहे.

आमच्याकडे आठवणी सुपूर्त केल्या गेल्या ते साल होते सन २०१०. त्यानंतर आता जवळ जवळ सात साडे सात वर्षे उलटून गेली आहेत. या काळात आठवणी सांगणाऱ्या काहींचे दुःखद निधन झाले आहे. 'मरे एक त्याचा दुजा शोक वाहे। अकस्मात तोही पुढे जात आहे' या रामदासांच्या उक्तीप्रमाणे तेही सृष्टीच्या रहाटगाडग्यात फिरत, आता

अनंतात विलीन झाले आहेत. आज ते आपल्यात नाहीत या विचाराने मन हळवे होते आणि एका बाजूला कालाय तस्मै नमः असे म्हणत असतानाच आठवणींची उबदार गोधडी पांघरल्यावर जुने आणि तरीही अनोखे विश्व आपल्या भोवती निर्माण होते. सुखद आणि सुरक्षितही!

---

## १ वडीलधारी प्रेमळ मूर्ती

दादांची आठवण येताच प्रथम डोळ्यासमोर येते ती त्यांची प्रेमळ, हसरी मूर्ती; मायेचा, भावनेचा ओलावा असलेले शब्द आणि शांत स्वभाव. त्यांचा विषय निघाला की एक अनुभव मला हट्कून आठवतो.– माझं लग्न झालं तेव्हा मी मॅट्रिक झाले होते आणि पी.डी.चा अभ्यास करीत होते. सासरी येताना पुस्तकं, शाळेत बक्षिसं मिळालेले पेले असं सगळं बरोबर घेऊनच आले होते मी. हे सांगायचं कारण एवढंच की, त्या वेळी अजून मी शिकण्याचा, अभ्यासाचाच विचार करीत होते. संसार करणं, घर सांभाळणं म्हणजे काय याची कल्पना असण्याएवढं माझं वय नव्हतं. १९६१ मध्ये अक्षयतृतीयेच्या मुहुर्तावर मी घरात पहिलं पाऊल टाकलं तेव्हा घर माणसांनी अक्षरशः गजबजलेलं होतं. तीन कुटुंबांनी बनलेलं मोठं कुटुंब आणि जेवढी कुटुंबातील माणसं तेवढीच इतर माणसेही. अगदी अनोळखी असलेली इतकी माणसं बघून मी घाबरून गेले. आई–वडिलांचं परिचित जग सोडून आता या अनोळखी माणसांत रहावे लागणार या विचाराने इतकी भीती वाटली की त्यात नवे आयुष्य सुरू होणार म्हणून मनात सूरू झालेली हूरहूर कुठल्याकुठे बुडून गेली. पाण्यानं डबडबलेले डोळे घेऊनच मी माडीवर गेले पण; तिथे गेल्यावर दादांनी मायेने हाक मारली आणि मला धीर दिला.या इतक्या अनोळखी गर्दीतही आपलं कुणीतरी आहे, या विचारानं मला दिलासा वाटला. लग्न झाल्यावर सहा महिन्यातच माझे वडील वारले. दुःख झालेच पण; दादांनी वडिलांची उणीव भासू दिली नाही. नेहमी पाठीशी उभे राहिले.

एखादी गोष्ट आवडली की तोंड भरून कौतुक करण्याचा त्यांचा स्वभाव होता. पन्नास–पंचावन्न वर्षांपूर्वीचं एकत्र कुटुंबातील

वातावरण जरा आठवून, कल्पना करून पहा. हसणं दुर्मिळ आणि सासुरवाशिणींच्या कौतुकाचं तर नावच नको. पण दादांची गोष्टच वेगळी. मी एखादा चांगला पदार्थ केला तरी भरपूर कौतुक करीत. एकदा लावणीच्या वेळी मी सर्व बायकांबरोबर शेतात लावण केली तर त्यांनी किती कौतुक करावे! या त्यांच्या स्वभावामुळे, त्यांच्यापुढे मन मोकळं करता येत असे. आपली काळजी घेणारी, अडचणीत मदत करणारी, धीर देणारी वडीलधारी व्यक्ती घरात असल्यामुळे निश्चिंत वाटत असे.

त्यांच्यासारखे वागण्याचा मी सतत प्रयत्न करीत आले. अकाली निधनामुळे ते शरीराने वावरत नसले तरी त्यांची वडीलधारी प्रेमळ मूर्ती माझ्या स्मरणात सतत असते.

सौ. सुनीता गुळवणी

---

## २ पराकोटीचा श्रीमंत झालो

दादा! बाबुराजे उर्फ चिदंबर गोविंद येडूरकर. मी त्यांचा मोठा मुलगा. मला ते मोनोपंत अशी हाक मारीत. आज त्यांना जाऊन ४६–४७ वर्षे होऊन गेलीत पण त्यांचे अस्तित्व आजही पदोपदी जाणवते. मला त्यांचे मोठेपण समजण्याआधीच ते गेले. माझा जन्म १९५२ चा आणि ते १९७० ला गेले. वडील म्हणून त्यांच्या अनंत आठवणी, प्रसंग लक्षात आहेत. पण त्यांचे कर्तृत्व समजण्याचे माझे वय नव्हते. तेवढी समजही नव्हती.

दादांची एक रोजनिशी (१९६२ ची) नंदाकडून वाचायला मिळाली. त्यातून समजलेले दादा अलौकिक आहेत. त्या एका वर्षाच्या रोजनिशीतील नोंदीतून जे दादा समोर येतात ते माझ्या आठवणीतील दादांच्या पेक्षा खूप वेगळे, खूप मोठे आहेत. त्यांचे न दिसलेले पैलू त्यातूनच समोर आले. काळाच्या ओघात त्यांच्या सर्व रोजनिशी गहाळ झाल्या, पण दादा समजायला एकच पुरेशी वाटली.

'वज्रादपि कठोराणि, मृदूनि कुसुमादपि' हे वचन दादांना तंतोतंत लागू होते. आपल्या तत्वनिष्ठा, कर्तव्ये, सामाजिक जाणिवा, वर्तन, चारित्र्य इ. बाबतीत अत्यंत कठोर आणि इतरांच्या बाबतीत

अतिशय कनवाळू असे ते व्यक्तिमत्व होते.

माझ्या लहानपणातील त्यांच्या काही आठवणी अजून ताज्या आहेत.

दादा ही माझी हट्ट करण्याची हक्काची जागा होती. आठवड्यातील ४-५ दिवस ते तळसंद्याला असत आणि २-३ दिवस नेबापूरला. मी सायकल चालवायला शिकल्यानंतर त्यांच्याकडे तळसंद्याहून येताना सायकल आणण्याचा हट्ट धरला. ते तळसंद्यातून छोटी सायकल घेऊन आले. ती उंचीने लहान असल्यामुळे त्यांना पूर्ण अंतर चालत यावे लागले. आणताना वाघबीळ जवळ त्यांचा तोल गेला व ते तोंडावर पडले. दात घुसून तोंडाला लागले. रक्तबंबाळ झाले. ते तसेच चालत आले आणि मला सायकल घराजवळ आणून दिली. मला अंदाज असल्याने मी वाटच बघत होतो. कोणतीही चौकशी न करता मी त्यांचेकडून सायकल घेतली आणि फिरण्यासाठी निघून गेलो. दादा एका शब्दाने काही बोलले नाहीत.

दादा खूप छान गोष्टी सांगायचे. घरी रात्री लहान मुलांची जेवणे लवकर व्हायची त्यानंतर मोठ्या माणसांची पंगत. जेवताना शर्ट काढून बसायची रीत होती. मी दादांचा शर्ट घेऊन उभा असे आणि सतत लवकर आवर लवकर आवर म्हणत पाठी लागत असे. कारण त्यानंतर गोष्ट ऐकायची असायची. (जवळ जवळ १० वी पर्यंत दादांना आम्ही अरे तुरे करत होतो.)

मामा व दादा यांचे भावविश्व मामा-भाचा नात्याच्या पलीकडे होते. दादांना आई वडिलांचा सहवास फारसा मिळाला नाही. मामांना स्वतःचे संसारिक आयुष्य अल्पकाळ होते. त्या काळात जमीन जुमल्याच्या बाबतीत बऱ्याच अडचणी-विवाद असावेत त्यामुळे मामांची आई (आम्ही तिला म्हातारी आई म्हणत असू) मामा व दादा असे तिघांचे अत्यंत अतूट नाते झाले असावे. दादांच्या आयुष्यात मामांचे स्थान friend, philosopher, guide पेक्षा खूपच वरच्या दर्जाचे होते. असावे. निवृत्तीनाथ-ज्ञानेश्वर संबंधासारखे ते काहीतरी असले पाहिजे. दादांना विवाहबंधनात संसारात अडकण्याची इच्छा नव्हती. आयुष्य समाजासाठी खर्ची घालायचे त्यांनी ठरविले होते आणि

दुसरी व्यावहारिक बाब म्हणजे संसारासाठी जे अर्थार्जन करावे लागते ते काहीच नव्हते. पण मामांची समस्या किंवा इच्छा शिरोधार्य मानून विवाह केला. पण त्यानंतर सर्व सांसारिक जबाबदाऱ्या मोठ्या काळजी पूर्वक व समजुतीने पार पाडल्या. माझी आई पण बिचारी साधी सरळ गरीब गाय-तिलाही आई वडिलांची माया फारशी लाभली नाही. पण अत्यंत प्रेमळ व समजूतदार माणसाशी लग्न झाल्यावर तिनेही सगळे खूप सांभाळले. स्त्रीला स्वत:चे घरदार असावे, वेगळा संसार असावा, अंगावर चार जिन्नस असावे, पतीने सणावारी काही प्रेमाने आणावे, या तिच्या सामान्य इच्छा कधी पुऱ्या झाल्या नाहीत, पण एका अलौकिक माणसाच्या आयुष्याचे आपण जोडीदार आहोत या भावनेने आईने देखील टोकाचा त्याग केला. आम्ही भावंडे खूप नशीबवान, भाग्यवान दादा मला म्हणत,' तुझे दोन्ही आजोबा केवढे मोठे, त्यागी, विद्वान अशा कुटुंबात जन्म घेण्यारा भाग्यवान. दादांकडून आम्हाला जमीन-जुमला, पैसा-अडका, दाग-दागिने इ. मिळाले नाही. पूर्वी काही वेळा यांची खंत वाटे. आपले येडूरला घर आहे, जमीन आहे मग आपण इथे का?असा प्रश्न पडे. दादांनी खूप विचारपूर्वक हा निर्णय घेतला असावा. दादांच्या पूर्वीच्या डायऱ्या मिळाल्यावर त्यातून त्याचा कदाचित उलगडा होऊ शकेल.

आणखी एक आठवण.

मामांचे व तात्यासाहेब कोरे यांचे संबंध खूप चांगले होते. पूर्वी वारणा साखर कारखान्याच्या निवडणुका खूप संघर्षपूर्ण होत. अशाच एका निवडणुकीची पूर्वतयारी म्हणून काही काळ आधी तात्यासाहेबांनी आपल्या काही खास लोकांना सभासद करून घ्यायचे ठरविले. त्यावेळी ते मामांना म्हणाले, 'बापूसाहेब तुम्ही बाबुराजांना व त्यांच्या पत्नीला सभासद करावे असे मला वाटते.' मामांनी हा विषय दादांच्या कानावर घातला. सभासद होण्यास दादांनी होकार दिला. पण त्यात एक अडचण अशी आली की, सभासद होण्यासाठी किमान २० गुंठे जमीन नावावर असणे आवश्यक होते. त्यावर मामांनी त्यांची कोडोलीतील जमीन दादा व आईच्या नावावर करावयाचे ठरविले. ही कुणकुण दादांच्या कानावर गेली. दादा कधी नव्हते ते संतापले. रात्री आईला म्हणाले, 'शकू आता

आपण इथून जाऊ. मामा आपल्या नावावर शेती करायला लागला आहे. हे मला मान्य नाही. आपण आता जाऊ' मला नक्की माहिती नाही पण दुसरे दिवशी दादा व आई तळसंद्याला निघून आले असावेत. त्यानंतर काही लोकांनी बरीच समजूत घालून, कदाचित त्यात तात्यासाहेबांचे लहान बंधू नानासाहेबांनी (जे सर्वोदयी विचारांचे होते) आग्रह करून दादांना राजी केले. कोणताही मोह नाही. आयुष्याचे ध्येय निश्चित आहे. लौकिक अर्थाने ज्याला संपन्न आयुष्य जगणे असे म्हटले जाते, त्याचा लवलेशही नाही; असे म्हटले तर भणंग पण खऱ्या अर्थाने अत्यंत अर्थपूर्ण, भावपूर्ण आयुष्य दादा जगले.

खूप लौकर गेले. मला तर आजही पदोपदी त्यांची आठवण असते. त्यांच्या सल्ल्याची गरज असते. दादा स्वतःचे कपडे स्वतः धूत त्यांच्या उन्हात वाळत घातलेल्या कपड्यांचा एक वेगळा सुवास आजही आठवणीत आहे.

एका अलौकिक, उत्तुंग, पराकोटीच्या त्यागी, पण अत्यंत साध्या सरळ पारदर्शी बापाचा मी मुलगा आहे; याचा मला अभिमान आहे.

दादांची डायरी मिळाली आणि मला जगातला अत्यंत मौल्यवान ठेवा गवसला. मी पराकोटीचा श्रीमंत झालो.

मोहन येडूरकर

---

## ३ दादांच्या आठवणी, आठवणीतले दादा

दादा गेले तेव्हा मला आठवं वर्ष सुरू होतं. त्यामुळे माझ्या आठवणीही बालमनाच्या असतील तशाच आणि तेवढ्याच आहेत. पण दादा असताना आणि ते गेल्यानंतर नलूताई, घरातले सर्व लोक, नातेवाईक यांच्याकडून दादांविषयी मी जे ऐकले त्यातून मला थोडे बहुत दादा कळले, आठवणी त्याविषयीही आहेत.

दादा आले की आम्हा मुलांना खूप आनंद व्हायचा. नलूताई, किरण आणि मी असं आमचं त्रिकूट! ताई आम्हाला काही-काही सांगायची. दादा तळसंद्याहून आलेले असायचे. कधी तरी येडूर किंवा

इचलकरंजीहून प्रेमा आत्याकडून आलेले असायचे. एकदा तर काशीला जाऊन आलेले! भात लावणीच्या वेळी आले की आम्हाला त्यांचा जास्त सहवास मिळायचा नाही. पण इतर वेळी ते मुलांचा अभ्यास घ्यायचे. नलूताईला गणित शिकवायचे, किरणला शिकवायचे, त्याबरोबर मीही! पुठ्ठ्यावर कागद चिकटवून त्यावर मोठ्या अक्षरात दादा, नाना, बाबा, आई, बापट, ताई वगैरे लिहून तक्ते तयार केले होते. त्यांच्या अभिनव पद्धतीने शिकवण्याचे साहित्य नंतरही खूप वर्षे होते ते आठवतंय. मला आणि किरणला गणित शिकवताना लाल कर्दळीच्या गुंजा (बिया) आणायला सांगायचे. त्यावरून आम्ही दशक म्हणजे काय ते शिकलो. बेरीज-वजाबाकी शिकलो. त्यामुळे शिकायला मजा यायची. यामुळे इतरांपेक्षा एक वर्ष आधीच माझं शिक्षण सुरू झाले. दादांनीच मला चौथीच्या स्कॉलरशिपच्या परीक्षेला बसवायला सांगितले. वय बसत नसल्याने शिक्षणाधिकाऱ्यांची परवानगी काढायला लागली. परीक्षा दिली तेव्हा ते होते पण रिझल्ट लागला, स्कॉलरशिप मिळाली तेव्हा ते नव्हते. खूप वाईट वाटले.

दादांनी शेतीमध्ये अभिनव प्रयोग केले आहेत हे कळण्याचे ते वय नव्हते. पण भातलावणीच्यावेळी एक वेगळेच वातावरण असायचे. तळसंद्याहूनही लावणीसाठी लोक यायचे. त्यांच्याबरोबर अंध, दृष्टीहीन हरीरामही असायचा. गुडघा गुडघा चिखलात सगळ्यांबरोबर दादाही असायचे. बांधावरून हरीराम मोठ्या आवाजात 'मेघराजा, लवकर लवकर यायचं' असं पावसाला बजावायचा. सगळ्यांसाठी गुळाचा गोड चहा आणि बटर असायचे. जेवणासाठी भाकऱ्यांच्या चळतीच्या चळती असायच्या. मळणीच्यावेळी दादांचा मुक्काम खळयावर असायचा. यावेळी हरीराम आला तर वायुदेवतेला आवाहन करायचा. दिवाळीची सुटी सुरू झाली आणि मळणी सुरू असेल तर आम्ही मुलंही खळ्यावर जायचो. तायचुंग (आयआर) आयरेट अशी नावं कानावर पडायची.

दादा पुण्याच्या ॲग्रिकल्चर कॉलेजमध्ये शिकलेत हे खूप ग्रेट वाटायचं. पुढे मी पुण्याला ॲडमिशनसाठी इंटरव्ह्यू द्यायला बाबांच्या बरोबर आले होते तेव्हा बाबांनी एक मोठी पाटी दाखवली – निंबाळकर

सीड्स ची! म्हणाले, 'बाबूराजे यांच्याकडून बियाणे आणायचे.' ती पाटी पाहिलीकी आणि अजूनही शेतकी महाविद्यालयाची पाटी पाहिली की मला दादांची आठवण येते. दादा पुण्यात शिकायला असताना त्यांना महात्मा गांधी आणि काँग्रेस नेत्यांना जवळून पाहण्याची संधी मिळाली, ते महात्मा गांधी आणि वल्लभभाई पटेल यांच्या भेटीचे साक्षीदार होते, हे मला ताई आणि किरणकडून कळले. वल्लभभाई पटेल आणि गांधीजींचे बोलणे चालले होते आणि मुद्दा पटत नाही अशी नापसंती दाखवण्यासाठी त्यांनी जवळ असलेल्या दादांच्या डोक्यावरची टोपी काढून जमिनीवर जोरात आपटली. म्हणजे दादा या दोन नेत्यांच्या इतके जवळ बसले होते; त्याचं खूप अप्रूप वाटलं. १९६९ हे वर्ष गांधी जन्मशताब्दीचे होते. त्यावेळी शाळेत गांधीजींचे महत्त्व पटवून दिले जायचे, पण आमच्या घरातच दोन मूर्तिमंत गांधीजींचे अनुयायी आहेत याचा अभिमान वाटायचा. घरात दोन चरखे आणि सूतकताईचे साहित्य होते. मामा आणि दादा नेहमी खादीच वापरत असत. घराजवळची नरसोबाची विहिर हरिजनांसाठी खुली होती. वरकड वापरण्याचे पाणी त्या विहिरीतून ते नेत. गावात पिण्याच्या पाण्याच्या इतर विहिरींवर मात्र त्यांना पाणी भरता येत नसे.

दादा म्हटलं की आठवते ती त्यांची हसरी, सावळी, शिडशिडीत, खादीचा शर्ट आणि पायजमा घातलेली मूर्ती. थंडी, पावसाळ्यात काळा स्वेटर, मफलर असायचा. पूर्वीच्या मोठ्या एकत्र कुटुंबात वडीलधाऱ्या लोकांच्या आदरामुळे असलेले धाकाचे वातावरण दादांच्यामुळे सैल झालेले असे. इतकी वर्षे झाली तरी त्यांचे हसणे अजून मनावर ठसलेले आहे. मावशींशी हसून हास्यविनोद करत बोलणारे दादा आठवतात. अजून दादा आठवतात ते संध्याकाळी समाधीकडे बोलतानाचे. दादा, मामा, बाबा आणि (कधी इतरही लोक) असायचे. मामा काही सांगत असताना दादा ऐकत असायचे. समाधीच्या कट्ट्यावर गुडघ्यांना दोन्ही हातांनी गुरफटून मान किंचित मागे कलून बसलेली त्यांची ही मूर्ती माझ्या स्मरणात कोरलेली आहे. समाधीकडे कधीही गेले तरी मला असे बसलेले दादा आठवायचे. आता

ते कट्टेही नाहीत.

समाधीकडून दादांची खोली दिसायची. आणि खोलीतूनही शेत दिसायचे. या खोलीतच दादा आमचा अभ्यास घेत. एकदा ते सकाळी नलूताईचा अभ्यास घेत होते. मी तिथे गेले. त्यांच्याजवळ बसले. तर मला दिसले त्यांचा पायजमा गुडघ्याजवळ कशात तरी अडकून फाटावा तसा फाटला होता थोडासा. एकदम माझ्या डोक्यात काय आले कोणास ठाऊक! मी विचारले, 'दादा तुम्ही आमच्या बाबांसारखी पँट का घालत नाही?' ते मोठ्याने हसायला लागले. माझं काहीतरी चुकलं असं मला जाणवंल. मी ताईकडं बघितल्यावर तर खात्रीच पटली. दादा हसत म्हणाले, 'सांग तुझ्या बाबांना पँट आणून द्यायला. माझ्याकडं तर पँट नाही आहे.'

समाधीकडे जाताना ओढा ओलांडला की ओळीने विहिरी आहेत. शेताला या पाण्याचा उपयोग होईल या हेतूने मधल्या विहिरीतील गाळ काढायचा ठरले. तिथे वीज नव्हती, पंप नव्हता. हातानेच पाणी उपसायचं. पत्र्याच्या बादलीला दोन्ही बाजूंना दोर बांधून दोन्ही बाजूला दोघांनी धरायचं. बादली पाण्यात बुडवायची आणि भरलेले पाणी overflow साठी असणाऱ्या विहिरीच्या मोरीत ओतायचं. असं काम अव्याहतपणे सुरू असायचे. उपसा होऊ लागला तसे झरे जास्तच पाझरू लागले. त्यामुळे हे काम खूप दिवस सुरू होते. दादांनी त्यासाठी खूप कष्ट घेतले. मामा, बाबा ही दुसऱ्या बाजूला बसलेले मी पाहिले आहे. पण दादांनी स्वतः खूपच काम केले. जेव्हा जेव्हा मी त्या विहिरीजवळून गेले तेव्हा तेव्हा मला पाणी उपसणारे दादा आठवले. आत्या गेल्यावर समाधीकडे गेल्यावर खूप वर्षांनी मी त्या विहिरीला भेटून आले.

मला अजूनही एखादा चित्रपट बघावा तसं सगळं आठवतंय. आमच्या कराडच्या मावशीच्या दिराचे लग्न होते म्हणून आम्ही मिरजेला गेलो होतो. बाबांना मंगळवारी तळसंद्याला जायचे असायचे. म्हणून तिथूनच तळसंद्याला गेलो. पण दादा तिथे नव्हते. पन्हाळ्याला गेले होते. मामाही नव्हते. मंगळवारची रात्र तळसंद्यात राहून बुधवारी सकाळी

आम्ही घरी गेलो. गेल्या गेल्याच किरणने सांगितले, दादांना बरं नाही. मी विचारलं, ताप आलाय का? मग आम्ही दोघं दादांकडे निघालो. मी त्यांच्या खोलीकडे निघाले तर त्याने सांगितले, तिकडे नाही खोलीत, कॉटवर झोपलेत. आम्ही आत गेलो. खिडक्या बंद असल्याने तसा अंधार होता, दादा उठलेले होते. खूप आजारी वाटत होते. नेहमीसारखे हसले नाहीत. 'काय होतंय, ताप आलाय' 'हं, जा तुम्ही आता खाली' आम्ही खाली आलो. दादांना असं कधी बघितलं नव्हतं. दुसरे दिवशी सकाळी उठल्यावर ताई आणि किरणनं सांगितलं की दादांना रात्री कोल्हापूरच्या दवाखान्यात नेलंय. आम्ही शाळेला गेलो. दुपारच्या जेवणाच्या सुट्टीत घरी आलो तर कुलकर्णी गुरूजी हातात पंचांग घेऊन बोटांनी काहीतरी मोजत गंभीर चेहरा करून बसले होते. आई विचारत होती, 'बरं वाटेल ना'? आम्ही परत शाळेत गेलो. थोड्या वेळाने मोठमोठ्याने रडण्याचे ओरडण्याचे आवाज ऐकू येऊ लागले. आपटीकडून बायका, पुरूष मोठमोठ्याने रडत आमच्या घराकडे जाताहेत, काही कळेना, आमची शाळाही सोडली. पण आम्हाला देशपांड्याच्या घरी नेऊन सोडले. थोड्या वेळाने कोणी तरी घराकडे नेऊ लागले. काय झालंय समजत नव्हत. 'मुलं घाबरतील पण न्यायला तर पाहिजे ना, लगेच परत आणा'.कोणीतरी म्हटले काही कळत नव्हतं. घरापुढं खूप गर्दी झाली होती. तिथं काहीतरी पांढरं दिसत होत. मुलं घाबरतील हे वाक्य डोक्यात होते. 'नमस्कार करा' कोणीतरी सांगत होतं. घाबरून डोळे बंद करून मी रडायला लागले. काय झालंय काहीच कळलं नाही. हे दादांचं अंतिम दर्शन आहे हेही कळले नाही. परत कुणीतरी देशपांड्यांच्या घरी आणून सोडलं. थोड्या वेळाने घरी गेलो. नंतर ताईनं सांगितलं, काल रात्री जाताना दादा सगळं घर फिरून, सगळ्या खोल्यात जाऊन नमस्कार करून गेले. त्यांना कळलं होतं का? दादा गेले यावर विश्वास बसत नव्हता. ते आहेत अशी स्वप्न पडायची. दादांच असं अकाली अचानक जाणं हा फार मोठा धक्का होता, सगळ्यांनाच. या धक्क्यातून सावरणं कठीण होत.

१० व्या दिवशी कावळा शिवला नाही. नंतर याबाबत आठवण

सांगताना आई म्हणाली, (त्यांचा यावर विश्वास कुठे होता या अर्थी) म्हातारी आईच्य वेळी खूप वेळ झाला तरी कावळे येईनात तेव्हा दादा म्हणाले होते, 'आता मोहरम आहे, तिकडे गेलेत सगळे कावळे, इकडे कशाला येतील'? दादांच्या जाण्यानं घरातलं वातावरण खूप दुःखी, उदास होतं. एकदा मामांच्या खोलीत रडण्याचा आवाज आला. वाटलं कोणीतरी भेटायला आलंय. पण बाबाच मामांच्याजवळ हमसून हमसून रडत होते. हे वातावरण निवळायला खूप दिवस गेले.

नंतर पुढे मावशी राहिल्या होत्या. माझी आजी–आईची आईही राहिली होती. दुपारच्या वेळी जेवणं झाल्यावर सगळ्या बायकांना नंदा आक्का स्वामी कादंबरी वाचून दाखवायची. बायकाही तल्लीन होऊन ऐकायच्या मध्ये मध्ये त्यांचे शेरे आणि मतंही असायची. तेवढाच विरंगुळा. सदाशिवभाऊ, तोतया, पार्वतीबाई असलं काही कानावर पडायचं. मग मला स्वप्न पडलं, दादा आलेत. आम्ही सगळे आश्चर्यचकित. मग त्यांनी सांगितलं. 'मी काशीहून आलोय. इतके दिवस तीर्थयात्रा करत होतो.' जे गेले ते खोटे दादा आणि हे खरे दादा! हे स्वप्न होते. पहाटे पडलेली स्वप्ने खरी होतात. हे पहाटे पडले होते का? काय माहित! मग परत एकदा पहाटे पडावे. परत असेच काहीतरी स्वप्न पडले. मला दादा परत येण्याची आशा वाटायला लागली. मी ताईला तसं सांगितलं. ती म्हणाली,' तसं काही नसतं'. तरीही वाटत होतं, गेलेले दादा खोटे असावेत आणि खरे दादा यावेत.

दादांचे अंतिम संस्कार केले ती जागा वर्तुळाकार शेणाने सारवलेली होती. समाधीकडे गेलो की मी लांबून त्या जागेला नमस्कार करत असे. काही दिवसांनी तिथे लहान लहान रोपे दिसू लागली. नंतर फुले दिसू लागली. गुलबक्षी रंगाच्या सुपारीच्या फुलांचा ताटवा झाला. गोष्टीतले डाळिंबाचे झाड आठवले. इथं ही रोपं कुणी लावलेली नाहीत; मग आपोआप कशी आली? फुलांच्या रूपात दादाच आलेत. ही फुलं तोडायची नाहीत! असं वाटायचं. मग हळूवार त्या फुलांवरून हात फिरवायचा. बिया पडून ती फुलं बरेच दिवस येत राहिली. आता वाटते, घातलेल्या हारांमध्ये ती फुले असतील, त्या बिया पडून रोपं आली

असतील कदाचित.

हे सगळे झाले बालपणीचे विचार आणि आठवणी. मोठे होऊ लागले तसे दादांचे मोठेपण जास्त कळू लागले. ते गेले तरी सगळ्यांच्या मनात ते होते. एकदा सुटी संपवून पुण्याला कॉलेजला परत चालले होते. एका सद्गृहस्थाजवळ जागा मिळाली. कुठून आली, कुठे चालली वगैरे चौकशी करताना मी पन्हाळ्याची आहे हे समजल्यावर त्यांनी मामासाहेब गुळवणी, बाबूराजे येडूरकर माहित आहेत का विचारले. मी त्याच घरातली आहे म्हटल्यावर सगळ्यांची चौकशी केली. दादांविषयी खूप भरभरून बोलले. ते आंतरभारतीचे श्याम पटवर्धन होते. आंतरभारतीचे कॅलेंडर स्वाक्षरी करून त्यांनी मला दिले.

दादांचे मित्र भरपूर असतील पण आत्याला घेऊन ते फारसे कुणाकडे गेले नसावेत. एकदा आत्या म्हणाली होती, 'त्या लोकांसारखा आपलाही संसार असावा असं वाटू नये म्हणून मला कुठे मित्रांकडे घेऊन जायचे नाहीत.'

त्यांच्या पिढीत सर्वात मोठे म्हणून तर दादा नाव पडले. सर्व भावंडांना त्यांचा आधार होता. येडूरकरांकडे त्यांच्या चुलत भावंडांना त्यांचे सहकार्य असायचे. ते असताना आणि ते गेल्यावरही येडूरकर मंडळी, त्यांचे भाचे-पुतणे पन्हाळ्याला सुटीला येत असत.

दादांशी माझं नातं बहुपेडी होतं. एकतर ते आमचे दादा होते, ते माझे गुरू होते. आत्याचे पती होते. बाबांचे आत्तेभाऊ म्हणून काका होते. आईचे मावस काका म्हणून आजोबा होते. साधी राहणी, उच्च विचारसरणींचे आदर्श होते. त्यांच्या अकाली जाण्याने ही नाती खूप कमी अनुभवता आली. आप्पा आणि माधवला तर काहीच अनुभवता आली नाहीत. आईला लग्न होऊन मोठ्या एकत्र कुटुंबात (गुळवणी, येडूरकर, अकोळकर, कुलकर्णी अशी मोठी फॅमिली) आल्यावर वडिलधारे म्हणून दादांचा खूप आधार वाटायचा असे तिच्या बोलण्यातून जाणवे. त्यांच्या जाण्याने शब्दशः भरून न येणारी पोकळी निर्माण झाली. कुटुंबातील प्रत्येकाची वैयक्तिक हानी झाली. काळ हे सगळ्याचं औषध असतं असं म्हणतात. पण किती तरी प्रसंग असे होते

की त्यांची आठवण यायची आणि वाटायचे आज दादा असते तर.

दादांच्या आठवणीत शिरलं की मन भरून येतं, डोळ्यातून झर झर टिपं गळू लागतात. गडद उदास भाव सर्वत्र भरून राहिला आहे असं वाटतं. काही तरी खूप मोलाचं असं आपण गमावलं आहे, अशा भावनेने विषण्णता येते. भूतकाळ वर्तमानकाळात खेचून आणता येत नाही आणि भूतकाळात शिरून काही लुडबूड करता येत नाही, या विचाराने अस्वस्थ अगतिकता येते.

डॉ. मृणाल काटे,पुणे

---

## ४ माझे दादा

वयाच्या दहाव्या वर्षापर्यंत मला दादांचा सहवास लाभला. त्यातली पहिली पाच-एक वर्षे नाकळती म्हणून बाजूला काढली तरी राहिलेल्या पाच-सहा वर्षात मला त्यांचे जेवढे सान्निध्य मिळाले, त्याने माझे आयुष्य उजळून निघाले. त्या काळात त्यांनी माझ्यासाठी जे कष्ट घेतले, त्यामुळे मी पुढे आयुष्यात उभा राहू शकलो, शिक्षण घेऊन अर्थार्जनही करू शकलो. सगळेच पालक आपल्या मुलांच्या शिक्षणाची काळजी घेतात, त्यांना सोयी-सुविधा देतात, त्यांचा अभ्यास घेतात पण, दादांनी माझ्यासाठी केले ते वैशिष्ट्यपूर्ण आणि अविस्मरणीय होते.

एक आठवण सांगतो. मला लहानपणी अक्षर व अंक ओळख लवकर होत नव्हती. मला शिकवावे तरी कसे असा प्रश्न आमच्या शाळेतील जी.डी. पाटील गुरूजींना पडला होता. त्यांनी आपली अडचण दादांना सांगितली, दादांनी त्यांना एक महिन्याच्या आत तो वाचायला लागेल असे आश्वासन दिले. त्यांनी मोठ्या अक्षरात काही फळांची, फुलांची नावे व त्यांचे वेगवेगळे आकार तयार केले. भेंडाच्या लहान मोठ्या काड्या, कर्दळीच्या गुंजा अशा प्रकारचे साहित्य जमा करून त्याच्या सहाय्याने मला अक्षर व अंक ओळख करून दिली. खरोखरच महिन्याभरात मी 'कमल नमन कर' हे वाक्य थांबत थांबत का

होईना वाचू लागलो. गुरूजींनाही खूप आश्चर्य वाटले. त्या नंतर त्यांनी दादांचे मागर्दशन घेऊन वेगवेगळ्या प्रकारचे शैक्षणिक साहित्य तयार केले. खेड्यातील मुलांना शिकविण्यासाठी त्याचा उपयोग केला. अशा प्रकारचे कार्य केल्याबद्दल त्यांचा सन्मान झाला. त्यांना आदर्श शिक्षक पुरस्कार मिळाला. ते आपल्या प्रत्येक भाषणात किंवा अन्यत्र बोलताना दादांच्या मार्गदर्शनाचा आदराने उल्लेख करीत असत. माझी मामेबहीण मृणाल अतिशय हुषार असल्यामुळे दादा नेहमी तिचे कौतुक करीत. तिची तयारी पाहून त्यांनी तिला एकदम तिसरीच्या परीक्षेला बसविले आणि तिनेही पहिला नंबर काढून दादांचा विश्वास खरा करून दाखविला.

मामांचे व दादांचे पस्परांवर खूप प्रेम होते, विश्वास होता. मामा गांधीवादी होते, नेहमी खादी वापरीत असत. दादाही त्यांच्या प्रमाणे खादी वापरीत, गांधीजींच्या विचारांना आदर्श मानून आचरण करीत असत.

एकदा मामा मला म्हणाले, ‘माझे विचार व बाबुराजाचे विचार काही तंतोतंत जुळत नव्हते. कधी कधी मतभिन्नता होत असे. परंतु त्याने तळसंदे इथे जे कार्य केले, ग्रामस्वच्छता म्हण, शेतकऱ्यांना दिलेले शिक्षण, छात्रालय या गोष्टींसाठी त्याने जी अविरत धडपड केली, त्याचे मला फार कौतुक वाटते. मी त्याबद्दल त्याला अनेकदा शाबासकी दिली आहे, त्याचे अभिनंदन केले आहे. मला खरोखर त्याचा अभिमान वाटतो’.

सामाजिक कार्याला आयुष्य वाहून घेतलेले दादा स्वयंपाक उत्तम करीत असत हे ऐकून मला आश्चर्य वाटले. दादांचे मित्र पाध्येकाकांनी सांगितले की दादा, ते आणि दोन मित्र एक खोली घेऊन पुण्यात राहिले होते. दादा स्वतः सगळ्यांसाठी स्वयंपाक करीत असत. भात भाजी, आमटी, भाकरी इ. पदार्थ चविष्ट असत. भाकरी तर फारच छान. त्यामुळे सर्वजण पोटभर जेवत असत.

किती वेगवेगळे पैलू होते त्यांच्या आयुष्याला! ते सश्रद्ध होते, त्यांना रूद्राध्याय मुखोद्गत होता, असे आमचे उपाध्याय फणसळकर

गुरूजी सांगत असत. ते मंदिरात जात असत. गीता आणि गीताई मुखोद्‍गत होती. गीतेच्या श्लोकांचा भावार्थ ते छात्रालयातील मुलांना समजावून सांगत असत. पण कर्मकांडावर त्यांचा विश्वास नव्हता. छात्रालयातील मुलांना ज्या प्रार्थना म्हणायला सांगत असत, त्यातही सर्वधर्मसमभाव असे. कन्नड भाषा शिकण्याची त्यांना हौस होती. संजय आणि रघुवीर हे माझे आतेभाऊ सुटीत येत असत. त्यांच्याकडून ते कानडी लिहायला व वाचायला शिकले.

अनेकदा माझ्या स्वप्नात दादा येतात. काही अप्रिय घटना घडल्या असतील तर माझी समजूत घालतात, सांत्वन करतात. स्वप्नातल्या दादांचाही मला फार आधार वाटतो.

परमेश्वर आहे की नाही, हे माहित नाही पण माणसातच परमेश्वर शोधावयाचा असेल तर तो दादांच्या व मामांच्या चरित्रात सापडेल हे नक्की. मला त्यांच्या सहवासात राहाता आले हे मी माझे सुदैव समजतो.

किरण येडूरकर

---

## ५ कै.दादामामांचे जीवन : एक आनंद यात्रा

माझा दादामामा बरोबर (कै. बाबूराजे) उणापुरा आयुष्यातील पहिल्या १६-१७ वर्षांचा सहभाग. पण जीवनाचा अर्थ, स्वावलंबन याबाबतीत त्यांनी स्वतःच्या आचरणातून केलेल्या संस्काराचा परिणाम त्यावेळेस असणाऱ्या आम्हा आत्ते-मामे भावंडाना लहानपणीच मिळाला त्यामुळे वयाच्या ५-६ वर्षापासून आमच्या जीवनाला एक प्रकारची शिस्त लागली.

शाळेला सुट्टी लागल्यानंतर एक ते सव्वा महिना आम्ही जवळजवळ २०-२५ भावंडे नेबापूर (पन्हाळा) येथे एकत्र जमायचो पण त्यामध्ये लहान-मोठा, आपला-दुसऱ्याचा असा कोणताही भेदभाव न करता सर्वांनी सकाळची न्याहरी करणे, जेवण झाल्यानंतर स्वतःचे ताट स्वतः स्वच्छ करणे, वाड्यासमोरच असलेल्या विहिरीत पोहता येत नसेल त्यांना पोहायला शिकवून स्नान करून स्वतःचे कपडे स्वतः धुणे या गोष्टी आम्हा सर्व भावंडामध्ये उत्स्फूर्तपणे उतरल्या त्याला कै.

दादामामाचा सहवास व संस्कार निर्विवादपणे कारणीभूत होता.

तळसंदे ही त्यांची कर्मभूमी. त्यामुळे त्याचा मुक्काम काही वेळेस तळसंदे येथे असायचा व आम्ही सुट्टीत नेबापूरला असायचो. पण आम्हाला दादामामाचा सहवास पाहिजे असायचा. एके दिवशी आम्ही चार भावंडांनी (मी, मोहन, नंदा व संपदा) नेबापूर ते तळसंदे पायी जायचे ठरविले. त्यामध्ये मी सर्वात लहान, नेबापुरात कुणालाही न सांगता आम्ही कपडे घेऊन आमचा आपटी मार्गे प्रवास सुरू केला. परंतु वाटेत शेतामध्ये असणाऱ्या मुरलीधर मामांचे (कै. मुरलीधर देशपांडे) लक्ष गेले व त्यांनी आम्हाला परत नेबापूरला आणले परंतु आमची इच्छाशक्ती जबरदस्त असल्याने रात्री कामानिमित्त वारणेला गेलेले मामा (कै. मामासाहेब गुळवणी) जीपमधून आले व त्यांना आमची गोष्ट समजली. त्यांनी लगेचच आम्हाला आणलेल्या जीपमधून तळसंदे येथे सोडण्यास सांगितले व अशातऱ्हेने आम्ही रात्री ११ वाजता दादामामाच्याकडे पोहोचलो. त्यांनी आमच्यावर केलेले प्रेम, आमच्यामध्ये आम्हांबरोबर आमच्या पद्धतीप्रमाणे त्याचे वावरणे त्यामुळे आमच्या मनामध्ये त्याच्याबद्दल किती आपुलकीची ओढ होती याचे हे एक छोटेसे उदाहरण.

साधा रोज धुतलेला पायजमा व शर्ट हा त्याचा पेहराव. दररोज सकाळी उठल्यावर वाड्यामध्ये शिकायला असणाऱ्या विद्यार्थ्यांबरोबर आम्हालाही रामदास स्वामींच्या मनाच्या श्लोकांचे काही भाग म्हणायला लावणे, घराची व परिसराची सर्वांनी मिळून स्वच्छता करणे तसेच सायंकाळी प्रार्थना म्हणणे, झोपताना चिंतन करून झोपणे व सकाळी आपला बिछाना स्वतः व्यवस्थित घडी करून ठेवणे या त्याच्या संस्कारामुळे जीवनात आम्ही यशस्वी वाटचाल करू शकलो.

स्वच्छतेवर त्याचा कटाक्ष व जोर असायचा व तो स्वतः ते करायचा. एकदा आम्ही तळसंदे मुक्कामी असताना शुक्रवारी सकाळी गावाची स्वच्छता करण्यासाठी सगळेजण जमले. अनेकजण त्यात उत्स्फूर्तपणे सहभागी झाले व त्यामध्ये आम्हीही सर्व लहान मुले उत्स्फूर्तपणे सहभागी झालो. व गाव चकाचक झाले. या अनुभवाचा आम्हाला पुढील जीवनात खूपच उपयोग झाला.

मनुष्याने कोणतेही काम हलके मानू नये. परोपकारी वृत्ती जोपासावी ही शिकवण स्वच्छता मोहिमेमुळे आम्हा सर्व लहान मुलांना समजली. त्याचा परिणाम आतापर्यंतच्या जीवनात झाला.

साधी राहणी, सुयोग्य विचारसरणी, परोपकारी वृत्ती, स्वच्छता, मन:चिंतन यासारख्या गोष्टींचे आचरण माझ्याकडून थोड्याफार प्रमाणात घडले. लहानपणी माझ्यावर झालेला दादामामाच्या सहवासाचा, विचारांचा तो परिणाम आहे. त्याचा मला अभिमान आहे.

शिरीष बापूसाो देशपांडे

---

## ६ नंदादीपाच्या प्रकाशात

सगळी माणसं ज्याला बाबूराजे म्हणत असत त्याला आम्ही दादा म्हणायचो. दादा म्हणजे माझा मामा. आईचा मावस भाऊ पण आई सांगते की आम्ही नेहमी सख्ख्या भावंडाप्रमाणे वाढलो, वावरलो. एकत्र शाळेला गेलो. आईला सायकलही त्यानेच शिकविली म्हणे. दादाचा विषय निघाला की आई भरभरून बोलते. जुन्या काळातील, पन्हाळा – नेबापुरातील गोष्टी सांगते.

आम्ही मुलं – मी आणि माझी भावंडं लहानपणी खूप वेळा नेबापूरला जायचो. तो काळ आठवला की अजूनही उत्साह संचारतो. किती आनंदाचे दिवस होते. खायचं, प्यायचं आणि खूप हुंदडायचं, खेळायचं. दुःखाचा लवलेशही नाही. या सगळ्या आठवणींत दादाच्या आठवणींचा एक सुगंधी कोपरा आहे. त्याचे प्रसन्न हास्य, मृदू बोलणे आणि सगळ्यांशी प्रेमाने वागणे यांच्या दरवळाने आमचे बालपण अधिक हृद्य झाले.

मला आठवते की, तेव्हा अंबारीत पिकलेल्या केळींचे घड ठेवलेले असायचे. केळी खायला कोणी नको म्हणत नसे पण, आम्ही मात्र हळू चोरपावलाने अंबारीत जाऊन केळी घेऊन गुपचुप मागील दाराने खालच्या बागेत जाऊन केळी खायचो. असं करण्यात एक थ्रिल

वाटायचं. मजा यायची. पुढे काही वर्षं गेल्यावर समजलं की ती केळीची बाग दादाने लावली होती. तिची मशागत, काळजी घेणं सगळं दादाच करीत असे. गर्द पिवळ्या रंगाची, मोठी आणि गोड केळी होती. अनेक प्रयोग करून दादाने त्यांना वैशिष्ट्यपूर्ण बनवले होते. आज हे आठवताना, त्या वेळच्या थ्रिलमध्ये आणखी एक अभिमानाचा जरतारी धागा मिसळतो.

दादा घरात असला की, सकाळी साडे-सहाला प्रार्थना असे. या प्रार्थनेत गीतेचा अध्याय, सर्वोदयाची प्रार्थना तर असेच पण; विशेष म्हणजे सखुमावशी तिच्या गोड आवाजात 'घनःश्याम सुंदरा' ही भूपाळी म्हणत असे. आम्हाला ही म्हणायला सांगे पण, तिच्या म्हणण्याची सर कशाला नाही. 'सर्वांशी सुख लाभावे' या श्लोकाने प्रार्थना संपे. वातावरण मंगलमय होऊन जाई. ते दिवस संपले. त्यानंतर मी पुन्हा कधी प्रार्थना म्हटली नाही. आज हुरहूर वाटते पण प्रार्थना तोंडातून उमटत नाही. त्याला दादाच्या जाण्याची मोहोर लागली आहे.

आई सांगते, दादा फार कष्टाळू होता. आपले परके, उच्च-नीच असा दुजाभाव त्याच्याकडे नव्हता. थोरातांच्या कमळेच्या देवळाजवळच्या शेतातली एक आठवण ती सांगते. शेत कोणाचे ते तिला आठवत नाही. म्हणते, 'अग ऽ, आपल्या त्या समाधीजवळच्या शेताला लागून बघ ते शेत, तर त्या शेतातील विहिरीत गाळ साचून राहिला होता. पिकांना पाणी मिळत नव्हते तरी तो मालक काही लक्ष देत नव्हता. दादाने दोन-चारदा सांगून पाहिले पण त्यांने काही मनावर घेतले नाही. पण दादाच्या मनात आले होते ना, तो स्वतःच गेला; एक-दोघांना बरोबर घेऊन विहिरीतला गाळ काढला आणि त्या शेताच्या मालकाला म्हणाला, 'आता पाऊस आला की झरे फुटतील. शेतात काकडी लाव आणि आम्हाला खायला बोलव.' अशी वागण्याची पद्धत. कोणावर रागावणे नाही, तोडून बोलणे नाही. दुसऱ्यासाठी करता येतील तेवढे कष्ट मात्र करायचे!'

आणखी एक आठवण माझ्या मनाच्या खोल गाभ्यात पक्की रूतून बसली आहे. त्या काळी फ्लशिंग संडास नव्हते. गोठ्यातून बाहेर

पडून खालच्या बागेकडे जायला लागले की उजव्या बाजूला दोन पाटीचे संडास होते. आम्ही सगळेजण ते वापरीत होतो. एके दिवशी मी पाहिले की, दादा स्वतः एका माणसाला बरोबर घेऊन तिथला मैला कंपोस्टच्या खड्ड्यात नेऊन टाकत होता. माझे पाय जागेवरच खिळले. काही न बोलता मी तिथून पटकन निघाले आणि घरात गेले. आज हे आठवताना वाटते की, केवढा हा मोठेपणा. अहंभावाचा निरास करणे याहून वेगळे ते काय? कसला अहंकार नाही, सेवेचा बडेजाव नाही आणि अत्यंत किळसवाणे काम सहजपणे करून टाकण्याची रीत! खरंच, दादाचे वागणे विलक्षण होते. तुमच्या-माझ्या सारख्यांपेक्षा फार वेगळे. अशा व्यक्तीच्या सहवासात आपण होतो, त्याच्या अंगा-खांद्यावर खेळलो, त्याच्या कुशीत झोपलो, याचा मला अभिमान आहे. देवघरातील नंदादीपाच्या प्रकाशात कसे शांत, प्रसन्न आणि उदात्त भावनेने मन भरून जाते, तसा अनुभव दादाच्या गोष्टी आठवताना येतो.

सौ. संपदा काथवटे, अथणी

---

## ७ प्रातः स्मरणीय बाबूराजे गुरूजी

कै. परमपूज्य बाबूराजांच्या विषयी सांगताना हृदय भरून येते. ते आमचा आधारस्तंभ होते. त्यांच्याबद्दल मनात नितांत आदर असल्यामुळे त्यांच्या आठवणींनी अंतःकरणात संमिश्र भावनांची दाटी होत नाही तर एकच एक पूज्य भाव मनाला व्यापून रहातो.

साधारणतः १९६० च्याही पूर्वीचा काळ असावा. मी सहावीच्या वर्गात शिकत असेन तेव्हापासून, माझा व त्यांचा गुरू-शिष्य संबंध आकाराला आला. आमच्या गावात त्यावेळी विजेची (इलेक्ट्रिसिटी) सोय सर्वांकडे नव्हती. पूज्य मामांच्या वाड्यात लाईटची सोय होती. त्यांच्या वाड्यात मुले अभ्यासाला जायची. एके दिवशी मीही त्यात सामील झालो. आम्ही दिवसभर शाळेला जायचो,

जेवणाखाण्यासाठी तेवढेच घरी जायचो. जेवणानंतर अभ्यासाला वाड्यात जायचो आणि रात्री १० वाजेपर्यंत अभ्यास करून रात्री सारे जण तिथेच झोपायचो.

रविवार सोडून अन्य दिवशी आमचा दिनक्रम अगदी ठरलेला असायचा. बाबूराजे भल्या पहाटे उठायचे. सूर्योदयापूर्वी आम्हाला तलावाकडे पोहायला घेऊन जायचे. त्यांनीच आम्हाला पोहायला शिकवले. त्यामुळे तळ्यात पोहण्याचा आनंद अनुभवायला मिळाला. पोहून परत आल्यावर थोडी कवायत आणि मग अभ्यास!

दररोज सकाळी आम्ही मुले गुरूजींच्याबरोबर (आम्ही त्यांना गुरूजी म्हणत असू) गावातील एक गल्ली झाडून साफ करीत असू. प्रत्येक रविवारी सर्व गाव-सफाईचा उपक्रम असे. त्या दिवशी आम्ही सर्वजण हरिजनवाड्यात एकत्र जमायचो. सफाई करताना गुरूजींच्या मागोमाग 'उत्तुंग आमुची उत्तर सीमा इंच इंच लढवू' या सारखी गीतेही म्हणत जायचो. सायंकाळी प्रार्थना असे. गीतेचा १२ वा व १५ अध्याय म्हणायचा आणि मग अभ्यासाला बसायचे. अभ्यासातील शंकांचे निरसन गुरूजी करायचे. रात्री १० वाजता मात्र सर्व विद्यार्थ्यांना झोपायला सांगायचे. त्यावर त्यांचा कटाक्ष होता. रात्री दोन वाजता ते उठून सगळी मुले नीट झोपली आहेत की नाहीत ते पहायचे. कोणाच्या अंगावर पांघरूण नसेल तर घालायचे. हा त्यांचा प्रेमळपणा आम्ही वर्षानुवर्षे अनुभवला. त्यांनी कधी मारझोड केली नाही की रागाचे शब्द वापरले नाहीत. आतापर्यंत सांगितलेला अनुभव हा आमचा सर्वांचा, सामुहिक अनुभव आहे. माझ्या व्यक्तिगत जीवनातही त्यांनी पथप्रदर्शन केले, म्हणूनच मला आयुष्याचा सूर सापडला.

मी दहावी पास झाल्यावर अचानक एके दिवशी गुरूजींनी सांगितले की तू ११ वी ला पन्हाळ्याला जा. मी घुणकी हायस्कूलच्या मुख्याध्यापक कदम सरांना तसे सांगितले पण त्यांनी शाळा सोडल्याचा दाखला देण्यास नकार दिला. तरीही, गुरूजींनी मला पन्हाळा हायस्कूलमध्ये दाखल केले. मी वर्षभर पन्हाळ्याला होतो. प्रत्येक शनिवारी गुरूजी पन्हाळ्याला यायचे. माझ्या अभ्यासाची, आरोग्याची

तळमळीने विचारपूस करायचे. मी चांगल्या गुणांनी पास झालो. पण नंतर घरीच होतो. शेतातील काम करायचो. घरातील सर्वजण पुढील शिक्षणाला नकार द्यायचे. मला तर पुढे शिकण्याची इच्छा होती. माझी अवस्था बिकट झाली होती. काय करावे अन् काय नाही हे समजत नव्हते. त्या गोंधळलेल्या अवस्थेतही मी रोज वाड्यावर जातच होतो. एके दिवशी गुरूजींबरोबर शेताकडे जात असताना ते म्हणाले, 'असा वेळ वाया जाऊ देऊ नको. तुला बऱ्यापैकी शेती आहे. मग बावडा येथे शेती शाळेचा दोन वर्षांचा कोर्स आहे. तो का करत नाहीस? तेथे बोर्डिंग पण आहे. खर्च कमी आहे' मी त्यांचा सल्ला मानला. गोंधळलेली अवस्था संपली. मी शेतीशाळेत प्रवेश घेतला. शाळा सुरू होण्यास अजून सात दिवस अवकाश होता. त्याच वेळी, तेथील व्यवस्थापक पत्की साहेबांनी सुचविले की, 'पशुसंवर्धन खात्याच्या एक वर्षाच्या कोर्ससाठी जाहिरात निघाली आहे. तुला मार्क्स चांगले आहेत. तू अर्ज कर. तिथे स्टायपेंड आणि वसतीगृहाची सोय आहे. शिवाय नोकरीची हमी.'

मी विलंब न करता अर्ज केला. माझी निवड झाली. तो कोर्स मी पूर्ण केला. मला यथावकाश १९६६ मध्ये कायम स्वरूपाची नोकरी मिळाली. हे सारे गुरूजींनी योग्य मार्गदर्शन केल्यामुळेच घडू शकले. नोकरीवर रूजू झाल्यावर एकदा गुरूजींची भेट झाली आणि त्यांनी गमतीने चहा मागितला. माझ्या घरी येऊन ते चहा प्याले. मी धन्य झालो. माझ्या बिकट अवस्थेत ते पर्वतासारखे पाठीशी उभे राहिले म्हणून माझे आयुष्य सुखकर, आनंदी झाले.

१९७० मध्ये झालेले त्यांचे निधन ही माझ्या हृदयावरील खोल जखम आहे. जिव्हाळा म्हणजे काय ते वागण्यातून दाखवून देणारा आमचा पाठिराखा गेला हे शल्य अजूनही खुपते.

दादासो चव्हाण


---

तळसंद्यातील प्रयोगाचे उगमस्थान




तळसंदे येथील गुळवणी मामांचा वाडा

शरीरमाद्यं खलु धर्मसाधनम्।



तळसंदे येथील प्रशस्त व्यायामशाळा

समताधिष्ठित घरकुल योजनेतील घर



श्री नानाप्पा गोपाळा कांबळे



ग्राम स्वच्छता अभियानाची सलग परंपरा



बाबूराजे येडूरकर ग्रामस्वच्छता व पर्यावरण अभियान



रंगात आलेली कबड्डी

— वंदेमातरम् —

[illegible] [illegible] [illegible] [illegible]. [illegible] [illegible] [illegible] [illegible].

विवेकानंदांचे [illegible] [illegible] [illegible] [illegible] [illegible] [illegible]: As soon as a man or nation loses faith in himself death comes. Believe firmly in yourself & then God.

[illegible] विश्वास आहे [illegible] [illegible] [illegible] [illegible]. [illegible] [illegible] [illegible] [illegible] [illegible] [illegible] [illegible]. [illegible] [illegible]

— वंदेमातरम् —

दिनचर्या कशी असावी? —

उठणे – ४ वाजता. स्वाध्याय स्नान कपडे धुणे इ.

- ५½–६½ मुलांना [illegible]
- 1 ६½–७½ प्रार्थना.
- 1 ७½–८½ प्रौढ [illegible].
- 2 ८½–९ [illegible] " "
- 1 ९–१० [illegible] " "
- 2 १०½–१२ ऑफिस [illegible]; [illegible]
- 3 ४–६½ [illegible] फेरी.

10

[illegible] 23 [illegible]. [illegible] [illegible] [illegible]. [illegible] [illegible] [illegible] [illegible]. [illegible] 9 [illegible] [illegible] [illegible] [illegible] आहे.

a) [illegible] [illegible] [illegible].
b) [illegible] [illegible] [illegible].
c) [illegible] ऑक्टोबर
d) [illegible] [illegible] [illegible] [illegible] [illegible].
e) [illegible] [illegible]
f) [illegible] eye-bank [illegible].

अ. वा. भिगवान
५३१ ई, शाहूपुरी
कोल्हापूर ४१६००१
चौदा जानेवारी ९८

मला फार फार तीव्रतेने कै. बापूराजांची आठवण आली. कै. बापूराजे हे एक आगळे वेगळे रसायन होते. त्यांचा ध्येयवाद आणि वैचारिक बैठक ही त्यांच्या आई आणि वडील अशा दोन्हीही घराण्याकडून त्यांना लाभली होती. माझ्याशी ते सतत स्वच्छ मोकळेपणाने बोलत. ते सतत [illegible] बोलत नसत. प्रत्येक बाबतीत त्यांचा [illegible] [illegible] होता. [illegible] [illegible] [illegible] [illegible] त्यांनी अपार कष्ट सोसले होते..

अ. वा. भिगवान
१४।१।९८

# ८ वैष्णव जन तो तेणे कहिए.......

आदरणीय बाबूराजे गुरूजींनी आमच्या तळसंदे गावात अनेक योजना राबविल्या, उपक्रम सुरू केले. गाव स्वच्छ, सुंदर, व्यसनरहित आणि म्हणूनच आदर्श बनविले. दुसऱ्याचे दुःख जाणून घेऊन, त्याला मदतीचा हात देण्याचा त्यांचा स्वभाव होता. त्यांनीच शिकविलेल्या 'वैष्णव जन तो तेणे कहिए, जो पीड पराई जाणे रे' या भजनातील खरे वैष्णव ते स्वतःच होते. माझ्या वैयक्तिक जीवनातही मला याचा प्रत्यय आला.

मी तळसंदे येथील श्री शंकर बाळू कांबळे या अनुसूचित जातीतील शेतमजुराचा मुलगा. वडिलांच्या शेतमजुरीवर आमचा उदरनिर्वाह चालू होता. उत्पन्नाचे अन्य साधन नव्हते. अज्ञान आणि दारिद्र्य यांच्याशी झगडा सुरू होता. तशातच माझ्या वडिलांच्या आजारपणामुळे, माझे शिक्षण बंद होऊन घरगाडा चालविण्याची जबाबदारी माझ्यावर आली. अशा बिकट परिस्थितीवर मात करण्याची आमची ताकद नव्हती. अशा वेळी बाबुराजे गुरूजी देवदूतासारखे माझ्या जीवनात आले.

इयत्ता पाचवीत माझे शिक्षण बंद झाल्याचे समजताच बाबुराजांनी माझ्या वडिलांना व मला वाड्यावर बोलावून घेतले. बहुधा आपल्याला चाकरीवर ठेवण्यासाठी बोलावले असावे अशा समजुतीने वाड्यावर गेलो पण तिथे घडले वेगळेच. बाबुराजांनी माझ्या वडिलांकडून माझे शिक्षण चालू ठेवण्यातील अडचणी जाणून घेतल्या आणि म्हणाले, 'तुझ्या नशिबाला जे आले ते मुलाच्या नशिबात येऊ नये यासाठी त्याला पुन्हा शाळेत घाल. त्याच्या आयुष्याची बरबादी करू नको' यावर शिक्षणाच्या खर्चाचा प्रश्न आला तेव्हा त्यांनी सांगितले, 'त्याच्या शिक्षणाचा संपूर्ण खर्च मी करीन. त्याला काही कमी पडणार नाही. तू काळजी करू नको.' त्यानंतर माझे बंद पडलेले शिक्षण पुन्हा सुरू झाले. इयत्ता ५ वी ते ११ वी पर्यंतचा माझ्या शिक्षणाचा व कपड्यांचा खर्च बाबुराजे गुरूजींनी केला. त्यामुळे मी पुढील शिक्षण

घेतले. एका सरकारी कार्यालयात सन्मानाने नोकरी केली.

मी स्वतः शिक्षण घेतले व मला चांगली नोकरी मिळाली. त्यामुळे मी माझ्या मुलांचे शिक्षण पूर्ण करून माझ्या कुटुंबाचा विकास करू शकलो. बाबुराजांनी मदतीचा हात दिला नसता तर, एक शेतमजूर म्हणून मला दिवस कंठावे लागले असते.

अडल्या नडल्यांना मदत करण्याची गुरूजींची परंपरा डॉ. भाऊसाहेब गुळवणी यांनी पुढे चालू ठेवली आहे, याचाही प्रत्यय मला आला. माझा मुलगा प्रशांत याच्या तंत्रशिक्षणाच्या वेळी उभी राहिलेली आर्थिक अडचण माझ्या आवाक्याबाहेरची होती. ती मी डॉक्टर साहेबांना सांगितली व त्यांनी ती मा. विनयरावजी कोरे यांचेकडून मदत मिळवून देऊन पूर्ण केली.

एकेकाळी दैन्य-दारिद्र्यात जीवन कंठणारा, शिक्षणाला पारखा झालेला, पोटापुरते अन्न कसेबसे मिळवणारा आणि अनवाणी पायाने फिरणारा मी आज सुरेखशा घरात सुख व आरामाचे जीवन जगतो आहे. दारात स्वतःची चारचाकी गाडी आहे, त्यातून फिरतो आहे. हे घडले ते केवळ बाबुराजे गुरूजींच्या कृपाशीर्वादानेच. वैष्णव जन कोणाला म्हणावे हे माझ्यापेक्षा अधिक चांगले कोण सांगू शकेल ?

मारूती शंकर कांबळे,
तळसंदे

---

## ९ जीवनाचे शिल्पकार

मला आठवतो तो काळ आहे साधारणतः १९५८ पासून पुढे १९६७ पर्यंतचा. त्यावेळी माझे वय १२ वर्षांचे असावे. मी इयत्ता ४ थीत शिकत होतो तेव्हापासून प.पू. मामांच्या वाड्यातील छात्रालयात जाऊ लागलो. बाबूराजे गुरूजी यांच्या निगराणीखाली माझे व माझ्या बरोबरीच्या मुलांचे आयुष्य घडू लागले. त्यावेळी जे घडत होते, ते पुढील आयुष्यात इतके उपयोगी पडेल याची पुसटशी कल्पनाही

आम्हाला नव्हती. आता तो काळ आठवला की डोळ्यांसमोर उभे राहतात ते बाबुराजे गुरूजी आणि त्यांच्या सानिध्यातील मंतरलेले दिवस.

गावातील शाळा शिकणारी सर्व मुलं रात्री अभ्यासासाठी आणि झोपायला वाड्यातच जायची. पहाटे पहाटे आम्हाला नाव घेऊन आईच्या मायेने जागे करण्याचे काम गुरूजी करीत. आम्ही जागे होत असू तेव्हा गुरूजी तळ्यातून स्नान करून आलेले असायचे. नखशिखान्त खादीचे कपडे घातलेले बाबुराजे गुरूजी आजही डोळ्यासमोर उभे रहातात. सकाळी उठल्यावर ते आम्हाला व्यायाम करायला लावत. एवढ्या लहान वयात सूर्यनमस्कार, जोर-बैठका, आसने यांची आवड त्यांनीच आमच्या मनात निर्माण केली. गीतेचे अध्याय, रामदासांचे श्लोक आणि गांधीजींच्या प्रार्थना आम्ही त्यांच्या कडून शिकलो. अजूनही ते सगळे न चुकता म्हणता येते. त्यांनी आम्हाला राष्ट्रसेवादलाची गाणी शिकवली. मानवता, एकता, नम्रता, समता ही मूल्ये त्यांनी आमच्या मनात रूजविली. ग्रामसफाईचा त्यांनी जो धडा घालून दिला तो केवळ अविस्मरणीय होता. ते गावात अनेक उपक्रम करीत होते आणि ते सर्व आमच्या डोळ्यांसमोर घडत होते. काही प्रमाणात आम्हाला त्यात सहभागी होता येत होते. भिंती नसलेल्या प्रयोगशाळेत आम्ही घडत होतो. आमच्या जीवनाला आकार प्राप्त होत होता.

आम्हा त्यावेळच्या विद्यार्थ्यांना बाबुराजांच्या रूपाने सद्‌गुरूच लाभले होते. त्यांच्या कृपाशीर्वादाने आम्ही एस्.एस्.सी. पर्यंतचे शिक्षण घेऊ शकलो. इंग्रजी, गणित, सायन्स सारखे विषय त्यांनी सोपे करून शिकवले म्हणूनच आम्ही जगण्यापुरते का होईना शिकलो. त्यांच्यामुळे, व्यायाम आणि व्यसनापासून दूर राहणे हे दोन्ही आत्मसात केले. स्वच्छता, प्रेम मनात रूजले. आम्ही मनाने व शरीराने सुदृढ झालो. सर्वार्थाने घडलो.

आजही मन भूतकाळात जाते आणि त्यांचे मधुर बोलणे, प्रेमळ स्वभाव, सर्वांचे भले व्हावे यासाठीची तळमळ हे सर्व आठवते. ते

आपल्यात नाहीत या विचाराने मन खिन्न होते. त्यांचा कधीही विसर पडू देऊ नको हेच मागणे मी नेहमी भगवंताकडे मागतो.

निवृत्त कोलुलकर
तळसंदे

---

## १0 मित्र आणि मार्गदर्शक

माझ्या भावंडात मीच सगळ्यांत मोठा. बाकीची पाच भावंडे माझ्यापेक्षा लहान. घरची परिस्थिती अत्यंत हलाखीची. घरची थोडी शेती होती; त्यात वडील राबायचे. घरच्या कठीण परिस्थितीमुळे शिक्षणाच्या वाटेला न जाता, जनावरे सांभाळणे व शेतात काम करणे याशिवाय दुसरा पर्याय नव्हता. मी वयाच्या तेराव्या वर्षापासून शेतात काम करू लागलो. आमचे शेत व गुळवणी मामांचे शेत शेजारी शेजारी असल्यामुळे आमचे मामांच्या वाड्यात येणे जाणे सुरू असायचे. त्यातूनच बाबुराजांची ओळख झाली. बाबुराजे तेव्हा शिकत होते. पुढे ते शेतीशास्त्राचे पदवीधर झाले. ते रोज मामांच्या शेताकडे येत असत. त्यातून माझे व त्यांचे घनिष्ठ मैत्रीचे नाते निर्माण झाले. मी आणि आजूबाजूचे लोक त्यांना दादा म्हणून हाक मारू लागलो.

आम्ही जुन्या पद्धतीप्रमाणे शेती करायचो. बाबुराजांनी आम्हाला आधुनिक पद्धतीने शेती करण्यास शिकविले. भरघोस पीक येण्यासाठी काय करावे, रोपांची काळजी कशी घ्यावी हे सगळे सांगितले. आमचा त्रास वाचावा, श्रम कमी व्हावे यासाठी ते सतत प्रयत्नशील असत. आम्ही सुपाने पाणी उपसून गव्हाला पाणी पाजायचो. त्यामुळे कष्ट खूप व्हायचे. बाबुराजांनी दोन बैलांची मोट जोडून मोटीने पाणी उपसण्याची सोय केली. त्यामुळे आमचा केवढा तरी त्रास वाचला.

त्यावेळच्या काही गोष्टी आठवल्या की आजही हसू येते. भाताची कापणी झाल्यावर रात्री ९ नंतर मळणी केली जायची.

मळणीसाठी खळे तयार करून त्यावर ६ ते ७ जनावरे मळणीस जुंपलेली असायची. एक माणूस जनावरे हाकलायला असायचा. २० ते २५ गडी भात बडविण्यास असायचे. रात्री बारा नंतर बाबुराजे स्वतः सर्वांना चहा-बटर घेऊन खळ्यावर यायचे. आमच्याशी बोलायचे. आमची काळजी घ्यायचे. सगळ्या गड्यात चार-दोन जण कमचुकारपणा करायचे. ज्ञानू बडे, केशव वाणी, महादेव लोहार त्यात हमखास असायचे. ते पिंजर विसकटायला जायचे आणि अंगावर पिंजर घेऊन झोपायचे. बाबुराजे त्यांच्याकडे जायचे आणि पाठीवर थाप मारून म्हणायचे, 'अरे, वाघ आहेस. किती भरपूर काम केलेस'! त्यामुळे झोपलेले गडी लाजून उठायचे आणि कामाला लागायचे.

गुळवणी मामांच्या विहिरीवर मोटारपंप बसविला. मग बाबुराजांच्या देखरेखी आणि मार्गदर्शनाखाली शेताच्या वरच्या भागात वांगी, कोबी, फ्लॉवर, भेंडी, काकडी, गवारी असा भाजीपाला पिकू लागला. त्यांच्या नवजीवन शेती पद्धतीमुळे भरघोस पीक येऊ लागले. आणि भाजी विक्रीचे काम माझ्याकडे आले. माझ्या मुलांचे शिक्षण, घरखर्च इ. कारणांसाठी मला गरज होतीच. मी रविवारी पन्हाळा, गुरूवारी कोडोली, शुक्रवारी देवळे तर मंगळवारी कोल्हापूरला भाजी विकायला जायचो. घरचे सगळे बायको बघायची. आठवड्याला दोनशे रूपयांच्या आसपास मिळकत व्हायची आणि आमच्या गरजा थोड्या फार प्रमाणात भागायच्या. दादांच्या व मामांच्या सहवासामुळे मला कष्ट करून पैसे मिळविण्याची चांगली सवय लागली.

डोंगराळ प्रदेश असल्यामुळे आमच्या भागात पाणी नसायचे आणि शेतीशिवाय उद्योगाचे दुसरे साधनही नाही. त्यामुळे घरात पैशाची व धान्याची नेहमी चणचण असायची. यातून मार्ग काढण्यासाठी दादांनी गावात धान्याची भिशी सुरू केली. त्याला लोकांचा चांगला प्रतिसाद मिळाला म्हणून मग पैशाची भिशी सुरू केली. लोक आपापल्या कुवतीनुसार रूपाया, दोन रूपयांची बचत करून काही रक्कम जमा करू लागले. या भिशीचा चांगला उपयोग होऊ लागला. एखाद्या घरात लग्न, शेतीचे काम किंवा जनावर खरेदी असे काही निघाले की, या भिशीचा

उपयोग होऊ लागला. बाबुराजांनी भिशी मंडळाचा गणेशोत्सव सुरू केला. गेली साठ वर्षे आम्ही सर्व शेतकरी एकत्र येऊन साध्या पद्धतीने गणेशोत्सव साजरा करीत आहोत.

साठ-पासष्ठ वर्षे झाली असतील, आमच्या आपटी गावात बाबुराजांनी रात्रीची शाळा सुरू केली. दादा रात्री आठ वाजता कंदील, काठी घेऊन आपटीत यायचे. सर्व शेतकऱ्यांना आमच्या घरी एकत्र करून, दोन-तीन तास शिकवायचे. त्यांच्यामुळे अनेक शेतकरी साक्षर झाले. ऊन असो की पाऊस, शिकवण्याचे काम संपवून ते रात्री ११ वाजता परत जायचे. पावसाळ्यात पाऊस भरपूर असायचा. वाटेत ओढ्याला भरपूर पाणी असायचे, सगळीकडे चिखल असायचा आणि या सगळ्यावर कडी म्हणजे मंगळवार पेठेच्या तळीजवळ रात्री बिबट्याचा वावर असायचा. आम्ही एकटे जाऊ नका असे कितीही म्हटले तरी दादा ऐकत नसत. निर्भयपणे एकटे वाड्यावर परत जात. संरक्षणासाठी काठी आणि वाट दिसण्यासाठी कंदील, बस् एवढेच.

ग्राम स्वच्छतेची त्यांना आवड होती. दादा गावात असले की पहाटे पाच वाजता आपटीत यायचे. आम्हा सगळ्यांना ते लवकर उठवायचे आणि मग बळी कदम, शंकर कबाडे, शंकर कदम, शंकर पवार, बळीअण्णा बुचडे, किसन पवार, राघू माने, रंगराव कापसे या सगळ्यांना घेऊन गावातील रस्त्याच्या दोन्ही बाजूला असलेली घाण साफ करायचे. सर्वात पुढे ते असायचे. आधी स्वतः करायचे आणि मग इतरांना सांगायचे. अशा सगळ्या उपक्रमांत अनेक जातीतील लोकांशी त्यांचे सख्य जमले. ते निभावण्याकडे त्यांचा कटाक्ष होता. माझ्या मित्राचे, दत्तू कदमचे रात्री १२ वाजता हृदयविकाराने निधन झाले. ही बातमी समजताच, ते एकटेच रात्री कंदील घेऊन आपटीत आले. सर्व विधी आटोपल्यानंतरच घरी गेले.

त्यांच्या निधनाने मनावर झालेली जखम अजून भळभळते आहे. मामांच्या विहिरीचा गाळ काढण्याचे काम चालू होते. त्यावेळी विहिरीत साठणारे पाणी सुपाने उपसावे लागे. मी, बळी कदम, हिंदूराव कवठेकर, शाम बुवा, रंगा पवार असे सगळेजण सुपाने पाणी उपसत

होतो. दादाही पाणी उपसायला आम्हाला मदत करायला यायचे. त्याचा परिणाम त्यांच्या प्रकृतीवर झाला. त्यांच्या छातीत दुखू लागले. मामांनी त्यांना लवकरात लवकर कोल्हापुरातील जाधवांच्या दवाखान्यात दाखल केले. पण उपचार चालू असताना त्यांचे दुःखद निधन झाले. बातमी कळली आणि माझे मन कशात लागेना. मामांच्या वाड्यात धाव घेतली. आमचे दादा, आमचे बाबूराजे आम्हाला सोडून गेले होते. आम्ही अनाथ, पोरके झालो होतो. आमचा मित्र गमावला होता. अजूनही त्या आठवणीने मन अस्वस्थ होते. आज ही शेतात गेलो की, दादा तेथे उभे आहेत असा भास होतो.

शंकर (आबा) कापसे
आपटी (पन्हाळा)

---

## ११ सत्संगाचा अनुभव देणारा सहवास

स्व. बाबुराजे (गुरूजी) यांच्या सहवासाने आमचे, माझे व माझ्याप्रमाणे कित्येकांचे आयुष्य उजळून निघाले. त्यांचा सहवास म्हणजे मूर्तिमंत सत्संग. त्यांच्या आठवणी सुट्या येतच नाहीत. ईशस्तवन आणि त्याला जोडून त्यांची आठवण. इथेही मनातल्या मनात प्रथम ईशस्तवन करून मग आठवणींचा ठेवा उघडतो.

बाबुराजे गुरूजींच्या दिनचर्येची सुरूवात पहाटे चार वाजता ब्राह्म मुहुर्तावर व्हायची. ऋतू कोणताही असो, ते तलावातच स्नान करायचे आणि मग कल्लेश्वराचे दर्शन घ्यायचे. पहाटे स्नानाला जाताना, कोणाची झोप मोड होऊ नये म्हणून अगदी मांजराच्या पावलांनी जायचे. परत आल्यावर मात्र गोड हाकेने सर्वांना उठवायचे. सकाळी सहा वाजता प्रार्थना असायची. 'खरा तो एकचि धर्म' ने प्रार्थना सुरू व्हायची आणि 'सर्वांशी सुख लाभावे ।तशी आरोग्य संपदा। कल्याण व्हावे सर्वांचे। कोणी दुःखी असू नये।' या श्लोकाने प्रार्थनेची अखेर व्हायची. प्रार्थनेनंतर गीतेतील अध्यायांचे पठण आणि रामरक्षा स्तोत्र होई. त्यानंतर ते मुलांच्या संस्कृत, इंग्रजी, गणित या विषयांतील

अभ्यासातील अडचणींचे निराकरण करीत. कोणत्याही प्रकारचा भेदभाव करीत नसत. आपण सर्वांनी एका कुटुंबातील असल्याप्रमाणे वागण्याची शिकवण देत.

गुरूजी उच्चवर्णीय ब्राह्मण होते. ते मामासाहेबांचे भाचे-जावई होते. ते उच्चशिक्षित म्हणजे बी.एस्.सी. ॲग्री होते. एवढे सगळे असूनही त्यांच्या वागण्या-बोलण्यात अहंकार नव्हता. त्यांनी लोककल्याणाचे व्रत घेतले होते. भोसले गुरूजींनी त्यांना मोलाचे सहकार्य केले. कृष्णार्जुनाची जोडी होती ती.

अठरापगड जातीतील लोकांचे एकत्र सहभोजन, ग्रामस्वच्छता, रात्रीची शाळा-प्रौढ साक्षरता वर्ग असे अनेक उपक्रम त्यांनी गावात राबवले. आम्ही त्याचे साक्षीदार झालो आणि भागही झालो. त्यांच्या सानिध्यात जे जे विद्यार्थी आले ते प्राध्यापक, इंजिनिअर, ऑफिसर झाले आणि सर्वात महत्त्वाचे म्हणजे ते सदाचारी झाले. बाबुराजे गुरूजींनी जी मूल्ये रूजविली ती आचरणात आणताना एक वेगळ्या प्रकारचे समाधान लाभते.

गुरूजींच्या निधनाचा मोठा धक्का मला आणि आम्हा सगळ्यांनाच बसला. आता, त्यांच्या सहवासाचे क्षण आठवणे आणि त्यांनी घालून दिलेल्या मार्गावर चालत राहाणे हेच त्यांचे ऋण फेडण्याचे साधन ठरले आहे.

श्री. यशवंत पांडुरंग पाटील

---

## १२ ऋषितुल्य मार्गदर्शक

बाबुराजे गुरूजींना मी प्रथम पाहिले ते स्वातंत्र्यदिनाचे वेळी. स्वातंत्र्यदिनानिमित्त त्यांनी गावात अनेक कार्यक्रम आयोजित केले होते. त्याचा एक भाग म्हणून ग्रामस्थांचा कबड्डीचा सामना ठेवला होता. त्या वेळी मी त्यांना प्रथम पाहिले, त्यांचे खेळातील कौशल्य वाखाणण्यासारखे होते. गुडघ्याला खरचटलेले असूनही ते उत्साहाने खेळत होते. खेळातील इतर गावकरी त्यांना अडचणीत आणण्याचे,

आउट करण्याचे कसोशीने प्रयत्न करीत होते पण, ते त्याला दाद देत नव्हते. खेळाच्या मैदानावर मी त्यांना पाहिले आणि मनोमन त्यांचा अनुयायी झालो. आयुष्यभर त्यांनी दाखविलेल्या वाटेवर चालत राहिलो.

मी १९६५ मध्ये ११ वी (त्या काळची मॅट्रिक) पास झालो. त्या काळी पुढील शिक्षणासाठी जिल्ह्याच्या ठिकाणी जावे लागत असे. पण, योगायोगाने, १९६५ च्या जून महिन्यात वारणा महाविद्यालयाची स्थापना झाली. गावातील काही पुढाऱ्यांना मी वारणा महाविद्यालयातून बी.एससी. पदवी घ्यावी असे वाटत होते. मी ७ ते ८ दिवस वारणा महाविद्यालयात उपस्थितही राहिलो. बाबुराजे गुरूजींनी मात्र मी कोल्हापूर येथे राहून शेती-पदवीधर व्हावे असे सांगितले. 'राष्ट्रसेवक विनयकुमार छात्रालयाचा तू प्रथम बीएस्.सी. ॲग्री होणार आहेस', असे म्हणून माझ्या पाठीवर थाप मारली दरम्यान मला कृषी महाविद्यालयात प्रवेश मिळाला. माझी द्विधा मनस्थिती झाली. काय करावे याचा निर्णय घेता येईना. तेव्हा गुरूजींनी ठामपणे सांगितले की तू कोणाचेही न ऐकता कृषी महाविद्यालयात प्रवेश घे. We feed the nation ही संकल्पना त्यांनी त्यावेळी समजावून सांगितली. आजही त्यांचा आदर्श पुढे ठेवून मी शेतकऱ्यांसाठी शेतीसल्ल्याचे काम करीत आहे. माझा मुलगा प्रदीप एम्.एस्.सी. ॲग्रो. केमिकल होऊन माझे कार्य पुढे चालवीत आहे.

भारतातील शेतीबद्दल ते नेहमी माझ्याशी बोलत असत. शेती-जर्नल वाचण्यासाठी प्रोत्साहन देत. शेतीतील एक काम जरी चुकले किंवा राहिले तरी मोठे नुकसान होते असे बजावत. शिक्षणातून कुशल शेतकरी किंवा शेती कामगार (त्यांना मजूर शब्द आवडत नसे. शेतकामगार हा शब्द वापरीत) निर्माण झाले पाहिजेत असे त्यांचे मत होते. हातात खुरपे, टिकाव, कुदळ किंवा इतर शेतीची अवजारे घेतली म्हणजे लगेच शेतकरी किंवा शेतीकामगार होता येत नाही. वनस्पतीचे पान पाहून कमतरता समजली पाहिजे. वनस्पतीवाढीवरून जमिनीची सुपीकता समजली पाहिजे. वनस्पतीच्या निरीक्षणाद्वारे शेतकऱ्याला

तिच्या अवस्थेचे निदान करता आले पाहिजे, असे ते आवर्जून आणि वारंवार सांगत. पाण्याच्या योग्य वापरावर त्यांचा फार कटाक्ष होता. बांधावरचा शेतकरी जमिनी क्षारपड करणार अशी खंत ते सतत व्यक्त करीत असत.

एक मजेशीर आठवण आहे. तो प्रसंग आठवला की आजही मला हसू येते. बाबूराजांचा पोषाख आणि वागणेही अगदी साधे असे. खादीचा शर्ट, खादीची विजार ते घालत. कपडे स्वच्छ धुतलेले असत पण त्यांना इस्त्री नसे. शेतात ते स्वतःही काम करीत असत त्यामुळे उन्हातान्हात शेतात राबणाऱ्यांच्या त्वचेवर विशेषतः चेहऱ्यावर जो राप दिसतो तसा त्यांच्या चेहऱ्यावर दिसे. बोलणे अगदी सौम्य असे. परिणामी, नवख्या माणसाला ते साधे, अर्धशिक्षित शेतकरी आहेत असे वाटणे शक्य होते आणि तसेच एकदा झाले. झाले काय की संघाचा (शेतकरी संघ) एक खत विक्रेता एकदा तळसंदे येथील सोसायटीत खत विक्रीच्या हेतूने आला होता. तो मामासाहेबांना भेटण्यासाठी आला होता. तिथे बाबूराजे होते. त्यांचा पोषाख पाहून, तो त्यांना खताची माहिती खुलवून सांगू लागला. प्रभाव पाडणे, स्वतःचे शैक्षणिक मोठेपण–ज्ञान दाखवून बढाई मारणे अशा विविध उद्देशानी त्याचे वर्णन चालू होते. थोड्या वेळाने बाबूराजांनी जेव्हा एन्.पी.के. प्रमाण, त्याचे पाण्यात विरघळणे व सायट्रिक आम्लातील विद्राव्यता विचारली तेव्हा तो चमकला मग त्याने आपले शिक्षण काय? असे विचारले आणि बाबूराजे बी.एस्.सी. ॲग्री आहेत हे कळल्यावर पूर्ण माघार घेतली. बाबूराजे म्हणाले, ‘आम्ल मिश्र खत द्या पण त्यात फिलर कोणतीही पेंढ वापरलेली असावी’. त्या काळी शेतकरी फक्त नत्राचा वापर करीत, त्यामुळे धान्याची प्रत योग्य मिळत नसे. शेतकऱ्यांनी समतोल खताचा वापर केला पहिजे असे बाबूराजांना वाटे आणि म्हणूनच खत विक्रेत्यांनी सुद्धा एकारलेपणाने खताची माहिती देऊ नये असेही त्यांना वाटे. त्या दिवशी, बाबुराजांची ही सम्यक दृष्टी आणि कळकळ पाहून तो विक्रेता प्रथम खजिल झाला आणि मग आपण पुन्हा असे करणार नाही असेही त्याने सांगितले. असे किस्से खूप आहेत पण, त्यातून ठसा उमटतो तो

बाबूराजांच्या साध्या राहाणीचा, नम्र वागण्याचा, शेतकऱ्यांद्दलच्या आत्मीयतेचा आणि शेतीविषयक सखोल ज्ञानाचा. मी त्यांना नेहमी ऋषितुल्य मार्गदर्शकाच्या रूपात पाहिले. त्यांच्या आठवणीने आजही मन सश्रद्ध होते.

श्री.बी.डी. पाटील

---

## १३ कर्मयोग्याच्या छत्रछायेतील दिवस

ते १९५१-५२ साल होते. शालेय अभ्यासक्रमात शेती विषयाचा अंतर्भाव करण्यात आला होता. मी त्या वेळी सातवीच्या वर्गात होतो. आदरणीय बाबुराजे गुरूजी दुपार नंतर आमच्या शाळेत, म्हणजे पन्हाळा विद्या मंदिर मध्ये यायचे. इयत्ता ५ वी ते ७ वीचे वर्ग एकत्र करून तीन्ही वर्गांना शेती विषय शिकवायचे. खादीचा शर्ट, खादीची विजार आणि खादीचीच टोपी असा त्यांचा पोषाख असायचा. अतिशय शांत आणि संयमी वागणे आणि बोलण्यात कमालीचा जिव्हाळा, गोडवा व आपलेपणा ही त्यांची वैशिष्ट्ये आम्हा विद्यार्थ्यांच्या मनावर ठसत असत. ते त्या काळातील बी.एस्.सी ॲग्रीकल्चर होते आणि शेती विषय अगदी तन्मयतेने शिकवीत असत. उच्चविद्याविभूषित असूनही एवढी शांत, विनम्र वृत्ती हे समीकरण अनुभवायला मिळणे तसे दुर्मिळच पण आमच्या सुदैवाने आम्ही अशा व्यक्तीच्या छत्रछायेत वावरलो. शिवाय ते दिवसही वेगळे, वैशिष्ट्यपूर्ण असेच होते. तो जमानाच महात्मा गांधींच्या विचार प्रभावाने, देशप्रेमाने भारावलेला होता आणि त्या सुसंस्कारी काळात आमची जडण-घडण होत होती.

गुरूजी फक्त पुस्तकी शिकवून थांबायचे नाहीत. आम्हा विद्यार्थ्यांना पन्हाळगडावरून खाली घेऊन जायचे व यादवेंद्र स्वामींच्या समाधी शेजारच्या शेतीवर आमच्या कडून प्रात्यक्षिक करून घ्यायचे. भाताचे तरू करण्यासाठी गादीवाफे कसे तयार करावयाचे, त्याची लांबी, रूंदी, उंची किती ठेवायची हे प्रात्यक्षिकातून शिकवायचे. त्यात

बी पेरून रोपाची वाढ कशी होते हे आम्हाला निरीक्षणाने समजायचे. जपानी भातशेती, टोकण पद्धत, रोपलावणी, त्यातील समान अंतर, कंपोस्ट खत हे सारे नवे तंत्र नेबापूरच्या शिवारात प्रथम बाबुराजांनी आणले. रोपलावणीनंतर एकेका ठोंबाचा फुटवा, त्याला आलेल्या लोंब्या, त्यात तयार झालेले दाणे हे सर्व आम्हाला दाखवून ते समजावून सांगायचे. एक दाणा पेरला तर ही काळी आई आपल्याला किती भरभरून देते हे पुराव्याने पटवून द्यायचे. आणि त्यासाठी, आपण कष्ट केले पाहिजेत, हे आवर्जून सांगायचे.

आम्ही आठवीत शिकत होतो, तेव्हाचा काळ आठवतो. मंगळवार पेठेतील आम्ही बरीच मुले संध्याकाळी जेवण झाल्यावर वाड्यात अभ्यासाला जात असू. १९४८ च्या जाळपोळीत वाड्याचेच नव्हे तर, साऱ्या माणुसकीचेच अतोनात नुकसान झाले. जाळपोळीचा फटका वाड्यालाही बसला. पण आदरणीय मामा (बापूसाहेब गुळवणी मामा) आदरणीय बाबूराजे ही स्थितप्रज्ञ मंडळी सर्वकाही सहन करून वाड्यातच रहात होती. माडीवर मोठ्या हॉलमध्ये एक भलेमोठे जाजम अंथरलेले असायचे. दोन-तीन तक्के भिंतीला टेकून ठेवलेले असायचे. तिथे कधी मामा, कधी बाबूराजे बसलेले असायचे. त्यांना भेटायला आलेली माणसे समोर बसायची. तिथे नेहमी वर्दळ असायची. या हॉलच्या मागील बाजूला असलेल्या अरूंद खोलीत आम्ही अभ्यास करीत असू. बऱ्याच वेळा आम्हाला न सुटणारे बीजगणित, भूमितीचे प्रश्न आम्ही बाबुराजांच्याकडून समजावून घ्यायचो. त्यावेळी पांडुरंग शिंदे नावाचा एक विद्यार्थी वाड्यातच रहात असे. तो आमच्या पुढच्या वर्गात होता. बीजगणित, भूमितीमध्ये त्याला शंभरपैकी शंभर गुण मिळायचे. एक-दोन गुण कधी कमी पडले तर 'कमी मार्क कसे पडले ते शोधून सांग' असे त्याला मामा आणि बाबूराजे सांगत. त्या दोघांचाही तो फार आवडता मुलगा होता. पुढे तो कोल्हापूर जिल्हा परिषदेच्या पब्लिक स्कूलमध्ये शिक्षक झाला. त्याला आदर्श शिक्षक पुरस्कार मिळाला.

त्या वेळी बाबुराजांनी आपटी येथे रात्रीचे प्रौढ साक्षरता वर्ग

सुरू केले होते. बेलाच्या झाडाखालच्या कापसे यांच्या जुन्या घरात एक वर्ग चालू होता. त्यांच्या बरोबर कंदील घेऊन मीही बऱ्याच वेळा त्या वर्गात जात असे. ते येण्यापूर्वीच तिथे बळीअण्णा बुचडे, दत्तू कवठेकर, किसन पोवार, धोंडीबा गोसावी, आबा कापसे, दत्तू कदम ही मंडळी हजर असत. बाबूराजे वर्गात येताच हे सर्वजण उठून उभे रहायचे आणि जयहिंद म्हणायचे. पुढे एकमेकांना भेटल्यावर जयहिंद म्हणण्याची एक नवीन पद्धतच रूढ झाली. त्यातील काही जुनी मंडळी आजही भेटल्यावर जयहिंद म्हणतात.

वाड्यात अभ्यासाला आलेल्या मुलांचा अगदी शांतपणे अभ्यास चालायचा. आम्ही एकमेकांशी अगदी हळू आवाजात बोलायचो. आपण वाड्यात आहोत इथे मामा आहेत, बाबूराजे आहेत – त्यांच्या बद्दलच्या आदरभावनेने आम्ही सतत भारावलेले असायचो. त्यामुळे, कितीही मुले असली तरी वातावरण शांत असे. रात्री दहा वाजले की सर्वांनी झोपलेच पाहिजे. दिवे, कंदील, शामदाणी विझवून, लांब ठेवूनच झोपी जायचे ही तिथली शिस्तच होती. पहाटे मात्र बरोबर साडे चार वाजता खालच्या पडवीतला पत्रा वाजवायची पद्धत होती. पत्रा वाजला की सगळ्यांनी उठून आपली वळकटी बांधून बाजूला ठेवायची. प्रातर्विधी आटोपून बरोबर पाच वाजता प्रार्थनेसाठी पडवीत येऊन ओळीत बसायचे हा दंडकच होता. प्रार्थनेच्या वेळी आदरणीय मामा, बाबूराजे, सखुताई आमच्या बरोबर असत. अतिशय शांतपणे आणि शिस्तबद्ध रीतीने सिद्ध बुद्ध तू, रामकृष्ण तू, येशूपिता प्रभू तू ही प्रार्थना, मनाचे श्लोक, विनोबांच्या गीताईतील अध्याय आम्ही म्हणत असू. आपले जीवन सुंदर आहे आणि दिवसेदिवस ते अधिक सुंदर चांगले होत जाणार आहे असे प्रसन्न विचार मनात येत, आणि एक वेगळीच मानसिक तरतरी येई.

प्रार्थनेनंतर व्यायाम असे. मूळच्या वाड्याची दक्षिणेकडील भक्कम रूंद आणि उंच भिंत उभी होती. अठ्ठेचाळीसच्या जाळपोळींच्या प्रसादामुळे वरचे छप्पर मात्र निघून गेले होते. तिथे आम्ही सर्व मुले बाबुराजांच्यासह व्यायाम करीत असू. सूर्यनमस्कार, जोर–बैठका,

चक्कर दंड वगैरे विविध प्रकारचा व्यायाम चालायचा. त्यानंतर, वाड्यातील स्वयंपाकी बापट म्हणून होते, त्यांच्याकडे जाऊन कांजी प्यायचो (कांजी म्हणजे रव्याची पातळ खीर) आणि मग पुन्हा काही वेळ अभ्यास. अशा प्रकारे वाड्यात अभ्यासाला गेल्यामुळे शरीर-मन-बुद्धी या तीन्हीलाही चांगला खुराक मिळत असे. आदरणीय मामा म्हणजे ज्ञानतपस्वी - ज्ञानयोगी तर आदरणीय बाबुराजे कर्मयोगी. या दोघांचे आम्हाला जवळून दर्शन घडले. त्यांच्या सान्निध्यात आम्ही घडलो. त्यांचा परिसस्पर्श आमच्या जीवनाला झाला. आमचे आजचे अस्तित्व म्हणजे केवळ त्यांचीच कृपा. आजही मामांच्या वाड्यात हीच परंपरा डॉ. भाऊसाहेबांच्या रूपाने चालू आहे. आणि आमच्याही मनात वाड्याबद्दल पूर्वी इतकाच आदरभाव आजही जसाच्या तसा ताजा आहे. आजही तिथे गेले की मनात भूतकाळ जागा होतो. बाबुराजांच्या रूपाने लाभलेल्या एका कर्मयोग्याच्या छत्रछायेतील घडणीचे दिवस आठवतात. हळुवार ओल्या आठवणी दाटून येतात आणि आम्ही आम्ही रहात नाही.

अनंत जोतिराम हावळ
रंगराव रामचंद्र कापसे

---

## १४ निरंतर सावली देणारा वृक्ष

बीज पेरल्यावर कोंभ फुटतो, अंकूर वाढू लागतो. हळू हळू त्याचे रोपटे बनते आणि थंडी-वारा-ऊन यांच्याशी मैत्री करत त्याचा एक मोठा वृक्ष बनतो. हा वृक्ष पक्ष्यांचे घर बनतो. खारी सारख्या प्राण्यांना निवारा देतो. पशू-पक्ष्यांना गोड फळे देतो आणि येणाऱ्या जाणाऱ्या वाटसरूंना थंडगार सावली देतो. ज्ञानेश्वरांनी संत-सज्जनांचे वर्णन करताना त्यांना वृक्षाची उपमा दिली आहे. जो पाणी-खत इ. देतो रोप लावतो त्याला किंवा जो फांद्या तोडतो त्यालाही वृक्ष आपली सावली देतो. भेद-भाव करीत नाही, तसे संत-सज्जनांचे असते असे

ज्ञानदेव म्हणतात. बाबुराजांची आठवण झाली की मला हमखास ही ओवी आठवते. ते खरोखर निरंतर सावली देणाऱ्या वृक्षासारखे होते. स्वतः ऊन-थंडी-वारा-पाऊस झेलतील पण दुसऱ्यावर सावली धरतील. कोणताही भेदभाव न करता!

मी सन १९६४ पासून बाबूराजांच्या सहवासात होतो. मी पशूवैद्यकीय अधिकारी होतो. पंढरपूर, आरे कॉलनी दुग्ध प्रकल्प मुंबई, ठाणे जिल्ह्यातील आदिवासी भागातील आगरवाडी इ. ठिकाणी नोकरीच्या निमित्ताने जवळजवळ १०-१२ वर्षे फिरल्यानंतर माझी बदली कोल्हापूर जिल्ह्यातील तळसंदे गावी झाली आणि तिथे मला जिवाभावाचा मित्र, मार्गदर्शक आणि ज्ञानेश्वरांच्या ओवीतील संत सज्जन भेटला. तळसंदे गावातील एक सामाजिक कार्यकर्ते कै. दादासो हरी मोहिते यांनी श्री. मामासाहेब गुळवणींच्या वाड्यात पशुवैद्यकीय दवाखाना सुरू केला. ५ डिसें. १९६४ साली मी तळसंदे गावी रूजू झालो आणि माझा परिचय प्रथमतः मामासाहेब गुळवणी यांच्याशी व त्यानंतर त्यांचे भाचे श्रीयुत चिदंबर (बाबूराजे) येडूरकर यांच्याशी झाला आणि त्यानंतर लवकरच आम्ही चांगले मित्र बनलो.

एखादी व्यक्ती भलेपणाच्या भावनेने काम करते, आपल्याजवळ असलेले ज्ञान दुसऱ्याला देते आणि त्यामुळे एखाद्या गावाची आहारशैली बदलते असे चित्र तुम्ही पाहिले आहे काय? मी पाहिले आहे, नव्हे मी त्याचा साक्षीदार आहे. झाले होते असे की, तळसंदे गावात कोरडवाहू शेती जास्त. पाण्याची टंचाई, कमी पाऊस यामुळे जिथे चार पोती धान्य पिकायला पाहिजे, तिथे एक-दीड पोते पीक निघे. हे चित्र बाबूराजे तळसंदे येथे रहावयास आल्यावर बदलले. ते शेती-पदवीधर होते. ते रोज संध्याकाळी शेतकऱ्यांच्या अडीअडचणी विचारून त्यांना मार्गदर्शन करीत. त्यांच्या शेतावर जाऊन त्यांची जमीन पाहून त्यांना निरनिराळी पिके कशी घ्यायची ते सांगत असत व प्रत्यक्ष करवून घेत असत अधिक उत्पन्न देणारे बी-बियाणे आणायला सांगून, शेतीतज्ज्ञ मारूती भोसले (गुरूजी), शेती तज्ज्ञ तात्यासो शिंदे, बाळू नाना चौगुले आणि कै. मामासाहेब गुळवणी यांच्या रानात प्रायोगिक

शेती करून, नवे प्रयोग करून सर्वांना माहिती करून देत. त्यामुळे ज्वारी, गहू, ऊस व अन्य कडधान्ये यांचे उत्पादन दुपटी-तिपटीने वाढले पण गंमत म्हणजे, कलिंगड, द्राक्षे, पपई हे शब्द आम्ही (तळसंदे ग्रामस्थ आणि मी ही त्यात आहेच) फक्त पुस्तकात वाचत होतो, त्यांची फक्त चित्रे बघत होतो ती फळे प्रत्यक्ष शेतात पिकविण्याची माहिती बाबुराजांनी करून दिली. त्यामुळे ती पिकविली जाऊ लागली आणि गाव ती खाऊ लागले. गावकऱ्यांच्या आहारात कलिंगडे, पपई, द्राक्षे यांच्या झालेल्या समावेशाचा मी प्रत्यक्ष साक्षीदार आहे.

आणखी एक आठवण बाबूराजांचे वेगळेपण जाणवून देणारी आहे. ते रोज संध्याकाळी शेतकऱ्यांना भेटत असत, गावात फेरफटका मारत असत. मलाही बोलावीत पण माझे काम अत्यावश्यक सेवा प्रकारात मोडत असल्यामुळे मला जाता येत नसे. तरीही जेव्हा जेव्हा शक्य होईल तेव्हा तेव्हा मी आवर्जून जात असे. एकदा त्यांनी मला विनयकुमार छात्रालयातील मुलांना व त्यांना कन्नड शिकविण्याची कल्पना सांगितली. त्यानंतर सतत मी रोज रात्री आठ वाजता मामांच्या वाड्यात शिकविण्यास जाऊ लागलो. भाषिक अस्मिता, भाषिक अभिनिवेष व त्यातून निर्माण होणारे मतभेद भांडणे याबद्दल आपण वाचतो पण तसा जवळचा कोणताच लाभ दिसत नसतानाही जवळच्या प्रांतातील लोकांची भाषा छात्रालयातील मुलांना शिकविण्याची त्यांची इच्छा आणि तळमळ त्यांच्या विचारांचे वेगळेपण जाणवून देते. बहुभाषिक विनोबांचा आदर्श त्यांच्या समोर होता, आंतरभारतीचे स्वप्न त्यांनी स्वतःचे रंग घालून ताजे ठेवण्याचा प्रयत्न केला होता. एक मित्र म्हणून त्यात सहभागी होता आले, याचे आजही मला समाधान वाटते.

निर्मल ग्राम, विनयकुमार छात्रालय, मंगल वाचनालय असे अनेक उपक्रम त्यांनी गावकऱ्यांना सोबत घेऊन राबविले. भेद-भाव विरहित सामाजिक वातावरण निर्माण करण्याचा प्रयत्न केला. थोर विचारवंतांना बोलावून त्यांची व्याख्याने ओयाजित केली. कोणत्याही जवळच्या किंवा दूरच्या लाभावर डोळा न ठेवता केलेल्या या कामामुळे ते नेहमीच सर्वांना आदरणीय राहिले. मी पुष्कळ वेळा, त्यांच्या

आठवणी इतरांना सांगातो आणि तो काळ ताजा करतो. त्यांच्या बद्दल विचार करताना, निरंतर सावली देणारा वृक्ष हीच एक प्रतिमा सतत डोळ्यासमोर तरळत रहाते.

डॉ. बाबूराव जांगळे

---

## १५ सहवासाचा परिसस्पर्श लाभला हे भाग्य!

भोवतालच्या समाजाशी, सामाजिक घटकांशी एकरूप होऊन, समाजातील व्यक्तींची उन्नती व्हावी, त्यांना सुख मिळावे हाच ध्यास घेऊन, अंतःकरणपूर्वक निःस्वार्थ बुद्धीने आयुष्यभर सेवाव्रत अखंड चालविणारे समाजसेवक त्या त्या समाजाची सांस्कृतिक उंची वाढवीत असतात. समाजाला प्रगतीपथावर चालण्यास हातभार लावीत असतात. पूज्य बाबूराजे हे अशा प्रकारचे समाजसेवक होते. त्यांचा प्रदीर्घ सहवास मला लाभला हे माझे भाग्यच!

जून १९५४ ते मे १९५५ या काळात तर मला त्यांचे निकट सानिध्य लाभले. त्यांच्या व्यक्तिमत्वाचा माझ्या मनावर उमटलेला पहिला ठसा त्यांच्या साधेपणाचा आहे. त्यांचे कपडे अगदी साधे असत. शर्ट, विजार टोपी असा पोषाख आणि प्रवास असेल तर कोट हे सर्व कपडे हातमागावरील खादीपासून बनविलेले असत. त्यासाठी ते स्वतःही सूत कातत असत. स्नानांच्या वेळी आपले कपडे आपण धुण्याकडे त्यांचा कटाक्ष असे. स्वाभाविकपणे, त्यांच्या सान्निध्यातील व्यक्तींना स्वावलंबनाचा पाठ आपोआपच मिळे. ते नम्र आणि मृदू भाषिक होते. परिणामी, ते उच्चविद्याविभूषित आहेत हे नवख्या माणसांच्या सहसा ध्यानात येत नसे पण, त्यांच्या सान्निध्यात आल्यावर त्यांच्या बोलण्या-वागण्यातून त्यांचे मोठेपण प्रतीत होई. कोणीही व्यक्ती त्यांच्या संपर्कात आली की त्यांचीच होऊन जात असे.

बाबूराजे विद्यार्थीवर्गात व शेतकरी समुदायात विशेष रममाण होत. त्यांच्यासाठी वेगवेगळ्या उपक्रमांची आखणी करीत. विनयकुमार

छात्रालयाची स्थापना करून त्यांनी गावातील शाळेत जाणाऱ्या मुलांच्या अभ्यासाची सोय केली. त्यांच्या अभ्यासातील अडचणींचे निवारण केले. प्रार्थना, व्यायाम, बौद्धिके आणि सामुदायिक स्वच्छता उपक्रम याद्वारे त्यांना सुसंस्कारित केले. ते शेती-पदवीधर होते. त्या संबंधीचे अद्ययावत ज्ञान त्यांच्याजवळ होते. गावच्या शिवारात ते आठवड्यातून एक-दोनदा चक्कर मारीत. पिकांचे निरीक्षण करीत आणि एखाद्याच्या पिकात काही दोष आढळला तर त्याचे टिपण ठेवीत व त्या टिपणाद्वारे त्या शेतकऱ्याला गोड शब्दात मार्गदर्शन करीत, मदत करीत, वेळप्रसंगी औषध फवारणी पंप त्याला उपलब्ध करून देत.

बाबूराजांना क्रिकेट खेळताना आम्ही पाहिले नाही पण, त्या खेळाची जाण त्यांना होती हे नक्की. कसौटी सामन्यांचा हंगाम असला की ते त्याबद्दल बोलत असत. खेळातील पारिभाषिक शब्दांचे अर्थ व खेळातील बारकावे सांगत असत. टी.व्ही. तेव्हा नव्हते, रेडिओवरून खेळाचे वर्णन सांगितले जात असे. हे वर्णन इंग्रजीतून असल्यामुळे आम्हाला समजत नसे. त्यांनी आम्हाला या खेळाचे स्वरूप समजावून सांगितले आणि रेडिओवरील वर्णनातील काय ऐकायचे, कसे ऐकायचे त्याचा अर्थ कसा लावायचा हेही सांगितले. त्यामुळे आम्हाला क्रिकेट खेळाची गोडी लागली.

गावातील शेतकऱ्यांची आर्थिक स्थिती सुधारावी म्हणून त्यांनी विशेष प्रयत्न केले. धवलक्रांती किंवा गोठा पद्धत हे शब्द प्रचलित होण्यापूर्वीच्या काळात त्यांनी शेतीपूरक व्यवसायाला प्रोत्साहन दिले हे त्यांच्या द्रष्टेपणाचे द्योतक म्हणायला हवे. त्यांनी नवीनच नोकरीला लागलेल्या आम्हा लोकांची एक संघटना केली. त्या संघटनेमार्फत, १९५६-५७ च्या दरम्यान २५-३० म्हशींचा गोठा सुरू केला होता. काही मुलांना कोंबडी पालनाच्या प्रशिक्षणाला पाठवून ते प्रशिक्षित झाल्यावर छोटे छोटे पोल्ट्री फार्म काढण्यास प्रोत्साहन दिले होते, मदतही केली होती.

माझ्या व्यक्तिगत जीवनातील महत्त्वाच्या प्रसंगी मला त्यांचे मार्गदर्शन आणि सहाय्य लाभले. मी एस्.एस्.सी. पास झालो पण

आर्थिक दुर्बलतेमुळे इच्छा असूनही महाविद्यालयीन शिक्षण घेणे परवडणारे नव्हते. त्यांनी मला प.पू. मामांच्या (गुळवणी मामा) वाड्यात पन्हाळ्याला राहाण्याचा सल्ला दिला. अगदी थोड्या दिवसातच मामांच्या आशीर्वादाने मी माध्यमिक शाळेत शिक्षक म्हणून रूजू झालो. मी इतर दोन-तीन ठिकाणीही अर्ज केले होते. त्यापैकी दोघा-तीघांनी मला नोकरीसाठी हजर व्हावे म्हणजे नेमणूकपत्रे पाठविली. आता माझ्यापुढे चालू नोकरी सोडून दुसरीकडे जायचे का असा मोठा प्रश्न उभा राहिला. माध्यमिक शिक्षकाला आवश्यक ती शैक्षणिक पात्रताही माझ्याकडे नव्हती. काय करावे ते समजेना. मी तडक बाबूराजांना भेटलो. त्यांनी साधक बाधक विचार करून चालू नोकरी न सोडण्याचा सल्ला दिला. पुढे मी माध्यमिक शिक्षकाच्या नोकरीसाठी लागणारी एस्.टी.सी. ही पात्रता परीक्षा चांगल्या प्रकारे उत्तीर्ण झालो. त्या प्रीत्यर्थ बाबूराजांना पेढा द्यायला गेलो तर ते म्हणाले, 'तू पदवीधर झाल्याचा पेढा मला खायचा आहे.' त्यांची ही अपेक्षाही मी पूर्ण केली. बी.ए. ची पदवी मिळवली. तेव्हा मात्र त्यांनी कौतुकाने पाठीवर हात फिरवून पेढा खाल्ला. पुढे मी बी.एड्. झालो तेव्हा मात्र माझे कौतुक करण्यासाठी बाबूराजे हयात नव्हते. ज्यांचा आपुलकीचा, कौतुकाचा हात पाठीवरून फिरवल्यावर अंगात बळ संचारत असे ते दिवंगत झाले होते. आजही त्यांच्या आठवणीने अंतःकरण भरून येते.

बाबूराजांच्या दुःखद निधनानंतर प.पू. मामांना भेटायला गेलो होतो तेव्हा, मामा म्हणाले, 'बाबूराजा म्हणजे शिस्तीची बंदूक होती. या बंदुकीच्या नळीत स्वयंशिस्तीची दारू इतकी ठेचून भरली होती की, दारूचा बार उडण्याऐवजी बंदुकीची नळीच फुटली.' मामांना आणि भेटायला आलेल्या आम्हा सर्वांनाच दुःखावेग आवरेना. आमचे जीवन बाबूराजांच्या परीसस्पर्शाने झळाळून उठले आणि ते आम्हाला असे अधांतरी करून गेले. आजही अनेक आठवणी मनात गोळा होतात आणि मन हळवे होते.

मनोहर पेटकर गुरूजी

## १६ जिणे गंगौघाचे पाणी

अकस्मात ते आमच्या जीवनात आले. किंवा असे म्हणूया की आम्ही त्यांच्या जीवनात आलो आणि अगदी थोड्याच अवधीत आम्ही परस्परांचे अगदी जिव्हाळ्याचे स्वकीय बनलो. ही गोष्ट काही माझी एकट्याची नाही. बाबूराजांच्या सहवासात येणाऱ्या सगळ्यांची ही आणि अशीच गोष्ट आहे. त्यांचे व्यक्तिमत्वच असे होते की, कोणत्याही निमित्ताने अथवा कारणाने कुणी व्यक्ती त्यांच्या संपर्कात आली की पुन्हा दूर जाण्याचे नाव घेत नसे.

आजही मला ते दिवस आठवतात. १९५४ साल होते. तळसंद्याहून मी, हंबीरराव शिंदे, रामचंद्र अडिसरे आणि गुळवणीवाडीचा खोंगे असे चौघेजण गुळवणी मामांच्या वाड्यात शिक्षणासाठी राहिलो होतो. वाडा पन्हाळ्याच्या पायथ्याला असलेल्या नेबापूर गावात होता. आम्ही रोज गडावर शाळेसाठी जात असू. बाबूराजे तिथेच होते. ते आम्हाला शिकवायचे. अभ्यासातील शंकांचे निरसन करायचे. त्यांची राहाणी अगदी साधी होती. ते स्वतः चरख्यावर सूत कातत असत व त्या सुताचे कापड तयार करून घेऊन त्याचे कपडे शिवून वापरत. स्वतःची सर्व कामे स्वतःच करण्यावर त्यांचा कटाक्ष असे. या त्यांच्या वागण्याने आम्ही सर्व प्रभावित झालो व त्यांच्यासारखे वागण्याचा प्रयत्न करू लागलो. त्यातील सुरूवातीचा २०-२२ वर्षांचा घडणीचा काळ वजा केला तर, उरलेल्या पंचवीस वर्षांत त्यांनी अक्षरशः कामाचा जो डोंगर उभा केला, त्याची आठवण झाली तरी मन थक्क होते. काम तळसंद्यात चालू होते, तसेच ते नेबापूर-आपटीतही चालू होते. छात्रालय, मुलांना शिकविणे, प्रौढ साक्षरता वर्ग, ग्रामसफाई, शेतीतील प्रयोग, शेतकऱ्यांना मार्गदर्शन, धान्य भिशी, पैशाची भिशी, जाती-भेद नाहीसा करण्यासाठी सहभोजन इ. उपक्रम या गोष्टी दोन्ही ठिकाणी चालत असत. या शिवाय, तळसंद्यात वंचितांसाठी घरकूल, पाणी पिण्यासाठी केलेली सोय, गावातील स्त्रियांसाठी सूत-कताईचे काम, ग्रामोद्योग, शेतीपूरक व्यवसायास प्रोत्साहन व मदत, मांग समाजातील

लोकांसाठी दोर वळण्याचा व्यवसाय असे अनेक उपक्रम यशस्वी पणे चालू होते. आणि एवढे करून शेतकऱ्यांशी गप्पा मारण्यासाठी किंवा मुलांना गोष्टी सांगण्यासाठी ते केव्हाही तयार! अविरत उद्योग, अविरत कष्ट हे जणू त्यांनी घेतलेले व्रत होते. आम्ही त्या व्रताचे फायदे चाखले.

महात्मा गांधी, विनोबा भावे यांच्या विचाराने व आचाराने ते प्रभावित होते. १९५५-५६ मध्ये विनोबांनी भूदान यज्ञासाठी महाराष्ट्रात काढलेल्या पदयात्रेत ते सहभागी झाले होते. बोरपाडळे मार्गे पन्हाळ्याला जाण्याच्या त्यांच्या बेताविषयी कळल्यावर, नेबापूरात त्यांना आणण्याची खटपटही त्यांनी केली होती, ती यशस्वी झाली नाही. पन्हाळ्याची सभा मात्र खूप मोठी झाली. मला व हंबीरराव शिंदेला बाबूराजांनी विनोबांच्या कार्यकर्त्यांसमवेत प्रचाराला पाठविले होते. भूदान चळवळीतील गाणी म्हणत आम्ही गावोगावी जात होतो. 'भूदान यज्ञ हा सफल होईल, भावाची हाक जेव्हा भाऊ ऐकेल,' या ओळी आम्ही आवेशात म्हणायचो. एका वेगळ्याच जगात वावरत असल्यासारखे वाटायचे. एक गाणे आठवते, ते असे - 'हा संत आला तुमच्या दारी, मागतो हे दान। द्या संपत्ती दान, द्या विद्यादान, द्या श्रमदान, द्या भूदान।।' आता विचार करताना वाटते की, बाबूराजांनी विनोबांचा उपदेश खरोखर आचरणात आणला. संपत्तीदान, विद्यादान, श्रमदान आणि भूदान असे चारही प्रकारचे दान देऊन आयुष्याचे सार्थक केले.

त्यांच्या व्यक्तिमत्वाचे बारकावे दाखवून देणाऱ्या खूप आठवणींची शिदोरी माझ्याजवळ आहे. त्यातील दोन-तीन सांगतो.

बाबूराजांच्या सहवासाचा लाभ झालेले कुणीही भेटले की हमखास त्यांच्या आठवणी निघतातच, एकदा, आबा कापसे भेटल्यावर मी त्याला म्हटले, 'आबा, लोकांना रानात काम करायला माणसं मिळत नाहीत आणि तुला बाबूराजांच्या शेतासाठी कशी रे माणसं मिळतात?' तो म्हणाला, 'अरे, ते कामच तसं आहे. बोलणं गोड. सगळ्यांची चौकशी करणार. लागेल तशी मदत करणार. तुला सांगतो, कामावर येणारी कुणी बाई बाळंत झाली तर, मला बोलवून घेत आणि दोन पायली काळी गजली सुवासिक तांदूळ तिच्या घरी पोच करीत. एवढं

प्रेम आणि माणुसकी दाखविल्यावर माणसं येणारच की कामाला!' आम्हाला बाबूराजे 'खरा तो एकचि धर्म जगाला प्रेम अर्पावे' ही साने गुरूजींची कविता नेहमी सांगायचे. आम्ही ती म्हणायचो. बाबूराजांच्या एकेका आठवणीतून या कवितेचा अर्थ थोडा थोडा उलगडतो आहे, असे वाटते. सन १९५५ मधली ही आठवण आहे. तेव्हा कोल्हापूरला व्ही. शांताराम बापूंचा 'दो आँखे बारह हाथ' हा सिनेमा लागला होता. बाबूराजांनी आम्हा चौघांना म्हणजे मी, हंबीर, राम अडिसरे आणि खोंगे अशा चौघांना सांगितले की, रविवारी सुट्टी आहे तर तुम्ही कोल्हापूरला जाऊन 'दो आँखे बारह हात' हा सिनेमा पाहून या. त्यासाठी चौघांना प्रवासासाठी, तिकिटासाठी लागणारे पैसे दिले. घरातून जेवण बांधून दिले. तिथे ग्रामोद्योगमध्ये दाजी-निवृत्ती भाऊ चव्हाण होते. त्यांना आमची राहाण्याची सोय करण्यास सांगितले. रात्री ९ ते १२ सिनेमा पाहून आम्ही ग्रामोद्योगच्या कार्यालयात राहिलो. बाबुराजांनी अगोदर सांगून ठेवल्याप्रमाणे दाजींनी आम्हाला पहाटे ५ वाजता नीरा केंद्रावर नेऊन नीरा प्यायला दिली. आम्हाला जातानाच बजावले होते की, हॉटेलमध्ये जायचे नाही. सकाळी गंगावेश स्टॅण्डवर दुधाच्या कट्ट्यावर एक-एक ग्लास दूध प्या आणि एस.टी. ने परत या. अतिशय काळजीपूर्वक सगळा कार्यक्रम आखून त्यांनी आम्हाला सिनेमा बघण्याचा आनंद मिळवून दिला.

छात्रालयाच्या मुलांत ते किती रमत याच्या आठवणी अनेक लोक सांगतात. एकदा मामांनी (गुळवणी मामा) व बाबुराजांनी ठरवलं की छात्रालयातील मुलांची दिवाळी वाड्यातच करायची. झालं, अभ्यासाला येणाऱ्या सगळ्यांना तसं सांगितलं. त्या दिवशी मामा व बाबूराजे सर्वांच्या आधी उठले, पाणी तापवून त्यांनी अभ्यंगस्नान केले आणि मग दोन पाण्याचे हंडे पाणी गरम करून मुलांना उठविले. त्यांना तेल, उटणे, साबण लावून अभ्यंग स्नान घातले. मग सर्वांनी एकत्र फराळ केला. मामांची व बाबूराजांची दिवाळी आमच्या बरोबरच साजरी झाली. आणखी एक आठवण म्हणजे त्या वर्षी पारगावच्या मळ्यातील झाडांना हापूस आंबे भरपूर लागले होते. पाड आल्यावर ते

उतरले. त्यातले निम्मे आंबे बाबूराजांनी नेब्रापुरला घरी पाठविले व निम्मे पारगावच्या मळ्यात पिकत ठेवले. पिकल्यावर ते वाड्यातून आणून मुलांना खायला दिले आणि थोडे-थोडे घरी न्यायला दिले. इतके ते मुलांशी एकरूप झाले होते. त्यांच्या आठवणींना मधुर चव आहे ती अशा अनेक छोट्या छोट्या घटनांमुळे. 'असे जे आपणापाशी वित्त वा विद्या। सदा ते देतचि जावे।' असे सानेगुरूजींनी कवितेत म्हटले, त्याचा वस्तुपाठ आम्हाला बाबूराजांच्या सहवासात पहायला, अनुभवायला मिळला.

आपल्या गरजा कमीत कमी असाव्यात अशी त्यांची भूमिका होती. त्यांच्या बोलण्या-वागण्यातून ती व्यक्त होत असे. एकदा बाबूराजांना पारगावच्या मळ्याकडे जायचे होते. म्हणून त्यांनी 'बाळाराम, सायकल घेऊन ये, आपण मळ्याकडे जाऊन येऊया' असा मला निरोप पाठविला. मी सायकल घेऊन गेलो. त्यांनी मला पुढे बसवले व स्वतः सायकल चालवू लागले. गावाच्या पश्चिम बाजूस रस्त्याला मोठा चढ आहे आणि रस्ताही खराब होता. त्यांना त्रास होऊ नये म्हणून मी म्हटले, 'आपण उतरून चालत जाऊया' ते म्हणाले, 'अं, नको. पायडल मारत असताना माझ्या पायावर तुझा पाय ठेव म्हणजे झाले. रस्ता केव्हाच संपून जाईल' नंतर मी त्यांना म्हटले, आपण एक मोटर सायकल घ्या. ते सोयीचे होईल. त्यावर त्यांनी उत्तर दिले, 'अरे मोटरसायकल घेणे अवघड नाही, परंतु एकवेळ स्टॅण्डर्ड वाढले की ते कमी करता येत नाही. आपल्या गरजा कमीत कमी असल्या पाहिजेत. योग्य कामासाठी आवश्यक असेल तिथे आणि तेव्हा जरूर खर्च करावा, तिथे काटकसर करू नये पण; गरज नसताना अनाठायी खर्च करू नये' त्यांच्या आचार-विचारातला हा साधेपणा, प्रांजळपणा अशा अनेक अनुभवातून वेळोवेळी व्यक्त होत असे.त्यांनी सगळ्यांना भरपूर प्रेम दिले. निःस्वार्थपणे सेवा केली. त्यांच्या साध्या राहणीचा व उच्च विचारसरणीचा ठसा माझ्यासारख्या अनेकांच्या मनावर उमटला आहे. त्यांचे जिणे म्हणजे गंगौघाचे पाणी, मधुर, पवित्र आणि जीवनदायी।

बाळाराम चव्हाण

## १७ आठवणींचीच सोबत

भारत देश स्वतंत्र होऊन फार तर १२-१३ वर्षे उलटली असतील. देशाचा विकास होण्यास तो अनुकूल असा काळ होता. अशा काळात तळसंदे नावाच्या टुमदार गावाची आदर्श गाव म्हणून निवड झाली. त्या मागे होते पूज्य गुळवणी मामा आणि बाबूराजे गुरूजी यांचे परिश्रम त्यांची सामाजिक कार्याबद्दलची तळमळ आणि त्यांचे मार्गदर्शन। त्या काळात गावातील शिकत असलेल्या आम्हा सर्व मुलांचा मुक्काम गावचे पितामह मामासाहेब गुळवणी यांच्या वाड्यातच असे. त्यांचा पांढऱ्या मातीत बांधकाम असलेला, बारा महिने थंड-गार असलेला भव्य वाडा आणि तिथे असलेले मंगल वाचनालय - या दोन्हीमुळे आम्ही सर्व मुले सदासर्वकाळ वाड्यातच असायचो.

साधारणपणे १९६० ते १९६७ पर्यंत आम्हाला बाबुराजे गुरूजींचा सहवास लाभला. इयत्तर ४ ते ११ वी पर्यंतच्या वर्गांत शिकणारी आम्ही १२ ते २० या वयोगटातील मुले होतो. भाग ग्रामीण, आई-वडील शेतीतील कामे करणारे, त्यामुळे सहाजिकच मुलांच्या शिक्षणाची आबाळ होई. उत्पन्न कमी असल्यामुळे मुलांना जास्त शिक्षण देण्याची ऐपतही नसायची, एकंदर गावातील वातावरण शिक्षणाला पूरक नव्हते. पण आदरणीय बाबूराजे गुरूजींनी विनयकुमार छात्रालय सुरू केले आणि थोड्याच काळात चित्र बदलले. गावात कंदिलाच्या उजेडात अभ्यास करावा लागे पण वाड्यात इलेक्ट्रिसिटीची सोय होती. तिथे गुरूजी स्वतः इंग्रजी, गणित, संस्कृत हे अवघड विषय शिकवायचे. आमच्या शंकांचे निरसन करायचे. त्यांच्या शिकवण्यामुळे आम्हाला अभ्यासाची गोडी लागली. मंगल वाचनालयातील पुस्तके वाचण्याची आवड निर्माण झाली. गुरूजींचा साधेपणा, प्रेमळ स्वभाव, वागण्यातील नम्रता आणि सतत काही ना काही करत असण्याचा उद्योगीपणा याचा मोठा प्रभाव आम्हा सर्वांवर पडला, आपण त्यांच्यासारखे व्हायचे असे मी मनोमन ठरवीत असे.

आमचा दिवस पहाटे सुरू होई. गुरूजी पहाटे लवकर उठून,

तळ्यात आंघोळ करून यायचे आणि आल्यावर आम्हाला उठवायचे. अगदी गोड आवाजात नावानिशी हाका मारायचे. त्या हाका अजूनही कानात घुमताहेत ते आपले कपडे स्वतः धूत असत. स्वतः स्वावलंबी होते आणि आम्हीही स्वावलंबी व्हावे, यासाठी ते स्वावलंबनाचे महत्त्व समजावून सांगत.

आम्हाला मामांनी, बाबुराजे गुरूजींनी व भोसले गुरूजींनी सूत कताई करायला शिकवले होते. वाड्यात कापूस आणून त्यातील सरकी मशीनने काढली जाई, मग कापूस पिंजणे, हात चरख्याचे पेळू करणे, सूत कातणे, सुताच्या चाक्यांचे सूत टाकळीवर भरणे व त्या सुताच्या गुंड्या खादीग्रामोद्योग केंद्राकडे पाठविणे अशी सर्व कामे आम्ही करीत असू. गावातील महिलांना सुद्धा सूतकताईचे काम सार्वजनिक तत्त्वावर दिले होते. पुढे या चरख्यात यांत्रिक विकास चरखा असा बदल झाला. हे चरखे घरोघरी दिले गेले: सूतकताई, शेतीपूरक व्यवसाय म्हणून कुक्कुटपालन, सामुदायिक गोठा पद्धत, ग्रामसफाई असे विविध उपक्रम बाबुराजे गुरूजींच्या मार्गदर्शनाखाली यशस्वीपणे चालू होते. जणू म. गांधीजींच्या स्वप्नातील गाव आकाराला येत होते. १९७० साली गुरूजींचे दुःखद निधन झाले आणि एक प्रकारचा सुन्नपणा आला. कामाची तळमळ दुःखाच्या कोशात गुंडाळली गेली. उदासीनतेचे सावट पसरले. पण आजही कालचा विचार मनात आला की असे वाटते की आज आपल्या आयुष्यात जेजे चांगले आहे, ते गुरूजींच्या संस्कारांचे, मार्गदर्शनाचे आणि प्रेमाचे फळ आहे. माझ्या जीवनाला आकार लाभला तो त्यांच्यामुळे. माझ्या जीवनाची घडण त्यांच्या विचारांच्या मुशीत झाली. आताही त्यांच्या आठवणी मला सोबत करतात. बळ देतात.

१९६७ च्या बॅचचा प्रतिनिधी

---

## १८ जीवनाला वळण लावणारे मार्गदर्शक – बाबुराजे

मी डबल ग्रॅज्युएट आहे. सन १९७२ साली मी पदवीधर झालो, आणि त्यानंतर माझे आयुष्य अत्यंत सुरळीत आणि सुखाचे गेले; त्याचे श्रेय बाबुराजे या एकमेव व्यक्तीला आहे. ते माझे गुरू, मार्गदर्शक होते. आयुष्याच्या एखाद्या वळणावर काही तरी घडते आणि त्यावेळी जर योग्य मार्गदर्शन मिळाले नही, तर सगळेच फसते. आयुष्य हा दुःखाचा प्रवास बनतो. माझ्या बाबतीत तसे घडले नाही. सुदैवाने बाबुराजांचे मार्गदर्शन लाभले.

झाले असे की, मी अकरावीत इंग्रजी विषयात नापास झालो. निराश होऊन गावात भ्रमिष्टासारखा फिरू लागलो. काळजी वाटून माझ्या वडिलांनी मला बाबुराजांकडे नेले. माझे वडील त्यांचा खास माणूस होते कारण त्यांची (म्हणजे मामांची) शेती आम्ही करीत होतो. बाबुराजांनी मला सांगितले, उद्या पासून रोज पारगावच्या रानात यायचं. दुसरे दिवशी पासून त्यांनी मला आणि त्यांच्या मुलाला–मोहनला पारगावच्या मळ्यात शिकवायला सुरवात केली. मी म्हटलं, कोल्हापूरला हत्ती क्लासेस आहेत, तिथं जातो. ते म्हटले नाही. मीच तुझा अभ्यास घेणार. तू ११ वी तर होशीलच पण पदवीधरही झाले पाहिजे. ते आपल्या मुलात व माझ्यात भेदभाव करीत नसत. एक अंबा कापला तर अर्धा मला व अर्धा त्याला देत. माणसामाणसात उच्च–नीच असे काही असू नये असे ते म्हणत. कधी कधी मळ्यात काम करणाऱ्या शंकर चव्हाण या पूर्वास्पृश्य माणसाच्या डब्यातील पदार्थ आम्हा दोघांना मुद्दाम खायला देत असत!

मी अकरावी पास झालो. कॉलेजला जायचे म्हणून टेरिकॉटचे कपडे आणायला वडगावला जायचे ठरवले. हे कळल्यावर बाबुराजांनी मला बोलावून घेतले. त्यावेळी वाड्यात सूतकताई चालत असे. त्यातल्या चरख्याकडे बोट दाखवून सांगितले, 'इथे बसायचं आणि ३ मीटर कापडाला लागेल एवढं सूत कातायंच. मी कातलेले सूत घेऊन जाऊन त्यांनी त्याचे कापड करून आणले. आणि त्याचे मी कपडे

शिवले. अशी माझ्या पहिल्या विजार शर्टाची गोष्ट झाली.

आणखी एक आठवण आहे. मी कॉलेजला जायला लागल्यावर, आठवड्यातून एकदा गावाकडे यायचो. एकदा बूट घालून आलो तर बाबुराजे म्हणाले, 'अरे, बूट कशाला, दहा ₹ चे स्लीपर घाल. कॉलेजतल्या सगळ्या मुलांना मिळणार आहेत का बूट? मग आपणच एकट्याने कशाला घालायचे?' त्या दिवसानंतर, पुढे शिक्षण संपेपर्यंत, बिन इस्त्रीचे कपडे आणि स्लीपर घालून मी वावरलो. आजही मी त्यांच्या मार्गदर्शनाप्रमाणे वागतो. मी शेती करतो. दहा एकर शेत आहे, त्यात मी स्वतः राबतो. गड्यावर अवलंबून रहायचे नाही, स्वतः कष्ट करायेच असे ते सांगत. अजूनही मी सकाळी ७ पासून संध्याकाळ होईपर्यंत भांगलणीचे वगैरे काम करतो. शेतात काम करण्याची मला लाज वाटत नाही उलट अभिमान वाटतो. बाबुराजे म्हणत, We feed nation ते अजून कानात घुमते आहे.

आज मागे वळून पहाताना वाटते की, आयुष्याच्या कोणत्याही टप्प्यावर उपयोगी पडेल असे मार्गदर्शन त्यांनी केले. माझ्या आयुष्याला वळल लावले. आज माझा संसार सुखाने चालू आहे. मुले-सुना-नातवंडे गुण्या-गोविंदाने नांदत आहेत. अशा परिस्थितीत त्यांच्या आठवणीने ऊर भरून येतो.

श्री. मारूती शंकर मोहिते
तळसंदे

---

# समारोप

बाबुराजांच्या कार्याची, जीवनपद्धतीची फलश्रुती काय? या प्रश्नाच्या सोडवणुकीसाठी पुन्हा एकदा तळसंदे गावाकडे वळावे लागेल. आज ते गाव कसे आहे, तिथल्या लोकांचे काय आणि कसे चालले आहे, याचा वेध घेतला तर कदाचित आपल्याला त्या प्रश्नाचे उत्तर मिळेल, जिज्ञासेची तृप्ती होईल.

तळसंदे गावातील ज्या तरूणांचा कोणत्याही उद्देशाने का असेना पण मामांच्या वाड्याशी संबंध आला, त्यांच्या मनात वाड्याविषयी एक अनोखी जवळिकीची जाणीव आहे. मामांच्या वाड्याला एखाद्या मिथचे महत्त्व, रूप प्राप्त झाले आहे. कित्येकजण आपल्या शैक्षणिक यशाचे श्रेय आई-वडील आणि शिक्षकांच्या प्रमाणेच वाड्यालाही देतात! ज्या वाड्यात बाबुराजांनी आपल्या सामाजिक कार्याची आखणी केली, छात्रालय, वाचनालय, सूतकताईवर्ग, शेतीविषयक प्रश्नांची चर्चा असे अनेक उपक्रम यशस्वीपणे केले, त्या वाड्याला असे चैतन्यदायी रूप प्राप्त झाले आहे. वाड्यात बाबूराजे अभ्यासिका अजूनही चालू आहे. अनेक विद्यार्थी-विद्यार्थिनी तिचा लाभ घेत आहेत. इथे आले की अभ्यासाला मूड येतो असा त्यांचा अनुभव आहे. आजही वाड्याच्या अंगणात मुले-तरूण खेळ खेळतात, व्यायाम करतात आणि आजही ते मंगल वाचनालयाचा लाभ घेतात.

तळसंदे गावातील तरूणांनी गेली दोन-तीन वर्षे 'बाबूराजे येडूरकर स्वच्छता आणि पर्यावरण संवर्धन अभियान' यशस्वीपणे चालविले आहे. गावातील स्मशानभूमीतील स्वच्छतेने या अभियानाची

सुरूवात झाली. प्रत्येक रविवारी दोन तास हे तरूण स्वच्छता करतात. मंदिरे, रस्ते स्वच्छ करणे, पाण्याच्या टाक्या स्वच्छ करणे, तळ्याभोवतीची झाडे जगवणे, त्यांना पाणी घालणे असे काम ते वारंवार करीत आहेत. आता त्यांनी ३०० झाडे लावली आहेत. हे सर्व काम ते स्वेच्छेने, श्रमदानाने आणि वर्गणी काढून करतात. दर शुक्रवारी हे सर्व युवक एकत्र येतात, प्रार्थना म्हणतात आणि पुढील कार्यक्रमाविषयी चर्चा करतात. स्वामी विवेकानंद जयंती, जिजामाता जयंती, युवादिन असे प्रेरकदिन साजरे करतात. त्या निमित्ताने रक्तदान शिबिर घेतात. २०१७ मध्ये घेतलेल्या रक्तदान शिबिरात एकूण १३१ बाटल्या रक्तसंकलन झाले त्यापैकी २६ बाटल्या रक्त गावातील गरजू रूग्णांच्या उपचारासाठी वापरण्यात आले. कुबेर राजाराम चव्हाण याने समविचारी तरूणांना एकत्र केले आणि २६ ऑक्टो. २०१५ पासून अतिशय शिस्तबद्ध रीतीने या अभियानाचा उपक्रम सुरू केला. आज सुमारे पस्तीस-चाळीस नवयुवक या अभियानात सहभागी झाले आहेत. ते सुशिक्षित आहेत, काही अजून शिक्षण घेत आहेत, काही शिक्षण पुरे करून नोकरी-व्यवसायात शिरले आहेत. सामाजिक बांधिलकी मानणारे सामाजिक कार्याची आवड असलेले, आयुष्याचा आणि भोवतालच्या परिस्थितीचा गंभीरपणे विचार करणारे, निर्व्यसनी आणि पर्यावरण सजग असल्याने प्लॉस्टिकचा वापर कमीत कमी करणारे असे हे युवक आहेत.

नजिकच्या भविष्यातील कामाची आखणीही त्यांनी केली आहे. गावाच्या उशाला असलेल्या तलावाच्या पाळीवरील महादेव मंदिरापासून पुढे चिंच, आवळा, जांभूळ अशी २५-३० झाडे लावावी म्हणजे गावातील मुलांना हा रानमेवा खाता येईल अशी त्यांची योजना आहे. तळ्याकडेच्या बाजूला स्प्रिंकलरचे पाणी देऊन बगिचा तयार करावयाचा आणि त्याला बाबुराजे येडूरकर बगिचा असे नाव द्यायचे असे त्यांच्या मनात आहे. गावातील लोकांना आणि बाहेरून येणाऱ्या पाहुण्यारावळ्यांनाही आनंदित करेल, आवडेल असे हे स्थान असेल. मंदिराजवळच्या पटांगणात लहान मुलांसाठी झोपाळे, घसरगुंडी अशी

खेळाची साधने उपलब्ध करून देणे, तळ्यापासून टेकडीवरील यमाईच्या मंदिरापर्यंत ज्यांचा उपयोग, पोलीसभरतीसाठी जाणाऱ्या मुलांना व्यायामासाठी होईल अशा पायऱ्या करणे, यमाई मंदिरासमोर खुली व्यायामशाळा करणे आणि प्राचीन ग्रंथांमध्ये नामोल्लेख असलेल्या विष्णू मंदिराचा जीर्णोद्धार करणे अशा अनेक योजना त्यांच्या विचाराधीन आहेत. गावाला इतके सुंदर गोड्या पाण्याचे तळे असतानाही लोकांना पाण्यासाठी वणवण का करावी लागते हा प्रश्नही धसाला लावण्याचे त्यांनी ठरविले आहे. सध्या गावात चार-चार दिवस पाणी येत नाही. गावाला जलशुद्धीकरणकेंद्र नाही. हा प्रश्न सोडवण्यासाठी बाबुराजे येडूरकर स्वच्छता आणि पर्यावरण संवर्धन अभियानांतर्गत कार्यक्रम राबविण्याचे ठरले आहे. तळ्यातील पाणी सायफनने काढून पूर्णपणे आटवायचे, त्यातील गाळ गावातील लोकांना कमीत कमी किमतीला द्यायचा आणि त्यानंतर जेव्हा पाऊस येईल आणि झरे फुटून तळे भरेल तेव्हा ते पाणी सायफनने टाकीत घेऊन गावाला पुरवायचे अशी योजना आहे. वैशिष्ट्य हे की, यासाठी लागणारे आर्थिक बळ कोणत्याही राजकीय पक्षाकडून घेतले जाणार नाही आणि संपूर्ण काम स्वेच्छेने व श्रमदानाने केले जाईल यावर तरूण कार्यकर्ते ठाम आहेत. गावाच्या मालकीची जिथे जिथे जमीन आहे, तिथे तिथे झाडे लावून गाव हिरवं करण्याची त्यांची योजना आहे. स्वच्छ, स्वावलंबी व शक्य तितक्या प्रमाणात स्वयंपूर्ण असे बाबूराजांच्या स्वप्नातील, मामांच्या स्वप्नातील गाव प्रत्यक्षात आणण्याचा निर्धार हे युवक बोलून दाखवितात. बाबुराजांनी केलेल्या सामाजिक - शैक्षणिक कार्याची फलश्रुती यापेक्षा वेगळी काय असू शकेल?

१९२३ ते १९७० असे उणेपुरे ४७ वर्षांचे आयुष्य बाबुराजांना लाभले. शिक्षण पूर्ण झाल्यावर त्यांनी सामाजिक कार्याला प्रारंभ केला. तळसंदे गावाशी, इथल्या लोकांशी, परिस्थितीशी, अडी-अडचणींशी समरस होऊन त्यांनी अनेक उपक्रम राबविले. आपल्या मृदू, सौजन्यशील वागण्याने सर्वांना आपलेसे केले. आणि आज, त्यांच्या मृत्यूनंतर तब्बल ४०-४५ वर्षांनी, त्यांच्या जीवितकार्यापासून प्रेरणा

घेऊन तळसंद्यातील युवक त्यांचे काम पुढे चालविण्याचा निर्धार करीत आहेत. सारेच दीप मंदावलेले नाहीत. कुठे कुठे प्रकाशाचे किरण आहेत. त्यात प्रकाशण्याची भरपूर क्षमता आहे. या प्रकाशकिरणांचे प्रखर प्रकाशझोतात, जीवनदायी ऊर्जेत रूपांतर होण्यासाठी आपण मदत करायला हवी. केवळ तटस्थ प्रेक्षकवृत्ती ठेवून चालणार नाही. सक्रिय व्हायला हवे. तसे झाले तर तीसुद्धा बाबुराजांनी निस्वार्थीपणे, तळमळीने केलेल्या सामाजिक कार्याची फलश्रुती असेल.

---

संदर्भ व संक्षेपांचे स्पष्टीकरण


१. मामा – स.आ. तथा बापूसाहेब गुळवणी, बाबुराजांचे मामा

२. हेरंब कुलकर्णी : मुलींचे शिक्षण, आमच्या शिक्षणाचं काय? मनोविकास प्रकाशन पुणे, २०१५, पृ. १५९

३. द.न.गोखलेः गांधीजी मानव नि महामानव, मौज प्रकाशनगृह, मुंबई, १९९६ पृ. २

४. द.न. गोखले उनि. पृ. २५०

५. वसंत सी. शेकडे : आप्पासाहेब पटवर्धन उर्फ कोकणगांधी एक समर्पित जीवन, २री आ. वैष्णव, अहमदनगर, २०१०, पृ. ९९

६. गोविंद बाबाजी जोशी, माझे प्रवासाची हकीकत, (प्रथमावृत्ती १८९६), माध्यम प्रकाशन, मुंबई दु.आ. २०१६ पृ. ५१, ३१६

७. तक्क्या – जुन्या ग्रामरचनेतील पूर्वास्पृश्यांनी एकत्र येण्याची जागा.

८. अंबरीश मिश्र : गंगेमध्ये गगन, वितळले, राजहंस प्रकाशन, २००३, पृ. १२३

## परिशिष्ट – १

---

**'बाबूराजे येडूरकर ग्रामस्वच्छता व पर्यावरण संवर्धन अभियान' सहभागी कार्यकर्ते**

---

कुबेर राजाराम चव्हाण
नवनाथ दिनकर चव्हाण
प्रमोद आनंदराव चव्हाण
राहुल आनंदा चव्हाण
प्रमोद बाबासो चव्हाण
भरत विलास कुंभार
सुयोग रघुनाथ चव्हाण
प्रमोद भास्कर कांबळे
नितीन दादासो चव्हाण
मोहन बाळाराम चव्हाण
चेतन गणपती चव्हाण
जयसिंग बापूसो चव्हाण
संदिप मारुती कुंभार
श्रीकांत धोंडीराम चव्हाण
समीर मधुकर पांगे
दिगंबर जगन्नाथ संकपाळ
विशाल विलास चव्हाण
रघुनाथ कोंडीराम मोकाशी
योगेश जगन्नाथ संकपाळ

प्रमोद शंकर भोसले
दिपक राजाराम वांगीकर
प्रविण शिवाजी सातवेकर
अमोल पांडुरंग मोहिते
सुनील परशराम चव्हाण
रजनीकांत शिवाजी कुंभार
संदिप शामराव सुतार
सागर सर्जेराव चव्हाण
अविष्कार विष्णुपंत चव्हाण
प्रशांत सहदेव चव्हाण
प्रशांत लहु ठोणे
विश्वास बाळासो चव्हाण
प्रदिप तात्यासो चव्हाण
सचीन बाळासो चव्हाण
अरुण विठ्ठल चव्हाण
जयवंत मारुती चव्हाण
अमोल प्रकाश चव्हाण
अमोल एकनाथ जाधव
रजनीकांत शिवाजी कुंभार

---

स्वत:ला खर्ची टाकायचे.
आपले आयुष्य शून्यावर आणून फकिरी पत्करायची
आणि जीवनाचे सार्थक करणाऱ्या आपल्या कार्यासाठी
आवश्यक ती वाटचाल करायाची,
थोडक्यात 'उरलो उपकारापुरता'
ही तुकाराम महाराजांच्या अभंगात वर्णिलेली
जाणीव जशी आध्यत्मिक कृतीच्या,
संत-सज्जनात आढळू शकते
तशीच ती सामाजिक कार्याचे व्रत घेतलेल्या
सच्चा कार्यकर्त्यातही आढळते;
याचे मूर्तिमंत उदाहरण म्हणजे
बाबुराजांचा ध्यासप्रवास.

